म. ग्रं. स. वाचनालय, ठाणे

विषय

दा. क्र. २००२०

IRBK-0120020

IRBK-0120020

वाचनालय
नाटक
20020
२८/१०/८३

# निखारे

IRBK-0120020
IRBK-0120020

रत्नाकर मतकरी

श्री विशाखा प्रकाशन, पुणे ३०

प्रकाशक :
राजा फडणीस,
श्री विशाखा प्रकाशन,
५८ शनवार पेठ,
पुणे ३०

© सौ. प्रतिभा मतकरी,
राधानिवास, टिळक रोड,
दादर, मुंबई १४

प्रथमावृत्ती : फेब्रु. ८३

मुखपृष्ठ : सुभाष अवचट, पुणे.

मूल्य : पंधरा रुपये

मुद्रक :
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४ बुधवार पेठ,
पुणें ४११००२

---

नाटकाचा प्रमाणपत्र क्रमांक : DRM IA 537/67 of 25-9-67
प्रयोगापूर्वी लेखकाची लेखी परवानगी अत्यावश्यक.

क्र. 20020 28/90/८3
वि. नाटक

# पार्श्वभूमी

सदुसष्ट सालची गोष्ट. उदय कला केन्द्र नावाची एक तरुणांची हौशी नाटकसंस्था, काही चांगलं करावं, या हेतूनं नुकतीच राज्यनाट्य-स्पर्धेत उतरू लागली होती. या संस्थेसाठी मी रेजिनॉल्ड रोज (Reginald Rose) या नाटककाराचं, ' ट्वेल्व्ह अँग्री मेन ' (Twelve Angry Men) हे अमेरिकन नाटक, ' निखारे ' या नावानं रुपांतरीत केलं. त्यांतला आशय सामाजिक महत्त्वाचा, आणि रचना परिपूर्ण वाटली म्हणूनच.

मूळ नाटक बरवर चाळलं, तर त्याच्या स्वरूपाविषयी गैरसमज होऊ शकेल. पित्याच्या खुनाचा आरोप आलेल्या एका मुलाला दोषी-निर्दोषी ठरवताना, बारा लोकांची एक ज्युरी ज्या मानसिक आंदोलना-मधून जाते, त्याचं चित्रण करणारं हे नाटक आहे. एका ज्युरीरूममधे घडणारं. रुढ अर्थाची ' ॲक्शन ' च काय, पण पात्राचं आगमन– निर्गम-नही त्यात नाही. विषय निश्चित असला, तरी कथानक नाही. स्त्री पात्रही नाही. मग त्यात आहे तरी काय ? ज्यूरर्सनी घातलेला वितंडवाद ? की कायद्याची चर्चा ? पण या नाटकाला चर्चात्मक समजणं, हे नाटक न समजल्याचं लक्षण ठरेल. कारण या नाटकातले संवाद एक विलक्षण रोमहर्षक अनुभव देतात. कसला ? तर एका माणसानं एकाकीपणे लढून

इतर सर्वांचे पूर्वग्रह कसे कौशल्यानं ढासळून पाडले, ते पाहण्याचा. त्या माणसाला विरोध करता करताच, प्रत्येकजण, माणूस म्हणून आपण काय दर्जाचे आहोत हे कसं सिद्ध करतो, याचा.

खरं तर या नाटकात, खुनाचा आरोप आलेला मुलगा, किंवा त्याचं दोषी-निर्दोषीपण या गोष्टी महत्त्वाच्या नाहीत. चटकन कुणावरही दोषा-रोप करणारे, दुसऱ्याला समजून घ्यायला सवड नसलेले, आणि पूर्व-ग्रहांनी आतून बाहेरून लडबडलेले तुम्ही-आम्ही, हाच या नाटकाचा विषय आहे. आपल्या पूर्वग्रहांच्या अनेक जाती या नाटकात दिसतात. कुणी स्वतःला उच्चवर्गीय समजतो, कुणी बुद्धिनिष्ठ समजतो, कुणी भूत-काळ विसरू पाहातो. कुणी आजच्या क्षणापुरता जगतो, तर कुणी भावनावश होतो. या सगळ्या उसन्या अवसनांमुळे ज्याचे त्याचे जगाकडे पाहण्याचे चष्मे बदलतात. या रंगीत चष्म्यांमधून सत्याकडे पाहिलं की ते विद्रूप दिसतं. या विकृत सत्याच्या आधारावर आपण जगाला वाईट ठरवतो, आणि दुसऱ्या माणसावर अन्याय करायला पुढं सरसावतो. आपला हा दोष लक्षात आणून देणारा माणूस, आपल्याला शत्रू वाटू लागतो, आणि आपण त्याच्याशी शेवटपर्यंत कडवी झुंज देत राहतो. आपल्याला सुधारू पाहणाऱ्या त्या गृहस्थाची लढत, परिणामी अधिकच कठीण होते. हे आजवर अनेक समाजसुधारकांचं झालं. या प्रतीकात्मक नाटकाच्या नाय-काचंही तेच होतं. तरीही स्वतःचे माणुसकीचं भान न सोडता, कस-लेही कायदेकानू न मोडता, कधी संयमानं, कधी संतापानं, कधी तिर-

हकारानं, तर कधी चलाखीनं तो ही लढाई कशी जिंकतो हे पहाण्यासारखं आहे. हे नाटक अत्यंत मूलभूत अशा प्रभावी नाट्यानं ओतप्रोत भरलेलं आहे ते त्यामुळे.

मूळ नाटक इतकं वेगळं आणि मौल्यवान असल्यामुळे रूपांतराचे काम अधिकच जोखमीचं झालं. नाटक मराठी प्रेक्षकाला आपलंसं वाटेल इतकं बदलणं, आणि तरीही त्याच्या मूळच्या सौन्दर्याला धक्का लागू न देणं अशी दुहेरी कसरत इथं आवश्यक होती. त्यातून मूळ नाटक इतकं बांधेसूद आहे, की त्यावर आधारलेल्या चित्रपटात (ट्वेल्व्ह अँग्री मेन : दिग्दर्शक : सिडने ल्युमट (Sidney Lumet) ) देखील, मूळ नाटकाची रचना जशीच्या तशीच ठेवलेली आहे. माध्यमाचं संपूर्ण स्वातंत्र्य उपलब्ध असतानाही, ते न वापरण्याचा संयम दाखवून, दिग्दर्शकानं पूर्ण चित्रपट एकाच ज्युरीरूममध्ये आणि बारा ज्युरर्सच्या संवादामधूनच घेतलेला आहे. कुठल्याही दृश्य 'रिलीफ' चा वापर न करता.

रचना जशीच्या तशीच ठेवूनही काही बदल करणं मला आवश्यक वाटलं. मूळ नाटक दोन अंकी आहे. प्रमाणबद्धतेसाठी रूपांतर तीन अंकी केले आहे. काही स्थानिक संदर्भ बदलले आहेत. उदाहरणार्थ, मूळ नाटकात खून आगगाडीच्या डब्यातून दिसतो. इथं, त्या मुलाची वस्ती, दोन इमारतीमधलं अंतर, इत्यादी लक्षात घेता आगगाडीला, 'ट्रॅम' हाच योग्य पर्याय होता. 'ट्रॅम'ला आणखीही एक संदर्भ होता. आपल्याकडे ज्युरीपद्धत बासष्ट साली बंद झाली. याचा अर्थ या

नाटकाचा काळ, आपल्याकडे रूपांतरीत करताना, बासष्टच्या आधीचा. ट्रॅम त्यापूर्वीच बंद झालेली असल्याने हा काळ आपोआपच सूचित झाला.

सर्वांत मोठी अडचण होती ती, ज्यूरीच्या सभासदांच्या संख्येची. अमेरिकेत ज्युरीचे सभासद बारा असले तरी आपल्याकडे ते नऊच असत. सरळ सरळ तीन व्यक्तिरेखा कमी केल्या असत्या, तर मूळ नाटकातलं बरंच काही कमी झालं असतं म्हणून मी तीन पात्रं कमी केली; परंतु त्यांचे स्वभावविशेष इतर पात्रांमध्ये, सुसंगत वाटतील, अशा रीतीनं दिले. ज्यूरर्सचे व्यवसाय आणि त्यांची सामाजिक स्थानं हीही आपल्या समाजात शोभतील अशी बदलली.

सदुसष्ट साली राज्यनाट्यस्पर्धेत उदय कला केन्द्रानं ' निखारे ' चा पहिला प्रयोग केला. प्राथमिक फेरीत मुंबईच्या रंगभवन केन्द्रातून पाहिलं आलं. विविध पारितोषिकं मिळवून गेलं. त्यात भूमिका करणारे रवीन्द्र दिवेकर, शशिकांत कारेकर, सदानंद दाते, इ. नट, रमेश चौधरी हे दिग्दर्शक आणि उदय कला केन्द्र ही संस्था, या नाटकानं एकदम प्रकाशझोतात आली. दूरदर्शनवरही त्याचा प्रयोग झाला. गेल्या पंधरा वर्षांत अधुनमधून या नाटकाचे प्रयोग होतच राहिले. नाटक अवघड असूनही प्रयोग चांगले होत. बक्षिसपात्र ठरत. कारण अशा प्रकारच्या नाटकाला हात लावणाऱ्या मंडळींना बहुधा त्यातल्या आव्हानाची कल्पना असे. गेल्याच वर्षी महाराष्ट्र बॅन्केच्या नाट्यविभागानं विविध

स्पर्धांमधून या नाटकाचे प्रयोग करुन पारितोषिकं मिळवली. या प्रयोगाचे दिग्दर्शन राजेंद्र पोफळे यांनी केलं होतं, आणि संजय दामले, दिगंबर निघोजकर, गजानन खळदकर, मधुकर मिराशी इत्यादींनी त्यात भूमिका केल्या होत्या. महाराष्ट्र बॅन्केचे हे प्रयोग प्रेक्षकांना,समीक्षकांना आवडले. वृत्तपत्रांनीही त्यांची दखल घेतली. आणि पंधरा वर्षांपूर्वीच बक्षीसपात्र नाटक आजही तितकंच यशस्वी होऊ शकतं, याची प्रचिती मिळाली. मला वाटतं, या नाटकातला सामाजिक आशय कधीच जुना होणार नाही. कारण तो एका विशिष्ट समाजाशी नसून मनुष्य स्वभावाशीच संबंधित आहे.

अनेक संस्थांनी प्रयोग करूनही या नाटकाची संहिता या ना त्या कारणानं गेली पंधरा वर्षं अमुद्रित राहिली होती. त्यामुळे एक महत्त्वाचं नाटक उगाच बाजूला पडून राहिलं आहे, अशी खंत मला वाटत असे. श्री विशाखा प्रकाशनचे श्री. राजा फडणीस यांनी नाटक प्रकाशित करून ती दूर केली. प्रयोगेच्छू संस्थांची सोय केली, आणि त्यातला सामाजिक आशय वाचकांपर्यंत पोचवला. यातून त्यांनी, रंगभूमी, साहित्य आणि समाज या तिन्हीविषयी जी आस्था दाखवली, त्याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. वेळोवेळी प्रयोग करून या नाटकावर लोभ दाखवणाऱ्या सर्वच संस्थांचा मी ऋणी आहे.

—रत्नाकर मतकरी

## रत्नाकर मतकरी यांची इतर प्रकाशित नाटके :

| | |
|---|---|
| वाऱ्यावरचा मुशाफिर | १९५९ |
| वर्तुळाचे दुसरे टोक | १९६० |
| ब्रह्महत्या | १९६७ |
| बिऱ्हाड वाजलं | १९७२ |
| प्रेमकहाणी | १९७२ |
| आरण्यक | १९७४ |
| समोरच्या घरात | १९७७ |
| अजून यौवनात मी | १९७९ |
| लोककथा ७८ | १९७९ |
| अश्वमेध | १९८० |
| दुभंग | १९८१ |
| चि. सौ. कां. चंपा गोवेकर | १९८१ |
| माझं काय चुकलं ? | १९८२ |
| जोडीदार | १९८२ |

20020
वि. नाटक 28/10/83

# अंक पहिला

एक रखरखलेली दुपार.

मुंबईतील हायकोर्टाची ज्युरी-रूम. खोली चांगली लांब-रुंद आहे. रुक्ष ओकीबोकी वाटणारी, रंग उडालेली. भिंतीत तीन खिडक्या. त्यातून फ्लोराफाऊंटनचे दृश्य दिसते. दोन दरवाजे. मध्यभागी एक मोठे जुनाट टेबल. त्याभोवती नऊ खुर्च्या, एक बाक, एक छोटे स्टुल, एखाददोन खुर्च्या अधिक. वर सिलिंग फॅन (सध्या फिरत नसलेला). भिंतीवर घड्याळ, कोट टांगण्यासाठी खुंट्या, टेबलवर पेन्सिली, पॅड्स्, अॅश-ट्र इत्यादी. छतामधे ट्यूब्स. भिंतीत स्विचबोर्ड.

पडदा उघडताना, खोली संपूर्ण रिकामी. काही वेळ नुसते ते टेबल, आणि त्या नऊ खुर्च्या यांच्यावर प्रकाश रेंगाळतो. पलीकडे खटल्याची सुनावणी संपत आली आहे. न्यायमूर्तींच्या शेवटच्या भाषणाचा शेवटचा भाग चालू आहे...

आवाज : तर ही झाली, या गुंतागुंतीच्या खटल्याची कायदेशीर बाजू. ज्युरीतील सद्गृहस्थहो, शेवटी मला, तुम्हाला एकच गोष्ट सांगावीशी वाटते. आपल्या गुन्हेगारी कोर्टामधे खून-जाणून-बुजून, विचारपूर्वक केलेला खून-हा सर्वांत मोठा गुन्हा समजला जातो. आतापर्यंतची सुनावणी आपण ऐकलेलीच आहे.

या संदर्भातल्या कायद्याची कलमंदेखील आपल्याला वाचून दाखवलेली आहेत. आता आपण आपली बुद्धी आणि आपला अनुभव पणाला लावून, खऱ्याखोट्याची पारख करायचीय आणि आरोपी दोषी आहे की निर्दोषी, ते ठरवायचं आहे. इथं एका माणसाचा खून झाला आहे, आणि तो केल्याचा आरोप त्याच्या प्रत्यक्ष मुलावर आलेला आहे. इथल्या साक्षीपुराव्याची कसोशीनं छाननी करून, आपण तो मुलगा अपराधी आहे की निरपराधी, याचा निर्णय द्यायचा आहे. (किंचित् थांबून) एक लक्षात ठेवा. आरोपीच्या गुन्ह्याबद्दल आपली जर अगदी शंभर टक्के खात्री नसेल, तर त्याला संशयाचा फायदा देऊन 'निर्दोषी' म्हणूनच सोडून द्यावं लागेल. आपल्यावरची जबाबदारी लक्षात घेऊनच आपण निर्णय द्याल, हे निश्चित. निर्णय देताना आपलं शक्यतो एकमत व्हावं, अशी माझी इच्छा आहे. मला सांगायचं होतं ते सांगून झालं. आता आपण निर्णय द्यायला मोकळे आहात.

(काही क्षण शांततेत जातात.

मग ज्युरी रूमचा दरवाजा उघडतो. कोर्टाचा कारकून आत येतो. त्याच्या हातात नावांची यादी असलेला क्लिपबोर्ड, दोन लिहिण्याची पॅड्स व पेन्सिली. पेन्सिली व पॅड्स टेबलावर ठेवून तो दरवाजाशी उभा राहातो. )

कारकून : (बाहेर पाहून) या.

(क्षणभराने ज्युरीतील सद्गृहस्थ आत येतात. प्रथम त्यांचा फोरमन आत येतो. त्याच्या मागून आणखी आठजण येतात.)

या– बसा इथं–(फोरमनला) आता तुम्हाला निर्णय लागेपर्यंत इथंच बसावं लागेल. इथनं कुठं बाहेर जाता येणार नाही. काही अडलंपडलं तर दार ठोठवा. मी दाराशीच आहे. (थांबून) दुसरं म्हणजे, तुम्हाला बाहेरच्या कुणाला भेटता येणार नाही, किंवा कुणाशी फोनवरदेखील बोलता येणार नाही. हं ! या साऱ्यांना हे नीट सांगून ठेवा.

फोरमन : सांगितलंय मी.

(कारकून आपल्या हातातील यादीवरून नजर फिरवतो. काही वेळ कुणीच कुणाशी बोलत नाही. चौथा, पेपर वाचू लागतो. आठवा खिडकीशी जाऊन ती उघडतो. सहावा सिगरेट ओढू लागतो. बाकीचे उगाच इकडे तिकडे येरझारा घालीत राहतात. नववा वृद्ध आहे, तो मात्र एका जागी नुसताच बसून राहतो. फोरमन टेबलाशी बसला आहे. सगळेच थोडेफार अस्वस्थ. एकमेकांशी बोलण्याइतकी त्यांची ओळख नाही; आणि कशी सुरुवात करावी, तेही त्यांना कळत नाही. कारकून पाचव्याच्या जवळ जाऊन त्याचे नाव बरोबर लिहून घेतो. सातवा चौथ्याला च्युइंगम देऊ लागतो. चौथा मानेनेच नको म्हणतो. तशी सातवा आठव्याकडे जातो.)

७ वा : च्युइंगम हवंय, च्युइंगम ?

८ वा : (स्मितपूर्वक) नको.

(शेवटी सातवा स्वतःच जोरजोराने च्युइंगमची वडी चावू लागतो.)

७ वा : (सहाव्याजवळ जाऊन) आजच्या पेपरात काय आलंय माहितेय ? आज म्हणे भयंकर उकडणार !

६ वा : ते पेपरात कशाला-यायला हवं ? दिसतंच आहे की !

७ वा : एअर-कंडिशन करून घ्यायला हवी नाही ही खोली ? मग मजा येईल. मग साला ज्युरीची डिस्कशन्स संपायचीच नाहीत. नाही ? (स्वतःच या विनोदावर खूष होऊन हसतो. आपण विनोदी आहोत असा त्याचा समज आहे.) काय उकडत होतं कोर्टात- जीव जायची पाळी आली होती. आपण तर बुवा एकदम खलास ! ते काळे कोट घालून वकिलांना घाम नसेल का हो येत ?

६ वा : येतो ना- विशेषतः केस हरायला लागले की !

कारकून : बराय मंडळी- काही लागलंबिगलं तर सांगा. मी आहेच दाराशी. (जातो. दाराला बाहेरून कुलुप घातल्याचा आवाज

येतो. त्या आवाजासरशी पाचवा दचकतो.)

५ वा : कुलुप लावलं? कुलुपबिलूप लावतात हे नव्हतं मला ठाऊक!

२ रा : अहो लावले म्हणजे- लावायचेच असते! तुम्हाला काय वाटले?

५ वा : मला- म्हणजे मला कल्पनाच नव्हती-अगदी कुलुप वगैरे म्हणजे-(दुसरा पाचव्याकडे 'इतकं साधं ठाऊक नाही!' अशा नजरेने पाहातो, फोरमनने पॅडचा कागद फाडून चिठ्ठया तयार केल्या आहेत.)

३ रा : काय हो फोरमन, चिठ्ठ्या कशाला केल्यात?

फोरमन : मला वाटतं,मतं घेतली म्हणजे बरं.

७ वा : मतं कशाला? तो खुनी पोरगा काय निवडणुकीला उभा आहे? ( स्वतःच्याच विनोदावर खूष होऊन इतका हसतो, की शेवटी त्याला खोकला येतो. फोरमन नुसते हसल्यासारखे करतो. मनगटावरच्या घड्याळाकडे पाहतो, व भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहतो.)

२ रा : काय हो, तो पोरगा फाशी जाईल, नाही हो? म्हणजे काय समजलात, या असल्या खुनाला फाशीशिवाय दुसरी शिक्षाच नसते; न् परत दयेसाठी अर्ज नाही करता येत. काय समजलात?

फोरमन : बिचारा अवघा एकोणीस वर्षांचा आहे!

२ रा : अहो असला म्हणून? करणी केलीन की नाही मांगासारखी? वयावर काय आहे?

( पाचवा थोडासा बुजल्यासारखा झाला आहे. तिसरा त्याच्या कडे किंचित् तुच्छतेनें पाहातो. तो लाजवटपणे हसत मान हलवतो.)

३ रा : ( मोठ्या आवाजांत ) काय, कसा काय वाटला एकंदर खटला?

५ वा : ( हळू आवाजात ) कठीण आहे सांगणं-पण तसं म्हटलं तर-खूप मजा आली, नाही?

३ रा : मजा ? हात् तुमची ! आपल्याला तर बुवा अशी झोप येत होती !

५ वा : म्हणजे–माझी तशी ही पहिलीच खेप–ज्यूरीवर जाण्याची ! तेव्हा –

३ रा : तरीच–!

( सहावा टेबलाशी जाऊन ॲश–ट्रमध्ये राख झाडतो. )

आपण खूप वेळा गेलोय ज्यूरीवर–हो ! अहो पैसे मिळतात–सोडील कोण ? पण पुरते वसूल करून घेतात. काय तो उकाडा–आणि ती वकिलांची बडबड बडबड ! काय बिशाद आहे झोप लागेल? ढेकूण हो तिथल्या खुर्च्यांत. तुम्हांला नाही चावले ?

५ वा : नाही–चावले––

३ रा : पहिलीच वेळ आहे–नसतील चावले ! (थांबून) एक पाहिलंय मी या वकिलांचं.·कितीही साधी सरळ केस असो, कीस पाडत बसल्याशिवाय यांचे समाधान नाहीच व्हायचं. आता हाच खटला घ्या ना, पोरानं बापाचा खून केला–अगदी उघडा मामला आहे. उचलायचा त्याला,नि द्यायचा फाशी. पण नाही-बसलें निष्कारण बडबड करीत. साक्षी काय नि पुरावे काय–

५ वा : ( भीतभीत॰) असं कसं, पण ? उलटसुलट–

३ रा : हो, हो, उलट सुलट दोन्ही, बाजूंचा विचार व्हायलाच हवा. नाही कोण म्हणतं ? ( थांबून त्वेषाने ) पण कधी कधी वाटतं की या मस्तवाल कारट्यांना चांगली शिक्षा व्हायला हवी. त्याशिवाय नाही त्यांना समजणार ! ( पाचवा तिसऱ्याकडे भेदरून बघतो. सातवा घोगऱ्या आवाजात हसतो.)

७ वा : ( फोरमनला ) काय, करायची का सुरुवात ?

३ रा : चला, एकदाचं संपवून टाकू, म्हणजे जो तो आपापल्या कामाला मोकळा.

५ वा : कसं बसायचं ? म्हणजे नंबराप्रमाणे का–

फोरमन : कसेही बसा. त्यात काय गोठंसं ?

( आठवा खिडकीशी उभा. विचारात मग्न. सातवा त्याच्या-जवळ जातो.)

७ वा : अरे वा, फाउंटन दिसतं की इथून !

( आठवा नुसताच मान डोलावतो.)

तुम्हाला काय वाटतं या केसमध्ये ? ( आठवा प्रश्नार्थक मुद्रेने त्याच्याकडे पाहातो.)

आपल्याला तरी बुवा फार इंटरेस्टिंग वाटली ही केस. आणि एकदम सरळ. वांध्याच्या जागा नाहीत. आणि आपल्याला खुनाचा खटला मिळाला, म्हणजे आपण लकी ! मी म्हटलं. चोरी, दरोडा, असलं काही मिळतं का—च्यायला, त्याचा एक-दम वैताग असतो ! ( खिडकीतून पाहात ) ती एलायसी ना ?

८ वा : हो.

७ वा : तुम्ही गेलाय कधी एलायसीमध्ये ? मला एकदा जायचं आहे. साला आपण जन्मभर मुम्बईत राहिलो, पण अजून एलाय-सीत नाही गेलो. तसा इन्शुअरन्स काढलाय, मेल्यावर पैसे मागायला जाईन. काय ? द्या टाळी. ( हसत हसत टाळीसाठी हात पुढे करतो. आठवा टाळी देत नाही, की हसतही नाही. तो खिडकीबाहेर पाहातच राहातो. सातवा थोडा नर्व्हस होऊन, थोडा चकित होऊन, त्याच्याकडे क्षणभर पाहात राहातो. मग दूर होतो. तिसरा दुसऱ्याशी बोलता बोलता मोठ्याने हसतो.)

२ रा : म्हणजे अगदी हद्द झाली की नाही ? सहा दिवस—असल्या फालतू गोष्टीसाठी सहा दिवस आपण कोर्टात बसलो होतो.

३ रा : आणि काय बनवाबनवी करत होता तो पोरगा ? जसं काही त्याच्यावर विश्वास ठेवायला आपण दुधखुळे आहोत.

२ रा : चेहरा कसा अगदी लहान पोरासारखा निष्पाप होता—काय समजलात, पण भारी बनेल असतात हो ही पोरे!

३ रा : चेहऱ्यावर काय आहे ? माझ्या मुलाचे डोळे तुम्ही बघायला हवेत—

२ रा : काय केलेन त्याने ?

३ रा : काही नाही. (चपापल्यासारखा गप्प बसतो. दुसरा रुमालात नाक शिंकरतो.) काय, पडसं झालं वाटतं !

२ रा : तर हो– आणि कसले जोराचे ? उन्हाळ्यातले पडसे म्हणजे मरणच ! नाकाला हात लाववत नाहीये. घरी गेल्यावर सूनबाईला सांगून चांगला झणझणीत आल्याफोद्याचा रस करून घ्यायला हवा ! (पुन्हा जोरात शिंकरतो.)

३ रा : वाः अगदी मोटारचा हॉर्न वाजल्यासारखे वाटलं. (दुसरा हसतो.) काय भयंकर उकडतंय, आणि या पंख्याला काय झालंय कोण जाणे. स्विच तर ऑन आहे. आपलं तर पंख्या-शिवाय अजिबात चालत नाही. ( वर चढून पंखा फिरवण्याचा प्रयत्न करतो ) झक्क आहे की नाही ? काय ? फिरतच नाही. सरकारी पंखा ! ( खाली उतरून ) या कॉंग्रेसच्या राज्यात पंखेसुद्धा हालायला तयार नाहीत.

(सातवा चौथ्याच्या पाठीमागे उभा राहून त्याच्या हातातला पेपर पाहू लागतो)

बघा फोरमन, तुम्हाला तरी दाद देतो का ते.

(फोरमन बाकावर चढून, पंखा चालतो की नाही, ते पाहू लागतो.)

७ वा : (चौथ्याला) आज पेपर पाहायलाच झाला नाही. विशेष काय आहे ?

४ था : कोण जाणे, मी शेअर्सचे भाव बघत होतो...

७ वा : अस्सं ? म्हणजे तुम्ही काय...

४ था : मी शेअरब्रोकर आहे.

७ वा : खरंच ! माझी पब्लिसिटी एजन्सी आहेः ‘ डंका पब्लिसिटी ’. कसं वाटलं नाव ? आमच्या मिसेसनं सुचवलं. तशी फार हुषार आहे ती... काय नवीन नवीन आयडियाज काढते,.. झालंच तर, भरतकाम उत्कृष्ट करते. आमच्या कॉलनीतल्या महिला मंडळात तिच्या भरतकामाला नेहमी पहिलं बक्षिस मिळतं...

४ था : (खवचटपणे) चांगली चालवत असाल तुम्ही पब्लिसिटी एजन्सी.

७ वा : (उपरोध लक्षात न घेता) चांगली म्हणजे काय, प्रश्नच नाही माझ्या हाताखाली बारा माणसं आहेत. आता बोला– (घड्याळाकडे पाहात, फोरमनला ) अहो फोरमन, राहू दे तो पंखा. आपण एकदाची चर्चेला सुरुवात करू या.

फोरमन : ठीक आहे. चला. आपापल्या खुर्च्यांवर बसा. (बाकावरून खाली उतरतो. सगळे सावकाश टेबलाशी जमा होतात.)

७ वा : लौकर आटपूया हो आपण. मला रात्री नाटकाला जायचंय. (पाचव्याला) 'सौभद्र' ची तिकीटं काढलीत आम्ही. सुभद्रेचं काम म्हणे कोणतरी नवीन मुलगी करतेय. कोण मंदाकिनी कोणतरी आहे. गाते साधारणच–पण दिसते काय म्हणे– वा ! म्हणजे मी पाहिलेली नाही–पण असं म्हणतात. आणि कृष्ण आपला छोटा गंधर्व आहे. 'प्रिये पहा... काय रंगवतो हो ! (म्हणून दाखवतोऽ) प्रिये–पहा रात्रीचा... तुम्ही पाहता की नाही नाटकं ? बाकी नाटकं म्हणजे जुनी संगीत नाटकंच. नाहीतर काय हो ती हल्लीची नाटकं ? जांभया येतात पाहताना ! (फोरमनला) कुठं बसू मी ?

( अशा बारीक सारीक बाबतीत दुसऱ्यांनी पुढारीपण दिलेले फोरमनला आवडते. पण अजून तरी तो थोडासा गोंधळलेलाच आहे.)

फोरमन : मला वाटतं, ज्युरीतल्या नंबराप्रमाणे बसलेलं बरं, नाही का ? (एकेक खुर्ची दाखवून) म्हणजे दुसरा इथं, तिसरा इथं. असं. म्हणजे सगळ्यांना चालणार असेल तर, अर्थात.

२ रा : कसेही बसले तरी...

४ था : वा, असं कसं ? काहीतरी शिस्त हवीच ! नंबराप्रमाण बसण बरं.

२ रा : तसे तर तसे. आपल्याला काय ..

(उठून दोन नंबरच्या खुर्चीवर बसतो. सगळे स्थिरस्थावर

झाल्यावर फोरमनच्या जिवात जीव येतो. आठवा अजूनही खिडकीबाहेर टक लावून पाहात आहे.)

६ वा : (नवव्याला) तुम्हाला तो सरकारी वकील कसा काय वाटला ?

९ वा : काय म्हणालात ?

६ वा : मी म्हटलं, तो सरकारी वकील- म्हणजे चांगलाच चाणाक्ष वाटला नाही का ? एकेक मुद्दा नुसता सटासट, सटासट मांडत होता... आणि कसा, अगदी ठासून आणि तर्काला धरून ! डोकं फार तल्लख असेल नाही त्याचं ? आपण तर बुवा एकदम खूष झालो त्याच्यावर--

९ वा : हो, तसा हुषार वाटला-

६ वा : म्हणजे काय ... प्रश्नच नाही-

७ वा : चला एकदा, लौकर आटपू.

फोरमन : (आठव्याला) तुम्ही येताय ना ?

(आठवा विचारातच. फोरमनची हाक त्याने ऐकलेलीच नाही. तो अजूनही खिडकीबाहेरच पाहात आहे.)

अहोऽशूऽ ! इकडे पाहा.

(आठवा दचकून वळतो.)

बसता ना ?

८ वा : सॉरी. माझं लक्ष नव्हतं. (येऊन बसतो).

३ रा : पाणी मिळेल का हो इथं ? उकाडा कोण पडलाय आणि तहान म्हणजे-

फोरमन : सुरुवात करायची ना ?

३ रा : इकडे आमच्या घशाला कोरड पडलीय. (पाचव्याला) तुम्ही बघता का जरा पाण्याचं ?

५ वा : (उत्साहाने, हो, हो. (जातो.)

७ वा : करू या ना सुरुवात ?

६ वा : कशी करणार ? ते बाहेर गेलेत ना ?

७ वा : ( नवव्याला ) तुम्ही पाहिलीयत की नाही संगीत नाटकं ?

९ वा : काय म्हणालात ?

७ वा : संगीत नाटकं. आपली राम मराठ्यांची, वगैरे.

९ वा : हो. पाहिलीत ना. पुष्कळ पाहिलीयत.

७ वा : कुणाची ?

९ वा : बालगंधर्वांची.

७ वा : वा, मग काय, प्रश्नच नाही. पण काय हो, खरंच का बालगंधर्व अगदी हुबेहुब बाई दिसायचे ? म्हणजे तशी आम्ही लहानपणी त्यांची नाटकं पाहिली आहेत; पण साला आता काही आठवत नाही.

( पाचवा कारकुनाला घेऊन येतो. त्यांच्यामागे एक शिपाई. तो पाण्याचा माठ आणून ठेवतो. )

२ रा : हां, हे फस्कलास झालं ! ( उठून पाणी पितो. )

फोरमन : उशीर होतोय, नाही ?

७ वा : ...आता फार वय झालं. पण तरी अजून आवाज काय आहे–

( सगळे जागेवर येऊन बसतात. फोरमन उठून भाषण करण्याची संधी घेतो. )

फोरमन : मित्रहो–( घसा खाकरतो. )आता आपल्याला विचारपूर्वक एक निर्णय घ्यायचा आहे. कोर्टात आपण संपूर्ण केस ऐकलेलीच आहे. एका एकोणीस वर्षांच्या मुलानं आपल्याच बापाचा खून केलाय. म्हणजे, केला, असा त्याच्यावर आरोप आहे–

३ रा : केलाच आहे–

फोरमन : तसं जर आपल्याला सगळ्यांना वाटलं, तर तो दोषी ठरेल. पण जर यात कुठं शंकेला जागा असली, तर त्याला संशयाचा फायदा देऊन निर्दोषी म्हणून सोडून द्यावं लागेल. ( फोरमनचे भाषण चालू असताना दुसरा व सातवा ' काय उगीच लांबण लावलीय ' अशा अर्थाचे चेहरे करतात. ) तो दोषी ठरला, तर खुनाच्या आरोपावरून सरळ फाशी जाईल. या गुन्ह्याला दुसरी शिक्षा नाहीच ! तेव्हा आपल्या निर्णयावरच त्याचं जगणं मरणं अवलंबून आहे.

७ वा : हे माहीत आहे सगळ्यांना–

फोरमन : आता निर्णय कसा घ्यायचा ? तुम्हाला सर्वांना योग्य वाटेल त्या पद्धतीनं घेऊ. म्हणजे मी काही नियम ठरवत बसत नाही. हवं तर आधी चर्चा करून मग मतं घेऊ. किंवा आधी मतं घेऊन मग चर्चा करू.

७ वा : मतं कशाला ? (थांबून ) आणि चर्चा तरी कशाला ?

फोरमन : सगळयांचं एकमत झालं, तर प्रश्नच नाही म्हणा. नाही झालं तरीसुध्दा चालेल. पण जज्ज साहेबांनी सांगितलंय की शक्य तो एकमत झालेलं चांगलं. तेव्हा ज्यांचा विरोध असेल त्यांना आपण चर्चा करून पटवून देऊ. इतकं बोलून मी आपलं भाषण–

( पाचवा उत्साहाने टाळया वाजवतो. पण दुसरे कुणीच वाजवत नाही, असे पाहून गप्प बसतो. )

६ वा : व्होटिंग घेऊन टाका झालं.

७ वा : हो–कदाचित त्यामुळं लगेच सुटका होईल.पाच मिनिटांत सगळे घरी जायला मोकळे.

फोरमन : सगळे कबूल आहेत ना व्होटिंगला ? मतं घेऊ नयेत असं कुणाला वाटतंय का ? ( सर्वांकडे पाहतो. सगळे गप्प. )

७ वा : चला–म्हणजे मतं घेण्याबद्दल तरी सर्वांचं एकमत आहे.

फोरमन : ठीक आहे. सगळे तयार आहेत ना ?– ज्यांना आरोपी 'दोषी' वाटतो, त्या सगळयांनी हात वर करावेत.

( चार–पाच हात एकदम वर जातात. एकदोन नंतर वर होतात. फोरमन हात मोजू लागतो. सगळयांच्या नजरा टेबलाभोवती फिरतात. नवव्याचा हात आता वर जातो. फक्त आठवा सोडून बाकी सर्वांचे हात वर आहेत. )

एक–दोन–पाच–सहा–आठ–आठजण : दोषी : आता निर्दोषी-

( आठवा सावकाश हात वर करतो. )

एक. बरं तर, आठ विरुध्द एक ! ( आठव्याला ) म्हणजे फक्त तुम्हाला एकटयालाच वाटतं की तो दोषी नाही.

( आठवा हात खाली करतो )

२ रा : नसती पीडा ! नेहमीचेच आहे हे. कोणी ना कोणीतरी शहाणा निघतोच. आता खोळंबा-

६ वा : ( काही वेळाने ) मग आता काय करायचं ?

९ वा : मला वाटतं, आपण चर्चा करावी.

७ वा : हं, म्हणजे उशीर.

३ रा : वैताग आहे साला ! ( चौथा सिगरेट पेटवतो. काही क्षण स्तब्धता. )

फोरमन : ( आठव्याला ) तो मुलगा निरपराधी आहे, असं खरोखरच वाटतं का तुम्हांला ?

८ वा : कोण जाणे !

३ रा : अशी उडवाउडवी करून कसं चालेल ? सरळ काय ते बोला. आमच्याबरोबर तुम्हीही कोर्टात होता. आम्ही ऐकले ते साक्षीपुरावे, तुम्हीसुध्दा ऐकलेत. तो माणूस खुनी आहे, हे अगदी उघड कळत होतं. होय की नाही ?

८ वा : माणूस ? जेमतेम एकोणीस वर्षांचा कोवळा पोरगा आहे तो.

३ रा : मग काय झालं ? एकोणीस वर्षांचा घोडा लहान का ? खुद्द स्वतःच्या बापाच्या-जन्मदात्याच्या छातीत चाकू भोसकला-- बेशरम कुठचा !

६ वा : हो, पहिल्या दिवसापासूनच सगळ्यांची खात्री झालीय.

३ रा : तर हो, खुनी माणूस काय कळल्याशिवाय राहातो ? मला तरी वाटतं, की सगळा मामला खुल्लमखुल्ला आहे. त्या सरकारी वकिलानं तर पन्नास तऱ्हांनी सिध्द करून दाखवलं. सांगू कसं ते ?

८ वा : नको, मी ऐकलंय.

२ रा : अहो, मग म्हणणे तरी काय तुमचे ते ऐकू द्या.

८ वा : काही नाही. मला या विषयावर चर्चा व्हायला हवी आहे.

७ वा : चर्चा करण्यासारखं आहेच काय त्यात ? आठ लोकांचं इथं एकमत झालंय. आम्हाला नाही चर्चा करावीशी वाटत.

२ रा : (आठव्याकडे ओणवून) काय हो, मी असे विचारतो, की त्या

वाह्यात काटर्याने कोर्टात ज्या काय थापा मारल्या, त्याच्यावर तुमचा विश्वास बसला की काय ?

८ वा : कुणास ठाऊक ? विश्वास ठेवायचा की नाही, तेच कळत नाही मला. कदाचित त्यानं सांगितलं त्यातलं अक्षरसुद्धा खरं नसेल.

५ वा : मग 'निर्दोषी' म्हणून का मत दिलंत ?

८ वा : तुम्ही आठ जणांनी त्याला 'दोषी' ठरवलंत, क्षणाचाही विचार न करता. माफ करा. पण मला नाही इतक्या चटकन काही ठरवता येत त्यातून हा त्या मुलाच्या जीवनमरणाचा प्रश्न आहे. आपण 'दोषी' म्हणून सहज हात पण उचलू. तो बिचारा तिकडे फासावर लटकेल. मग तुम्हीच सांगा. खरं खोटं पारखल्याशिवाय आपण सरळ त्याला दोषी ठरवायचं का ? मला तरी ते बरोबर नाही वाटत.

७ वा : आणि आम्हाला कोण समजता तुम्ही ? आम्हांला काय मजा वाटतेय त्याला फाशी द्यायला ?

८ वा : तसं कुठं म्हटलं मी ? तो दोषी आहे की निर्दोषी, हे एक त्या सर्वसाक्षी परमेश्वराशिवाय दुसऱ्या कुणालाच नक्की सांगता यायचं नाही. पण तो दोषी आहेच, अशी शंभर टक्के खात्री असल्याशिवाय आपण त्याला दोषी म्हणणंही चुकीचं आहे. तो गुन्हा आहे– ते पाप आहे ! जगातला कुठलाही कायदा काय सांगतो ठाऊक आहे ? शंभर अपराधी मोकळे सुटले, तरी हरकत नाही, पण एक निरपराधी फासावर जाता नये. ज्याच्या अपराधाची आपल्याला खात्री नाही, त्याला संशयाचा फायदा दिलाच पाहिजे. त्याला निर्दोषीच समजलं पाहिजे.

२ रा : (उठून) कोण सांगतं आमची खात्री नाही म्हणून ? माझी शंभर टक्के खात्री आहे की तो मुलगा दोषी आहे ! दोषी आहे ! वर्षभर जरी तुम्ही माझं मन वळवायचा प्रयत्न केलात, तरी त्याचा काही उपयोग व्हायचा नाही. अगदी दगडावरची रेघ !

८ वा : मी आपलं मन वळवायचा प्रयत्न करीत नाहीये. पण समजा– समजा आपलं सगळयांचंच म्हणा–– चुकत असलं तर ?

(क्षणभर स्तब्धता. मग)

२ रा : (उसळून) आणखी, नको का काही समजायला ? समजा, ही अख्खी बिल्डिंग आत्ताच्या आत्ता कोसळून आपल्या डोक्यात पडली तर– समजता काय, वाटेल ते येईल.

(स्तब्धता)

८ वा : तरीदेखील मला वाटतं, जिथं एका माणसाचे प्राण गुंतले आहेत, तो प्रश्न चुटकीसारखा सोडवून चालायचा नाही !

७ वा : आम्हाला मनापासून वाटतं, की तो माणूस दोषी आहे– मग कितीही वेळ विचार केला, तरी त्यात फरक काय पडायचाय ? पाच मिनिटं विचार करा, नाहीतर पाच तास करा.

८ वा : आपण एक तासभर विचार करू. तुमचं नाटक रात्री साडे-आठचं आहे ना ? मग अजून खूप अवकाश आहे.

(वर्मावर बोट ठेवले गेल्यामुळे सातवा रागावून आठव्याकडे पाहतो, आणि 'तुझ्या नादी काय लागायचं' अशा अर्थी तुच्छतापूर्वक हसतो. 'प्रिये पहा' चा एक आलाप घेतो.)

५ वा : भयंकर उकडतय, आज पाऊस पडणारसं वाटतं. चिक्कार पाऊस !

(कुणी काही बोलत नाही.)

फोरमन : (कसेबसे) कुणाला काही म्हणायचंय ? (टेबलाच्या भोवती एकेकाकडे उत्तराच्या अपेक्षेने नजर टाकतो. कुणी खांदे उडवतात. कुणी नुसतेच बसून राहतात. तो नवव्याकडे पाहतो.)

९ वा : मी तयार आहे तासभर घालवायला.

२ रा : (उपरोधाने) उत्तम ! (स्तब्धता. सहाव्याकडे वळून) परवा बरे का, काय बरे नाव, कोणत्याशा मासिकात एक झक्क चुटका आला होता. काय समजलात ? एक बाई, म्हणे, एकाचा हात धरून पळून गेली–

८ वा : (तीव्रपणे) यासाठी थांबलो नाही आपण.

२ रा : (चिडून) बरे बरे, मग कशासाठी थांबलो, ते तरी सांगून

टाका. नस्ता वेळाचा अपव्यय ! मी म्हणतो, सांगाच तुम्ही कशासाठी थांबलोय ते ? विचार करणारेत म्हणे– विचार ! त्या गुंड पोरासाठी डोकेफोड करीत बसणार, म्हणजे मोठा शहाण पणाच आहे की नाही ?

८ वा : शहाणपणा आहे की नाही, ते इतक्यातच कळायचं नाही, कदाचित कधीच कळायचं नाही. तुम्ही सगळे, वेळ वाया जाऊ नये यासाठी किती जागरूक आहात, हे पाहून बरं वाटलं ! कुठला कोण पोर तो– खुनाच्या आरोपावरून कोर्टात धरून आणलेला ! त्याचं उभं आयुष्य असं काय किंमतीचं ? आपला एक तास मात्र विलक्षण महत्त्वाचा आहे. तुमचा–आमचा सगळ्यांचा ! आपल्याला शक्य तेवढ्या लौकर घरी जायचंय. रेडिओ ऐकायचाय– नाटकाला जायचंय. मग त्या मुलाचं अख्खं आयुष्य संपलं, तरी आपल्याला तिकडे बघायला फुरसत नाही. असंच ना ? (आवाज किंचित चढवून) असंच ना ? मिस्टर फोरमन, तुम्ही जाऊन सांगा निकाल– तो पोरगा दोषी आहे. त्याला फासावर चढवा. कारण तो निर्दोषी आहे की नाही, हे पाहण्याइतका आम्हाला वेळ नाही– जा, जा म्हणतो ना ? की मी सांगू जाऊन ?

फोरमन : नको— थांबा. आपण तासभर चर्चा करू. तुमचं समाधान होईपर्यन्त करू.

८ वा : थँक्यू, थँक्यू मिस्टर फोरमन. (कळकळीने) असं पहा, त्या मुलाला आयुष्यभर सगळ्यांनी लाथाडलं. हलक्या वस्तीत तो लहानाचा मोठा झाला. आईविना. त्याच्या नवव्या वर्षी आई वारली. बाप खोटी सही करून दीड वर्ष तुरुंगात गेला. त्यावेळी हे पोरगं अनाथाश्रमात राहिलं. एकोणीस वर्षे त्याची हालात गेली, कुठं मायेचा शब्द नाही. की कुठं सुखाचा वारा नाही, असं जिणं तो एकोणीस वर्षं जगला, आणि आता— आता कदाचित त्याचं जिणं विशीच्या आत संपेलही. म्हणून मला वाटतं की त्याच्यावर थोडासा वेळ घालवून, त्याच्याबद्दल

चार शब्द बोलणं हे आपलं कर्तव्य आहे. माणूस म्हणून. त्याला आजवर जे काही सोसावं लागलं, त्याची थोडीशी भरपाई म्हणून.

२ रा : झाले तुमचे लेक्चर ? आता मी काय म्हणतो ते ऐका. माझं मत विचाराल तर आपण त्या पोराचे काही एक देणे लागत नाही. काय समजलात ? त्याची आई मेली, आणि बाप तुरुंगात गेला, याची उठाठेव आपण का करावी ? कोण लागतो हो तो आपला ? भाचा, की पुतण्या, की मेव्हणा ?

८ वा : तुमच्या मुलाबरोबरीचाच असेल तो !

२ रा : त्या मवाल्याची माझ्या मुलाशी बरोबरी करता ? अहो, ही हलकी पोरे म्हणजे रस्त्याच्या कडेला वाढलेले तण आहे तण ! दिसेल तेव्हा उपटून फेकून दिले पाहिजे ! काय समजलात ? बिलकूल गय करता कामा नये. त्यातून सरकारने त्याचा खटला रीतसर चालवलाच की फुकट ! एक दिडकीचा खर्च काही त्या पोराला पडला नाही. हे नशीब समजले पाहिजे त्याने, नशीब ! बनवतो कोणाला ? आपण काय ओळखत नाही या लोकांना ? ते बोलतात त्यातले एक अक्षर खरे नसते ! ( इतरांना ) काय समजलात ? जन्मतःच खोटारडी असतात ही माणसे !

९ वा : (एकदम) किती अडाण्यासारखं बोलताय तुम्ही.

२ रा : काय म्हणालात ? मी अडाणी ?

९ वा : दुसऱ्यांना खोटारडे म्हणताय तुम्ही– खरं बोलण्याचा मक्ता काय एकट्या तुम्हालाच दिलाय असं, वाटतं तुम्हाला ?

२ रा : मला ? उगाच वाकड्यात कशाला शिरताय ? (इतरांना) काय डोकेबिके फिरले की काय यांचे ?

९ वा : कुणाचं डोकं फिरलंय ते दिसतंच आहे. दुसऱ्याना खोटारडं म्हणायला शरम वाटली पाहिजे तुम्हाला—

२ रा : माझी शरम काढतो– (दोघेही उठून उभे राहतात. एवढ्यात आठव्याचा हात नवव्याच्या दंडावर पडतो. आठवा त्याला

सावकाश खाली बसवतो. त्याच्या नजरेत सहानुभूती आहे.)

४ था : उगाच कशाला वाद ? मला वाटतं, आपण सर्वांनीच शांत-पणानं, समंजसपणानं वागलं पाहिजे. वस्तुस्थिती काय आहे, हेच लक्षात घेतलं पाहिजे आणि त्यावरून एकदाचा काय तो निर्णय लावून टाकला पाहिजे.

फोरमन : बरोबर आहे. आता पाहा, आठजणांचं एकमत आहे. आणि या एकट्याचंच मत वेगळं आहे. त्यांनी आपलं मत तसं का आहे हे सांगावं– म्हणजे त्यांचा कुठं गोंधळ झालाय हे आपण दाखवून देऊ.

६ वा : नाहीतर असं करू या. मला एक कल्पना सुचतेय. कशी वाटते ते बघा. (आठव्याचा निर्देश करून) यांचं मत आप-ल्याला ठाऊक आहे. तेव्हा आपल्यापैकी प्रत्येकानं यांना त्यांची चूक समजावून द्यावी की झालं. फार नाही, प्रत्येकानी मिनिट दोन मिनिट बोललं तरी चालेल.

फोरमन : चालेल. प्रत्येकानं क्रमाक्रमानं बोलावं.

७ वा : कसंही बोला– पण लौकर आटपून टाका एकदा.
(तोंडातून च्युइंगम काढतो. ते कुठे ठेवावे याचा थोडा वेळ विचार करतो. मग जागा न सुचल्यामुळे खिडकीतून नेम धरून बाहेर फेकून देतो. नेम बरोबर लागताच स्वतःवरच खूष होतो.)

फोरमन : मग तुमच्यापासूनच होऊ द्या सुरुवात.

७ वा : मी ? मी काय म्हणून ? नंबराप्रमाणे बोलायचं ठरलंय.

फोरमन : बरं, तसं. प्रत्येकाला दोन दोन मिनिटं. काय ? (दुसऱ्याला) मग तुम्ही बोला पहिल्यांदा.

२ रा : (उठून, सर्वांकडे महत्त्वपूर्ण रीतीने पाहून सुरुवात करतो) म्हणजे त्याचे काय आहे– म्हणजे असे बघा– तसे शब्दांत मांडणे जरा कठीण आहे. पण मला– म्हणजे मला आपले वाटते हो, की तोच गुन्हेगार आहे. (नाक शिंकरतो) काय समज लात ? अगदी पहिल्यापासून धडधडीत दिसतेय. शिवाय ह्या

मुलाच्या बाजूचा पुरावा तरी कुठं आहे ? काय ?

८ वा : ( सावकाश ) तसा त्याच्या बाजूचा पुरावा देण्याची काही गरज नाही. त्याच्याविरुद्ध पुरावा शोधण्याची सरकारची जबाबदारी आहे. ही प्रॉसिक्युशनची केस आहे. आरोपीनं स्वतःसाठी तोंडसुद्धा उघडण्याची गरज नसते अशा केसमध्ये. तसं घटनेतच दिलेलं आहे.

२ रा : ठाऊकेय मला ते. एकट्या तुम्हालाच कायदा समजतो, असं समजू नका. पण पुराव्याचं सोडून दिलं तरी—मी सांगतो ना, तो दोषी आहे, म्हणून ? म्हणजे त्याला खून करताना प्रत्यक्ष बघितल्याची साक्ष आहे—काय समजलात ?

( मदतीसाठी आजूबाजूला पाहतो. ती मिळतेच.)

३ रा : ( उठून ) बरोबर ( २ रा खाली बसतो. मला काय वाटतं, ते सांगतो. म्हणजे त्यात पर्सनल काही नाही—त्या पोराला खुनी ठरवून मला काय चार पैसे मिळायचेत असं नाही. पण नुसता फॅक्ट काय आहे, ते पाहू या. ( थोडे थांबून ) फॅक्ट असा आहे, की जिथं खून झाला, त्याच्या बरोबर खालच्याच बिऱ्हाडात एक म्हातारा राहतो. म्हणजे चाळीच्या दुसऱ्या मजल्यावर. आता खुनाच्या रात्री, बरोबर बारा वाजून दहा मिनिटांनी त्याला वरच्या मजल्यावरून—म्हणजे खून झाला त्या खोलीतून, खूप गडबड ऐकू आली.अगदी मारामारी वगैरे चालू असल्यासारखी. मग त्या मुलाचा आवाज ऐकू आला, ' मी तुमचा जीव घेईन ' म्हणाल्याचा. सेकंदभरानंच कुणीतरी पडल्याचा आवाज झाला. तो ऐकताच म्हातारा दरवाजाशी धावत गेला तेव्हा त्याला तो मुलगा जिन्यावरून धडाधडा धावत येऊन चाळीबाहेर गेल्याचं दिसलं. थोड्या वेळानं पोलिस आले, तेव्हा त्यांना त्या मुलाच्या बापाचं प्रेत पडलेलं आढळलं.छातीत चाकू खुपसलेला होता.

फोरमन : आणि कॉरोनरनं मृत्यूची वेळ मध्यरात्रीच्या सुमाराचीच ठरवलीय.

३ रा : बरोबर. म्हणजे ही झाली वस्तुस्थिती. तिच्याकडे तर डोळेझाक करता येत नाही ! अगदी शंभर टक्के दोषी आहे तो मुलगा. तुम्हांला दया येते, आणि आम्ही अगदी निष्ठुर आहोत, असं नका समजू. आम्हालाही त्याच्याविषयी वाटतं. त्याचं वय लहान आहे. हेदेखील समजतं. पण करणार काय ? खुनी तो खुनीच !

७ वा : माझंही हेच मत आहे. ( ३ रा खाली बसतो. ४ था उठतो, चष्मा काढतो. बोलताना चष्मा हलवण्याची त्याला संवय आहे. )

४ था : मला असं वाटतं-( क्षणभर थांबून ) मला असं वाटतं, की आरोपीची सगळीच हकीगत बनावट आहे–पोकळ आहे ! त्यानं कोर्टात सांगितलं, की आपण खुनाच्या वेळी सिनेमाला गेलो होतो. आणि तासाभरानं पोलिसांनी त्याला विचारलं, तर आपण कुठला सिनेमा पाहिला, हे देखील त्याला आठवेना.

३ रा : ( उठून ) करेक्ट ! समजलं आता ! ( ४ थ्याला ) एकदम बरोबर आहे तुमचा पॉइंट ! ( बसतो. )

४ था : त्यातून त्याला कुणी सिनेमाच्या थिएटरात जाता-येताना पाहिलेला नाही.

२ रा : आणखी एक–मला आणखी एक पॉइंट आठवलाय. ( अधीरपणे) त्या बाईची साक्ष ? समोर राहाणाऱ्या ? तो तर, काय समजलांत, जबरदस्त पुरावा आहे.

६ वा : बरोबर आहे. तिनं तर प्रत्यक्ष खून होताना पाहिला.

फोरमन : ( अर्धवट उठून ) प्लीज – एकेकजण नंबराप्रमाणे बोला– ( बसतो. )

२ रा : ( हातातल्या रुमालाशी चाळा करीत ) नाही–पण हे जरा महत्त्वाचे आहे. आता ऐका हं–( नाक शिंकरतो. ) ही बाईसमोरच्या चाळीत राहणारी. ही बिछान्यात पडलीय. पण झोप येत नाहीये.–उकाडयानं जीव जातोय. म्हणून ती हवा खाण्यासाठी खिडकीत उभी राहाते.

९ वा : एक मिनिट–ती खिडकीत उभी राहिली नव्हती. तिची खाट खिडकीशेजारी होती. त्यातून पडल्यापडल्या तिला हे दिसलं.

२ रा : तेच ते. कसंही का दिसेना, पण काय दिसलं, हे महत्त्वाचं आहे. तिला हा मुलगा दिसला. बापाला चाकू मारताना. त्यावेळी घड्याळात बारा वाजून दहा मिनिटे झाली होती. सगळे काही अगदी ठीक जमतेय. काय समजलात ? बरे, त्या बाईचा काही गैरसमज-होण्याची शक्यता म्हणाल, तर तीही नाही. उभा जन्म ती त्या मुलाला ओळखत आलीय. त्याची खिडकी तिच्या खिडकीसमोर येतेय. मधे फक्त रस्ता. ही बाई शपथेवर सांगते आहे, की आपण तो खून होताना पाहिलं' ( नाक पुसतो. )

८ वा : ( शांतपणे ) रस्त्यातून जाणाऱ्या ट्रॅमच्या खिडक्यांमधून.

२ रा : असेल. ( रुमाल नाकावर धरून ) पण त्यावेळी ट्रॅममधे पॅसेंजर्स नव्हते.काय समजलांत ? वेळ रात्रीची होती. मध्यरात्रीची. ट्रॅम डेपोत चालली होती. तिच्यातले बहुतेक, दिवेदेखील मालवलेले होते. आणि कोर्टात असं सिद्ध झालंय, की दिवे मालवलेले असताना ट्रॅमच्या खिडक्यामधून आरपार दिसणं शक्य आहे. ( तिसऱ्याला ) असं मुळी सिद्धच झालंय.

८ वा : मला आपल्याला एक प्रश्न विचारायचाय.

२ रा : विचारा.

८ वा : आपला या मुलावर विश्वास नाही.

२ रा : अजिबात नाही. अहो भायखळ्याची ती सगळी हलकी वस्ती-नाना धंदे करणारे लोक आहेत ते. ते काय खरं बोलतात ?

८ वा : होय ना ? मग ही बाई त्यांच्याचपैकी आहे. ती तरी खरं बोलते कशावरून ?

२ रा : ( उत्तर न सुचल्यामुळे चिडून )हे–हे चालायचं नाही. स्वतःला फार शहाणे समजता तुम्ही, नाही का ?

(८ व्याच्या अंगावर चालून जातो. ३रा व ५ वा मधे पडतात)

फोरमन : (गोंधळलेला.) शांत व्हा– शांत व्हा पाहू.

( ३ रा व ५ वा, दुसऱ्याला बाजूला नतात.)

२ रा : (रागात) का पण इतकी हुषारी ? मी तुम्हाला सांगतो—

३ रा : इकडे या पाहू अगोदर, खाली बसा.तुम्ही कशाला त्यांच्यापायी स्वतःला त्रास करून घेताय ! (२ रा बाकावर बसतो.)

फोरमन : असं चिडून संतापून कसं चालेल ? सगळे प्रश्न शांतपणानं सोडवायला हवेत. आता कुणाची पाळी आहे बोलण्याची ?

७ वा : (५ व्याला निर्देश करून.) यांची.

फोरमन : ठीक आहे. ( ५ व्याला) तुम्हाला बोलायला दोन मिनिटं दिली आहेत.

५ वा : (बोलायला म्हणून उभा राहतो.) मला वाटतं—(थांबून) मला काही म्हणायचं नाहीये (खाली बसतो.)

फोरमन : तुमची मर्जी ! तुम्ही—(६ व्याकडे हात करतो व खाली बसतो.)

६ वा : (उठून) तसं म्हटलं, तर पहिल्यापासूनच मला वाटतंय, की खून या मुलानंच केला असला पाहिजे. पण का ? प्रत्यक्ष बापाचा खून करण्यापाठीमागे त्याचा उद्देश काय असेल ? हे काही माझ्या लक्षात येत नव्हतं. आणि तेच तर फार महत्त्वाचं असतं. उद्देश— मोटिव्ह सिद्ध झाला नाही, तर खुनाच्या आरोपाला काही अर्थच राहात नाही. पण एकदा त्याचा उद्देश सिद्ध झाला— त्याबरोबर सगळयाचा उलगडा झाला.

८ वा : कसा काय !

६ वा : आसपासच्या चाळीतल्या वगैरे लोकांची साक्ष. ती फार महत्त्वाची वाटते मला. ते असंच काहीतरी म्हणाले, नाही का, की मुलगा आणि बाप यांच्यामध्य काही बोलाचाली झाली— साधारण साताच्या सुमाराला—

७ वा : सात नाही, आठ वाजता.

८ वा : (उठून) बरोबर.आठ वाजता. आठ वाजता त्या लोकांना काही बोलाचाली ऐकू आली. पण ती कशाविषयी होती, हे काही त्यांना कळलं नाही. मग त्यांनी, बापानं मुलाला मारताना पाहिलं. दोनदा. आणि मुलगा रागारागानं घराबाहेर गेलेला

पाहिला. हे सारं खरं. पण यावरून सिद्ध काय होतं ?

६ वा : मी कुठं म्हणतोय, काही होतं म्हणून ? पण आपलं एक सांगितलं.

८ वा : तुम्ही म्हणत होता, की यामुळं खून का झाला हे तुमच्या लक्षात आलं.

६ वा : (अनिश्चितपणे) हो, असं मी म्हणालो, पण--

८ वा : का झाला ?

६ वा : त्या बापानं मुलाला मारलं.

८ वा : बस्स- एवढयावरून ? नुसतं बापानं मारलं म्हणून कुणी त्याचा खून करील ? चुकताय तुम्ही. सरकारी वकिलानंदेखील हीच चूक केली. मी म्हणतो, की बापानं दिलेला मार, हे खून करायला पुरेसं कारणच होऊ शकत नाही. कारण-(थांबून) कारण जन्मभरात त्या मुलानं बापाच्या हातचा इतका मार खाल्लाय, की, आणखी दोन थपडांमुळे त्याची खून करण्या॰ पर्यंत मजल जाणं-

४ था : (शांतपणे) त्याची सहनशक्ती संपली असेल. अति ताणलं की तुटतं. तसं झालं असेल. जन्मभर मार खाल्ल्यानंतर, या दोनच थपडासुद्धा सोसणं त्याला अशक्य झालं असेल. तोल गेला असेल त्याचा.

(८ वा ४ थ्याकडे पाहातो. एकदम त्याच्या ध्यानात येते, की हाच माणूस समजूत पटायला भारी पडेल. ४ था ज्यूरर हा मुळीच भावनावश न होता, तर्काला धरून बोलणारा मनुष्य आहे.)

फोरमन : (६ व्याला) आणखी काही म्हणायचंय तुम्हाला ?

६ वा : नाही. (कोट काढून खुंटीला टांगतो.)

फोरमन : ठीक आहे. (मग ७ व्याला) आता तुमची पाळी-

७ वा : माझी ? (थांबतो. आजुबाजूला पाहातो. खांदे उडवतो. उठून उभा राहतो.) मी नवीन काय सांगणार ? सगळं आधीच बोलून झालंय. आता जन्मभर बोलत बसलो, तरी नवीन काय निघायचंय ? एक गोष्ट उघड आहे, की ते पोर मवालीच आहे.

त्याचा रेकॉर्डच बघा ना. दहा वर्षांचा असताना त्याला, मास्तरांना दगड मारल्याबद्दल पोलिसांनी धरून नेलं होतं. पंधराव्या वर्षी त्याला रिफॉर्म स्कूल मधे ठेवलं होतं. एकदा सायकल चोरली त्यानं. गुंडगिरी करताना त्याला एकदोनदा पकडलेलं आहेच. लोक म्हणतात की या चाकू प्रकारात तर तो भलताच तरबेज आहे. आता आणखी काय हवं, बोला ? गुंड– चोरटा मवाली–

८ वा : तो मवाली न होता तरच नवल ! पाच वर्षांचा असल्यापासून बापाच्या हातचे ठोसे खाल्लेत त्यानं.

७ वा : असल्या मुलाला कुणीही मारीलच. त्याच्या बापाच्या जागी मी असतो, तरी तेच केलं असतं.

४ था : बापानं जन्मभर मारलं त्याला— खून करायला हे पुरेसं नाही का ?

८ वा : (थांबून) कुणास ठाऊक ! मी फक्त म्हणेन, की तेवढं त्याला बिघडवायला, त्याला वाईट मार्गाला लावायला पुरेसं आहे.

२ रा : असलीच झाली आहेत हल्लीची पोरे ! तिरसट, उद्धट, आडमुठी. काही इलाज चालत नाही त्यांच्यापुढे. कशी उर्मटासारखी बोलतात ! आम्ही या पोरांच्या वयाचे होतो तेव्हा वडिलांना 'तीर्थरूप' म्हणायचो. तीर्थरूप आले, तीर्थरूप गेले, असं ! काय त्यांचा धाक ? बाहेर त्यांची काठी वाजली की खुपसलीच आम्ही डोकी पुस्तकात. हल्ली म्हणतंय कोणी, वडिलांना तीर्थरूप ?

७ वा : वडिलांना आवडत नाही हल्ली असं म्हटलेलं.

२ रा : असं का ? आपल्याला काही मुलंबाळं ?

८ वा : तीन आहेत.

३ रा : मला एकच होता.

२ रा : होता ?

३ रा : म्हणजे आहे–पण घरात नाही. नसता झाला तर बरं, म्हणायची पाळी आणलीय त्यानं. ( एकदम तोल जाऊन )आहे वीस

वर्षांचा. पण या वयात नाही नाही ते शिकला. शाळा सोडून दिली. कुठनं कोणाची वाईट संगत लागली, कोण जाणे ? पण मी त्याचा जन्मदाता बाप. माझं सांगणं काही त्याला पटेना. शीक, नाहीतर कुठं उद्योगाला लाग, म्हटलं, तर होईना त्याच्यानं आणि सांगितलं म्हणून उलट माझ्यावरच हात टाकला. ( आठवणीनं थरथरत ) प्रत्यक्ष बापाच्या थोबाडीत मारली, आणि पळून गेला. गेली दोन वर्षं काही त्यानं घरात पाऊल ठेवलनं नाही. हरामखोरासाठी मी मर मर मेलो–आणि आता याचे हात गुडघ्याला पोचले. याचे हात–( थांबतो. एकदम त्याच्या लक्षात येते, की आपण हे काही बोलायला नको होते. तो ओशाळतो. दीर्घ शांतता पसरते. ३ ऱ्याच्या या स्वतः विषयी सांगण्यामुळे सगळेच अवघडून गेले आहेत. )

५ वा : ( काही वेळाने ) खरंच आज पाऊस पडून जायला हवा. चांगला झडझडून. त्याशिवाय हा उकाडा थांबायचा नाही. जीव जाईलसं उकडतंय अगदी. पाऊस पडायला हवा–पाऊस !

४ था : ( उठून ) मला वाटतं, आपला मूळ मुद्दा बाजूलाच राहतोय. ( ८ व्याकडे बोट दाखवून ) यांनी सांगितल्याप्रमाणं घटकाभर आपण असं समजू, की गलिच्छ वस्तीत राहिल्यामुळं, घरची शिस्त नसल्यामुळं त्या पोराला वाईट वळण लागलं. पण त्याला आपण काय करणार ? आपलं काम फक्त तो दोषी आहे की निर्दोषी हे ठरवण्याचं. तो तसा का झाला, याची चिकित्सा करण्याचं नव्हे. तो जन्मला, तोच मुळी बकाल वस्तीत. या असल्या वस्त्यामधली मुलं पुढं हटकून गुन्हेगार होतात; यात नवीन काय सांगितलं ? तेव्हा आपण—

२ रा : ( मधेच ) कसे बोललात, ही झोपडपट्ट्यातली आणि बकाल वस्त्यांतली मुलं मुळातच समाजाच्या मुळावर जन्मलेली असतात. समजलात ? त्यांना कसली दया दाखवायची ? अहो हे उकिरड्यावरचे किडे रोगच पसरवणार. दुसरं काय ? ( प्रथम कुणाच्या लक्षात येत नाही. पण आताचे हे सारे बोलणे ऐकून

५ वा विलक्षण दुखावला आहे. त्याचा चेहरा रागाने अणि अपमानाने लालबुंद झाला आहे. बोलताना त्याचा आवाजही थरथरतो. )

५ वा : उकिरड्यावरचे किडे ? कुणाला म्हणताय· तुम्ही उकिरड्या-वरचे किडे ? माझा सारा जन्म बकाल वस्तीत गेला ! ( ४ था घाईने खाली बसतो. आपण बोललो ते चुकले, हे एकदम २ऱ्याच्या लक्षात येते. )

२ रा : ऐकून घ्या–

५ वा : ( भयंकर तापलेला. ) उकिरड्यावर खेळूनच माझं लहानपण गेलं–

( फोरमन उठून उभा राहतो. )

कदाचित् अजूनही माझ्या अंगाला त्याची घाण येत असेल–

२ रा : ( त्याचाही पारा चढतो. ) ऐकून घ्या म्हणतो ना–

फोरमन : हे पहा, जरा समजुतीनं घ्या. इथं कोणी कुणाला लागावं म्हणून बोलत नाहीये.

५ वा : लागावं म्हणूनच बोलताहेत ! मी ओळखून आहे एकेकांना. स्वतःला मोठे शिष्ट समजतात आणि आम्ही उकिरड्यावरचे. आमचं शिक्षण, आमची धडपड, सगळं फुकट ! कां तर आम्ही पांढरपेशा कुटुंबात जन्म घेतलेला नाही ! अरे पण आम्ही-सुद्धा माणसंच आहोत ना ? (रागाने मूठी वळून खाली बसतो.)

३ रा : जाऊ द्या हो, इतकं मनाला नका लावून घेऊ. तुम्हाला नव्हते ते बोलत.

९ वा : ( हलकेच ) साहजिक आहे मनाला लागणं.

फोरमन : पुरे झाली ही वादावादी. आपला वेळ वाया जातोय. (८व्याला) आता तुमची पाळी आहे बोलण्याची.

८ वा : माझी ? मी कुठं बोलणार होतो ? तुम्ही सगळे मिळूनच मला पटवून देणार होता, होय ना ?

६ वा : बरोबर आहे, असंच ठरलं होतं.

२ रा : काय बरोबर आहे. कपाळ ? यांच्यासाठी आपण इतका वेळ

घालवला. आता यांना बोलू दे की, काय बोलायचं ते. बघू कुठवर मजल जाते.

फोरमन : अं हं– आपण ठरवलंय त्या पद्धतीनंच होऊ दे.

२ रा : कसली पद्धत ! निव्वळ पोरकटपणा आहे झालं.

फोरमन : काय म्हणालात–परत बोला बघू.

२ रा : पोरकटपणा, शुद्ध पोरकटपणा !

फोरमन : पोरकटपणा ? मी पोरकट ? सगळं शिस्तीनं होऊ दे म्हणतो, म्हणून मी पोरकट ! मग तुम्हीच व्हा फोरमन आणि चालवा काम. माझी काही हरकत नाही–घ्या जबाबदारी तुम्हीच. मी गप्प बसतो.

२ रा : इतकं चिडायला काय झालं पण ? जरा शांत व्हा–

फोरमन : तुम्ही नकोय मला शहाणपणा शिकवायला, समजलं ? एवढं असेल तर बसा इथं या खुर्चीत. चालवा हे सारं, बघू या काय उजेड पाडता ते.

२ रा : (७ व्याकडे वळून, ओशाळवाणे हसत) पाहिलंत ? आता काय सांगायचं यांना ?

फोरमन : (मोठ्याने) गंमत वाटतेय नाही तुम्हाला !

७ वा : जाऊ द्या हो, एवढं महत्त्वाचं नाही हे.

फोरमन : महत्त्वाचं नाही ? मग तुम्ही होता का फोरमन ?

७ वा : तसं नाही हो, म्हणजे तुम्ही महत्त्वाचे आहात– पण आताचा हा वादविवाद– तो महत्त्वाचा नाही म्हणतोय. तुम्ही नका लक्ष देऊ. तुम्ही अगदी व्यवस्थित सुरेख चालवताय– काही बदल नको. मी एक चुटका सांगू का याच्यावर ?

६ वा : नको नको– चुटका नको. आधीच ते रागावलेत.
(फोरमन इतरांकडे पाहातो. काहीसा शांत होऊन, काहीसा ओशाळून. त्याला दुसरा विषय काढावासा वाटतो. पण काही सुचत नाही. मग तो टेबलाकडे पाहात तसाच मख्खपणे बसून राहतो. बाकीचे त्याच्याकडे पाहतात. ६ वा सिगारेट पेटवतो.)

८ वा : ठीक आहे. मी सांगतो तुम्हाला, मला काय वाटतं ते. (थोडे

थांबून)म्हणजे मला काही विशेष सुचलंय, अशातला भाग नाही. माहिती मला तुमच्याएवढीच आहे. साक्षीपुराव्यावरून वरवर पाहिलं, तर तो मुलगा दोषी वाटतो. कदाचित असेल-सुद्धा. गेले सहा दिवस मी कोर्टात बसलो होतो. त्याच्याविरुद्ध पुरावा अधिकाधिक बळकट होत होता. प्रत्येकजण अगदी ठामपणे त्याच्याविरुद्ध बोलत होतं. विरुद्ध साक्ष देत होतं. त्याच्या बाजूनं बोलणारं, तो सरकारनंच दिलेला वकील सोडला तर कोणी नव्हतं. काडीइतकाही पुरावा त्याच्या बाजूला नव्हता. तो खुनी आहे असं निश्चित वाटत होतं. मला मात्र तेच खटकलं.

४ था : म्हणजे ?

८ वा : म्हणजे असं, की जगात काही निश्चित नसतं. ठाम नसतं. एकांगी नसतं. प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात. त्यातली एकच एक मांडणारे, खोटं बोलत असतात, किंवा स्वतःला फस-वत असतात. हा विचार मनात आला, आणि डोक्यात शंकांचं मोहोळ उठलं.

२ रा : तुम्हालाच बऱ्या सुचल्या शंका ? आरोपीचा वकील काय केळी खात बसला होता ?

८ वा : आता असं बोलू नये कुणाबद्दल. पण माझं मत विचाराल, तर तो वकील थोडा मठ्ठच होता. त्यानं पुष्कळशा गोष्टी तशाच सोडून दिल्या. छोटया छोटया गोष्टी– पण महत्त्वाच्या.

२ रा : अहो त्यानं मुद्दामच दिल्या असतील सोडून. खोलात शिरलं तर अंगाशी येईल म्हणून.

८ वा : असेल, तुम्ही म्हणता तसंही असेल, पण तो फारसा हुषार नसण्याचीही शक्यता आहेच, होय ना ?

७ वा : हो. म्हणजे आमच्या मेव्हण्यासारखा. (काहीजण हसतात.)

८ वा : (किंचित हसून) मी जर त्या मुलाच्या जागी असतो, तर नक्कीच दुसरा वकील मागितला असता. जिथं आरोपी फासा-वर लटकायची भीती आहे, तिथं त्याच्या वकिलानं म्हणजे,

सरकारी वकिलाच्या अक्षरशः चिंधड्या उडवायला हव्या होत्या. पण तो आपला हळूहळू बावळटासारखा बचावाचा एकेक मुद्दा मांडत होता.

६ वा : असंच नाही काही. या केसमध्ये त्याला विशेष सांगण्यासारखं काही नव्हतंच. केस अगदी उघड त्याच्या विरुद्ध होती.

८ वा : असं वाटतंय तुम्हाला. पण ते काही तेवढं बरोबर नाही. हे बघा, तो खून प्रत्यक्ष पाहिलेली अशी एकच व्यक्ती होती. ती समोरची बाई. होय की नाही ? त्या म्हाताऱ्यानं त्याला पळताना पाहिलं होतं. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी बोलाचाली ऐकली होती. बस्स. एवढंच की नाही ? इतर काही बारीकसारीक पुरावे होते. पण प्रॉसिक्युशनची खरी भिस्त त्या दोन साक्षीवर होती. (थांबून) आता त्या दोन साक्षीच जर चुकीच्या असतील तर ?

७ वा : चुकीच्या असतील तर, म्हणजे काय ? मग साक्षी बोलवायच्या कशाला ?

८ वा : तसं नाही. पण साक्ष चुकीची असेल, म्हणजे त्या साक्षीदारांची ऐकण्यात, पाहाण्यात, सांगण्यात, कुठं गफलत झाली असेल तर ?

६ वा : अशी कशी गफलत होईल ?

८ वा : का नाही ? तुमच्या आमच्यासारखीच तीदेखील माणसं आहेत.

७ वा : छे बुवा, आपल्याला नाही हे पटत.

८ वा : मग तुम्हाला काय वाटतं ? साक्ष अगदी बरोबर असेल ?

७ वा : हो.

८ वा : अगदी शंभर टक्के ?

७ वा : असं कसं सांगणार? ते काही गणितासारखं अचूक शास्त्र नाही. बरोबर किती, चूक किती हे सांगणं—

८ वा : (शांतपणे) हेच म्हणतोय मी.

(क्षणभर शांतता.)

३ रा : (रागानं उठून, ८ व्याला) आपण मुद्द्यावर बोलू या. प्रेताच्या छातीत पोलिसांना चाकू सापडला त्याचं काय ?

५ वा : (९ व्याचा निर्देश करून) यांचं अजून बोलून व्हायचं आहे. आपलं काय ठरलं होतं ?

३ रा : त्यांना बोलायचं असेल तेव्हा बोलतील ते. तुम्ही कशाला मधे मधे. ( ३ ऱ्याच्या या तिरसटपणाचा ५ व्याला राग येतो. पण तो बोलत नाही. ) तुमच्या त्या निष्पाप बाळानं खुनाच्या संध्याकाळी एक चाकू खरेदी केल्याचं कोर्टात कबूल केलंय. पुढं तोच चाकू प्रेताच्या छातीत सापडला. त्याचं काय ?

८ वा : सांगतो, पण आधी तो चाकू मागवून द्या. मला तो पुन्हा बघायचाय. ( फोरमनला ) जरा मागवता का ?

( फोरमन क्षणभर ८ व्याकडे पाहतो, व मग दाराशी जातो. )

३ रा : आमच्या चांगलं लक्षात आहे, तो चाकू कसा आहे ते, पुन्हा कशाला तो मागवायला हवा ?

( फोरमन दरवाजावर टिचकी वाजवतो. कारकून येतो. फोरमन त्याला हळू आवाजांत काहीतरी सांगतो. )

४ था : पाहायचा असेल तर पाहू दे. पुराव्यात हजर केलेल्या वस्तू ज्यूरर्सना केव्हाही पाहता येतात. ( ८ व्याला ) बाकी तो चाकूचा पुरावा जबरदस्त आहे नाही ? विशेषतः ज्या पद्धतीनं तो कोर्टात मांडला गेला –अं ? तुम्हाला नाही वाटत ?

८ वा : वाटतं ना ! ( फोरमन परत येऊन बसतो. )

४ था : ( उठून ) आता यातली एकेक गोष्ट वेगवेगळी पाहू या. एक : त्या मुलानं हे कबूल केलंय, की बापाचे गुद्दे खाल्ल्याबरोबर रात्री आठ वाजता तो घराबाहेर पडला.

८ वा : गुद्दे नाही, थपडा म्हणाला तो. गुद्दा आणि थप्पड यात फरक आहे.

४ था : बरं; थपडा खाल्ल्यानंतर, म्हणा, थपडा खाल्ल्यावर तो बाहेर पडला. दोन : तो सरळ एका बोहऱ्याच्या दुकानात गेला, आणि त्यानं एक मोठा चाकू विकत घेतला. तीन : तो चाकू साधा

फळं कापायचा नाही. मारामाऱ्यांमध्य वापरतात तसला आहे. त्याची मूठ विशेष प्रकारची–अधिक मजबूत आहे. कोरलेली आहे. चारः ज्या बोहऱ्यानं तो विकला, त्यानं तो चाकू कोर्टात ओळखला. एवढंच नाही, तर आपल्याकडे तसला एकच चाक होता, नि आसपासच्या दुकानातही तसला चाकू कुठं पाहायला मिळणार नाही, असे शपथवर सांगितलं. पाच : साधारण पावणे नऊच्या सुमारास एका हॉटेलसमोर त्याला तीन मित्र भेटले. (वाकून ८ व्याला) इथपर्यंत बरोबर आहे माझं ?

८ वा : हो–बरोबर आहे.

३ रा : आहे म्हणजे-शंकाच नाही त्याबद्दल. ( इतरांना ) नीट लक्ष द्या हं. अगदी अचूक सांगताहेत हे सारं! (त्याला ४ थ्याबद्दल फार आदर वाटतोय्. )

४ था : अर्धा तास तो आपल्या मित्रांशी बोलत होता. त्या मित्रांनी त्याच्याकडचा तो चाकू पाहिला. सव्वानऊ वाजता त्यानं मित्रांना सोडलं. सहा : त्या मित्रांपैकी प्रत्येकानं, मयताच्या छातीतला चाकू आणि आरोपीच्या हातात पाहिलेला चाकू एकच असल्याचं कोर्टात शपथेवर सांगितलं. सातः साडेनऊच्या सुमाराला आरोपी घरी आला.

६ वा : इथपासून पुढल्या हकिगतीत तो मुलगा आणि सरकारी वकील यांच्यात फारकत होते.

४ था : एक्झॅक्टली. तो मुलगा सांगतो,, की सव्वादहाच्या सुमाराला आपण सिनेमाला गेलो, आणि एकच्या सुमाराला परत आलो. तेव्हाच त्याला आपला बाप मरून पडलेला आढळला. पोलिसांनी त्याला लगेच धरलं. आता त्या चाकूचं काय झालं, तर त्याविषयी त्या मुलानं एक सुरस आणि चमत्कारिक कथा रचली आहे. तो म्हणतो, त्याच्या पँटच्या खिशाला एक भोक होतं, आणि त्यातून तो चाकू खाली पडला. म्हणजे सव्वादहा आणि एकच्या दरम्यान, म्हणजे रस्त्यात, किंवा सिनेमाच्या थिएटरात.

३ रा : शक्यच नाही ! तो मुलगा मुळी सिनेमाला गेलाच नव्हता.

४ था : ते तर झालंच ! कारण त्याला कुणी सव्वादहा वाजता घराबाहेर पडतानाच बघितलं नाही. आधी साडेनऊच्या शोला तो जवळजवळ साडदहाला गेला. पाहिलेल्या सिनेमाचं नाव किंवा त्यातल्या नटनट्यांची नावंदेखील त्याला सांगता आली नाहीत. ( थांबून ) खरं काय घडलं ते सांगू ? तो मुलगा रात्री घरीच राहिला. बापाबरोबर त्याची आणखी एकदा बोलाचाली झाली. बारा वाजून दहा मिनिटांनी त्यानं बापाच्या छातीत चाकू खुपसला आणि तो घराबाहेर पडला. जाता जाता चाकूवरचे बोटाचे ठसे पुसायला काही तो विसरला नाही.

( कोर्टाचा कारकून एक चाकू घेऊन येतो. त्याची मूठ कोरीव व मजबूत आहे. त्याला कोर्टाने लेबल लावले आहे. ४ था त्याच्याकडून तो चाकू घेतो. )

( कारकुनाला ) थँक्यू. (तो जातो. ८ व्याला) या खटल्याशी संबंध असलेल्या प्रत्येकानं हा चाकू ओळखला. आता तुम्हाला असं म्हणायचंय का, की खरोखरच हा त्या मुलाच्या खिशातून खाली पडला, तो कुणालातरी रस्त्यावर सापडला, आणि त्यानं त्या मुलाच्या घरी जाऊन सहज गंमत म्हणून त्याच्या वडिलांचा खून केला !

८ वा : नाही. तसं नाही म्हणायचं मला. मला एवढंच म्हणायचं होतं, की, त्या मुलाचा चाकू हरवला असणं शक्य आहे, आणि दुसऱ्या कुणीतरी तसलाच चाकू वापरला असणं शक्य आहे.

४ था : शक्य आहे. पण दुसऱ्या कुणी तसलाच चाकू वापरणं हा निव्वळ योगायोग आहे.

८ वा : योगायोग खरा, पण ते अशक्य नाही. त्यातून हा चाकू मारामारीला सोयीचा आहे. आपल्याला जरी तो नवीन वाटला, तरी तिथल्या गुंडांना याची माहिती असेल. त्यांच्यापैकी कोणी–

४ था : ते शक्यच नाही. ते शक्यच नाही. (चाकू उघडून दाखवीत )

असला दुसरा चाकू तिथं कुणी पाहिलेलाच नाही. तो बाजारातही मिळत नाही.

८ वा : असला चाकू बाजारात मिळतो.

४ था : त्या बोहऱ्यानं सांगितलं, मिळत नाही.

८ वा : मी म्हणतो, मिळतो.

३ रा : (ओरडून) खोटं बोलताय तुम्ही ! त्या पोराला वाचविण्यासाठी.

८ वा : (शांतपणे) मी खोटं बोलत नाही.

३ रा : खोटं बोलताय !

(८ वा उठून चटकन् खिशात हात घालून, हुबेहुब तसाच दिसणारा एक चाकू बाहेर काढतो, उघडतो आणि पुढे वाकून पहिल्या चाकूशेजारीच टेबलात खुपसून ठेवतो. सगळ्यांची एकच गडबड सुरू होते. ८ वा शांतपणे ते पाहात राहतो.)

६ वा : पाहिलंत ? तस्साच आहे ? तस्साच आहे हा चाकू !

५ वा : हे काय ?

७ वा : हा कुठून आला ?

२ रा : आता बोला !

३ रा : (विलक्षण चकित होऊन, ८ व्याकडे पाहात) बेत काय आहे तुमचा ?

४ था : गप्प बसा ? आधी गप्प बसा. (गडबड कमी होते. चाकू उचलून ८ व्याला) कुठं मिळाला हा तुम्हाला ?

८ वा : तिथंच, त्या मुलाच्या वस्तीत. एका लहानशा हत्यारांच्या दुकानात. काल सहज भटकता भटकता दिसला. मी घेतला विकत वीस रुपयांना.

४ था : असले चाकू परवान्याशिवाय विकत घेणं बेकायदा आहे. माहितेय ?

८ वा : कबूल. मी कायदा मोडला.

३ रा : ( ८ व्याच्या जवळ जातो. अतिशय वैतागलेला. सगळे

त्याच्याकडे चमत्कारिकपणे पाहतात.) मोठा शहाणपणा केलात. पण त्यावरून सिद्ध काय केलंत ? एक नाही– मी म्हणतो, या चाकूसारखे डझनभर चाकू बाजारात आहेत. पण यावरून सिद्ध काय होतं ?

(थांबतो. ह्याचे त्यालाच जाणवलेले आहे, की, या केसला एक लहानसा तडा गेलेला आहे.)

५ वा : (फोरमनला) बाकी तसलाच चाकू मिळवायचा म्हणजे कमाल आहे हो !

३ रा : काय कमाल आहे ? त्याला काही अर्थ तरी आहे का !

५ वा : नसेल, पण मला आपलं वाटतं...

३ रा : कमाल आहे म्हणे ! तुमचीच कमाल आहे ! ( एकदम काहीतरी सुचून ८ व्याला) आधी मुळात त्या मुलानं चाकू विकत घेतलाच कशाला, ते सांगा.

८ वा : मित्राला देण्यासाठी. त्याचा चाकू याच्या हातून पडून तुटला होता म्हणून.

३ रा : ते ऐकलंय मी कोर्टात.

९ वा : त्याच्या हातून चाकू मोडला होता, हे त्याच्या मित्रानं कबूल केलंय.

३ रा : हो– पण कधी ? खून व्हायच्या आधी तीन आठवडे. मग या प्रामाणिक मुलानं इतके दिवस तो परत न करता, परत करण्यासाठी विकत कधी घेतला ? त्याच्या बापानं त्याला थोबडल्यावर अर्ध्या तासानं, आणि पोलिसांना सापडायच्या तीन तास आधी ?

७ वा : ( हसत ) हो, नाहीतरी मित्रालाच द्यायचा होता. थोडा वापरून दिला, तर काय होणार होतं ! ( सगळे हसतात. हसणे संपेपर्यंत ८ वा थांबतो. मग– )

८ वा : मला एक सांगा. जर त्या मुलानं तुमच्या म्हणण्याप्रमाणं खुनाच्या उद्देशानं तो चाकू विकत घेतला असता, तर त्यानं तो खुनाच्या तास दोन तास आधी, रस्त्यावर मित्रांना दाख-

विला असता का ? (सगळे गप्प बसतात.)

३ रा : (चिडून उठतो) .या नुसत्या गप्पा आहेत, गप्पा ! तो मुलगा खोटं बोलतोय. त्यानंच खून केलाय. तुम्हाला सगळ्यांना हे ठाऊक आहे ! उगाच कानाडोळा करण्यात काय अर्थ आहे ?

८ वा : तो मुलगा खरं बोलतोय की खोटं, हे ईश्वरालाच ठाऊक ! मला तरी नक्की काहीच सांगता येत नाही, (दुसऱ्याला) तुम्हाला वाटतं का, की तो खोटं बोलत असेल ?

२ रा : वाटतं म्हणजे काय, प्रश्नच नाही !

८ वा : ( ४ थ्याला) तुम्हाला ?

४ था : विचारायची गरज नाही. माझं उत्तर माहितेय तुम्हाला.

८ वा : ( ५ व्याला) तुम्हाला काय वाटतं ?

५ वा : मला–म्हणजे कदाचित तो·(वाक्य अर्धवट सोडून इतरांकडे नर्व्हसली पाहतो.)

३ रा : ( त्याच्यावर चिडून ) कदाचित काय, वेड का खूळ ? (८व्याला) काय हो तुम्ही स्वतःला समजता कोण ? तुमच्याकडे काय त्या पोराचं वकीलपत्र दिलेलं आहे ? तुम्ही कोण आमची उलटतपासणी घेणारे ?

७ वा : बरोबर आहे.

फोरमन : उगाच अवांतर बोलत राहण्यात काय अर्थ आहे ? मुद्द्याचं बोला. (८ व्याला) हे काय म्हणतायत ?

२ रा : काय मिळायचेय या चर्चेतून तुम्हाला,तेच मला कळत नाहीये. तुमच्या बोलण्यानं इथे कुणाचे मन वळणार नाही. काय समजलात ? आम्ही आठजण आहोत एका बाजूला, नि तुम्ही एकटे दुसऱ्या– कसे ?

(८ वा मान डोलावतो व शांतपणे विचार करीत उभा राहतो.) सावकाश सर्वांवरून नजर फिरवतो. सरतेशेवटी त्याचा निर्णय ठरतो.)

८ वा : फोरमन, माझी एक विनंती आहे. आपण मतं घेऊ या. गुप्त मतदान पद्धतीनं. प्रत्येकानं आपापलं मत एका काग-

दाच्या कपटयावर लिहून ठेवावं. मी मत देणार नाही. अजूनही जर का आठजणांचं मत 'दोषी' असं असेल, तर मी एकटा अडवून धरणार नाही. पण एकानं जरी 'निर्दोषी' असा निर्णय दिला, तरी आपण चर्चा पुढं चालू ठेवू. (थांबून) चालेल ?

३ रा : अच्छा, अखेरीस शहाणपणा सुचला म्हणायचा !

६ वा : ठीक आहे. हे जरा पटण्यासारखं आहे.

८ वा : चला. तसं तर तसं. कुठूनही लौकर सुटका झाल्याशी कारण. सगळे आपापसात बोलतात.

फोरमन : हे बरोबर आहे. सगळयांना पटलंय ना ? (काही जण माना डोलावतात. कुणाला पटलेलं नाही ? (शांतता) ठीक आहे, पास करा. (कागदाच्या चिठ्ठया वाटतो)

(८ वा खिडकीकडे पाठ करून उभा. तो अतिशय अस्वस्थ आहे. वरवर तो शांत वाटतो खरा. पण काय होईल, आणि काय नाही, या शंकेने त्याचे मन थाऱ्यावर नाही. इकडे चिठ्ठया वाटल्या जातात. सगळे त्यांवर लिहू लागतात. चिठ्ठयांच्या घड्या करतात व फोरमनकडे देऊ लागतात. शेवटी फोरमन सगळया चिठ्ठया टेबलावर गोळा करतो. ८ व्याकडे पाहतो. पुन्हा चिठ्ठयांकडे पाहतो.)

फोरमन : (वाचीत) 'दोषी', 'दोषी', 'दोषी', 'दोषी'–'निर्दोषी'–

(३ रा एकदम चिडून उभा राहतो. ७ वा टेबलावर हात आपटतो. एकच गडबड सुरू होते. ८ व्याला हायसे वाटते, व तो खुर्चीवर येऊन बसतो.)

'दोषी' 'दोषी'–

२ रा : (रागाने) पाहिलंत ? आता काय म्हणायचं ?

७ वा : आणखी एकजण जाऊन मिळाला !

२ रा : कोण आहे तो ? बोला आधी. मला समजलेच पाहिजे.

६ वा : (२ ऱ्याला) असं नाही करता येणार. हे गुप्त मतदान

होतं. आपण आधीपासून तसं ठरवलं होतं. जर त्या गृह-स्थाला आपलं नाव गुप्त राहावं असं वाटत असेल तर--

३ रा : (उठून उभा राहतो.) गुप्त ? गुप्त कसं राहील ? मला ठाऊक आहे तो कोण·आहे ते ! (५ व्याच्या जवळ जातो. दोघांची नजरानजर होते.) हा आहे तो छुपा रुस्तुम. बाकी कमाल केलीत हो तुम्ही ? आल्याबरोबर मारे दोषी म्हणून मत दिलंत, आणि या–या नाटकी माणसानं जरा दरडावून विचारल्याबरोबर लगेच शेपूट घातलीत–

५ वा : (उठतो. रागाने लालबुंद होऊन) हे बघा मिस्टर, जास्त बोलू नका. तुम्ही कोण मला विचारणार ? मी काय म्हणून तुम्हांला सांगायचं– ( ४ था मधे पडतो, त्याला झटकून टाकीत) बाजूला व्हा. मला समजू दे हे कोण असे लागून गेलेत ते–

४ था : असू दे. तुम्ही आधी खाली बसा. त्यांच्याकडे नका लक्ष देऊ. ते तसलेच आहेत.

३ रा : तसलाच ? मी तसलाच अं ? म्हणे माझ्याकडे लक्ष नका देऊ ! मग कुणाकडे द्या– या कथेकरीबुवाकडे ?

२ रा : जाऊ द्या हो.

३ रा : का म्हणून जाऊ द्या ? त्या खुन्याला परत मोकळा सोडण्या· साठी ? अरे मग त्याचा चाकूसुद्धा परत देऊन टाका त्याला. सुटू दे त्याला मोसकत !

फोरमन : (उठून) पुरे– आरडाओरडा पुरे... कुणाला काही म्हण-ण्यासारखं सुचतंय का ?

७ वा : थांबा– आधी यांना विचारू या. (५ व्याला) तुम्ही आपलं मत का बदललंत. ते सांगाल ?

(९ वा वृद्ध ज्युरर उठून उभा राहतो. भावनावेगाने त्याचा आवाज कापरा झाला आहे.)

९ वा : त्यांनी आपलं मत बदललेलं नाही. मत मी बदललंय.

( पडदा ) ● ● ●

20020
जारक
२८/१०/८३

# अंक दुसरा

पहिल्या अंकानंतर. लगेच.

सगळ, पहिला अंक संपताना ज्या अवस्थेत होते, त्याच अवस्थेत.

९ वा : मी माझं मत बदललंय–का ते हवंय तुम्हाला ?

७ वा : कशाला ? काही गरज नाही त्याची.

९ वा : तुम्हाला गरज वाटत नसेल, पण मला वाटते. सांगून टाकतो मी.

२ रा : वा वा, साहेब व्याख्यान देताहेत, सगळे गप्प बसा.

९ वा : ( ८ व्याचा निर्देश करून ) इतका वेळ हे एकटे पडलेयत. आपल्या सगळ्यांच्या विरुद्ध. आठ जणांच्या विरुद्ध. तो मुलगा दोषी नाहीच, असं त्यांचं म्हणणं नाही. त्यांना फक्त एवढंच म्हणायचं आहे, की, तो दोषी आहेच याची आपल्याला खात्री देता येत नाही ! इतक्या वर्षांच्या अनुभवानं सांगतोय मी. बाकी सगळे विरोध करीत असताना, आपण आपल्या मताला चिकटून राहणं सोपं नाही. प्रवाहाचा विरुद्ध पोहणं भारी कठीण–भारी कठीण. अशा धाडसी माणसांना कुणीतरी पाठिंबा द्यायला हवा. नाहीतर त्यांचा सगळा प्रयत्न कोलमडून पडतो–मातीमोल होतो. म्हणून–म्हणून मी त्यांना पाठिंबा द्यायचं ठरवलंय.
( सातवा वर पाहून ' परमेश्वरा ' असा अभिनय करतो. )
या खटल्यातला मुलगा दोषी असेलही. मी नाही म्हणत नाही. पण झाली, एवढ्या चर्चेनं माझं काही समाधान

झालेलं नाही.

( ७ वा उठून सरळ पाणी प्यायला जातो. )

( चिडून ) हे बघा, मी तुमच्याशी बोलतोय. मी बोलत असताना असं मधेच उठून जायचं म्हणजे–

८ वा : ( मृदुपणे ) ते नाही ऐकायचे. कधीच नाही एकायचे.

( ९ वा मान डोलावतो व सावकाश आपल्या खुर्चीवर जाऊन बसतो. थकल्यासारखा. )

३ रा : हं–व्याख्यान संपलं असेल, तर चर्चा चालू द्या.

फोरमन : जरा थांबा. ( टेबलापाशी जाऊन दोन चाकूंपैकी लेबल-वाला उचलून तो बंद करतो. दरवाजाशी जातो. ठोठावतो. कारकून येऊन चाकू घेऊन जातो. हे होईपर्यंत, मधे जो वेळ जातो, त्यात सगळे एकमेकांशी बोलतात.)

३ रा : ( ५ व्याला ) मी जरा एकदम भडकलो मघाशी. नाही तर तसा तुम्हांला दुखवण्याचा उद्देश नव्हता माझा.

५ वा : हं.

७ वा : ( ८ च्या जवळ जाऊन ) आपण काय सेल्समन आहात वाटतं ?

८ वा : नाही. मी आर्किटेक्ट आहे.

७ वा : नसाल, पण चांगले सेल्समन व्हाल. आपलं म्हणणं दुसऱ्याच्या गळी चांगलं उतरवता येतं तुम्हांला. आपल्याला आवडलं तुमचं टेक्निक ! ( थांबून ) मी पण धंद्यात आहे, पण आपलं टेक्निक एकदम वेगळं. जोक्स बिक्स करायचे, हसवायचं, खायला प्यायला घालायचं. गिऱ्हाईक हमखास आपलंसं-होतं. कधी कधी मोठं गिऱ्हाईक असलं ना, तर ( आंगठा तोंडाशी नेऊन ) हेसुद्धा. अहो, ह्या टेक्निकनं मी गेल्या वर्षभरात नुसती लिंबाच्या लोणच्याची जाहिरात दहा हजाराची मिळवली, कल्पना करा–टेन थाउजंड ! आणि जाहिरात कसली,तर लोणच्याची–लिंबाच्या!(क्षणभर थांबून ) पण मला एक कळत नाही, तुमच्यासारखा हुषार

माणूस—आणि ह्या चर्चेत वेळ घालवतो म्हणजे—तो मुलगा खुनी आहे हे अगदी सूर्यप्रकाशाइतकं स्वच्छ आहे. ही चर्चा जितक्या लवकर गुंडाळता येईल, तितकं बरं. मला तर अशी झोप यायला लागली आहे—त्यातून रात्री नाटकाला जायचंय.

८ वा : नाटकाला जाऊन तरी काय, झोपणारच ना तुम्ही ? मग इथं झोपलं काय नि तिथं झोपलं काय – एकच !
( ७ वा त्याच्याकडे विचित्रपणे पाहातो, मग घड्याळाकडे पाहातो, आणि जागेवर येऊन बसतो. )

६ वा : काय माणसं आहेत हो ही !

८ वा : अहो, जगात सगळीकडे अशीच माणसं असतात.

६ वा : तो माणूस तर अगदी वैताग आहे बुवा ! मोठमोठ्यानं ओरडतो काय, हातवारे काय करतो! आणि स्वतःच्या मुलाबद्दल बोलत होता कसं, पाहिलंत ना ? सारं खरं असेल, पण ते इथं सांगण्याची काही गरज होती का ? अगदी चमत्कारिक वाटलं, नाही ?

८ वा : ( स्तंभित ) हूं. ( ६ व्याकडे टक लावून पाहातो. )

६ वा : आणखी बराच वेळ लागेल का हो आपल्याला ?

८ वा : कुणास ठाऊक ?

६ वा : त्यानं खून केला यात तीळमात्र शंका नाही. आपण केव्हाच हे सारं आटपून टाकायला हवं होतं. ( ८ वा गप्प. ) (त्याच्याकडे रोखून पाहात) तुम्हाला काय वाटतं, तो मुलगा निर्दोषी आहे ?

८ वा : असेलही. मला काही सांगता येत नाही.

२ रा : मी सांगतो, घोडचूक करताय तुम्ही घोडचूक. आता हे तुम्ही जितक्या लवकर गुंडाळाल, तितके चांगले. तुमचाही वेळ वाचेल अन् आमचाही !

८ वा : कल्पना करा—हा खटला तुमच्यावर चालला असता तर ?

२ रा : भलत्या सलत्या कल्पना कशाला करायच्या ? म्हणे कल्पना

करा. आणि काय हो, समजा, तुम्ही आम्हांला सगळ्यांना पटवून दिलेत, काय समजलात, की, तो मुलगा निरपराधी आहे, आणि—

८ वा : आणि काय ?

२ रा : आणि त्यानं खरोखरच बापाचा खून केला असला, मग ! ( ८ वा क्षणभर सुन्न. त्याच्या मनाल्लाही केव्हापासून हीच टोचणी लागलेली आहे. तो मुलगा निरपराधी आहे, किंवा नाही, हे त्याला माहीत नाही, कधीच समजणार नाही.)

७ वा : आजचं जेवण इथंच करावं लागणारसं दिसतंय.
(फोरमन ७ व्याकडे एक रागाचा कटाक्ष टाकतो. इतरांशी बोलू लागतो.)

फोरमन : चला– सुरुवात करू या. कोणाला बोलायचंय ?
(क्षणभर स्तब्धता. मग ४ था व ६ वा एकदम बोलू लागतात.)

४ था, ६ वा : (एकत्र) मला असं म्हणायचंय–

६ वा : (४ थ्याला) बरं, तुम्ही बोला.

४ था : (उठून) जर आपण असा विचार केला तर–(६ व्याला) नाही, नाही, तुम्हीच बोला.

६ वा : मी असं म्हणणार होतो– म्हणजे तसा छोटासा मुद्दा आहे– पण पाहा– ( ८ व्याला) त्या मुलाचा बाप त्याला चांगलं वागवत नसे, म्हणून त्यानं आपल्या बापाचा खून केला असण्याची शक्यता आहे. आता त्यानं जर खून केला नसेल, तर दुसरं कोण करणार ? दुसऱ्या कुणाला असं काही कारण होतं खून करण्याजोगं ? उगाच काही कुणी कुणाला मारत नाही.

८ वा : त्याच्याशी काही आपला संबंध नाही. आपण फक्त त्या मुलाच्या बाबतीत संशयाला जागा आहे, किंवा नाही, एवढंच ठरवायचंय. त्याला संशयाचा फायदा देता येतो, की नाही, एवढंच. दुसऱ्या कुणाला खून करायला काही कारण होतं

का नाही–काही मोटिव्ह होता का, हे आपण कशाला पाहायचं? तो पोलिसांचा प्रश्न आहे.

४ था : अगदी बरोबर. पण उघडउघड दिसत असलेली कारणं नजरेआड करून चालायचं नाही, हेही तितकंच खरं. आणि असं कारण दुसऱ्या कुणाला असेल की नाही, हेदेखील बघायला हवं. तेच तर्काला धरून होईल, नाही का? (६ व्याचा निर्देश करून) हे विचारतायत ते बरोबर आहे. ( ६ वा बसतो) कुणी तरी खून केला, हे उघड आहे. मग त्या मुलानं नाही तर कुणी?

२ रा : पिंपळावरच्या मुंजानं?

७ वा : मुंजानं का हडळीनं? (हसतो)

४ था : (चिडून) यात विनोद करण्यासारखं काही नाही, तुम्हाला जर टिंगल करण्यापलिकडे काही सुचत नसेल, तर नुसते गप्प बसून ऐका.

२ रा : रागावू नका. गंमत केली.

४ था : (८ व्याला) हं. याचं उत्तर द्या आता. दुसरं कोण त्या माणसाच्या जिवावर उठणं शक्य आहे?

८ वा : कुणीही असेल. नाहीतरी तो माणूस फारसा संभावित नव्हताच! आरोपीच्या वकिलानं ते अगदी नीट सिद्ध करून दिलंय. तो एकदा तुरुंगाची हवा खाऊन आला होता. पट्टीचा जुगारी होताच तो–त्यातून नेहमी हरायचा. आस-पासच्या चोरट्या भट्टयांना त्याचा उदार आश्रय! दारू पिऊन मारामाऱ्या तर नेहमीच्या, बाईसुद्धा ठेवली होती म्हणे त्यानं. एका नोकरीवर काही तो सहा महिन्यांपेक्षा अधिक टिकत नसे. असल्या लफडेबाज माणसाचा खून कुणीही करण्याची शक्यता आहे. त्याच्याबरोबर तुरुंगात असलेल्या कोणी–किंवा त्यानं ज्याचे पैसे बुडवले असतील, ज्याला मारलं असेल, ज्या बाईला त्रास दिला असेल, त्यांच्यातल्या कुणीही त्याचा खून केला असण्याची शक्यता आहे.

२ रा : समजलं. तो माणूस अट्टल मवाली होता– कबूल! इतकं सविस्तर सांगायची काहीही गरज नाही.

८ वा : मी काढलं नाही ते, मला प्रश्न विचारला– त्याचं मी उत्तर दिलं.

२ रा : हिंचे प्रत्येकजण अगदी वकील झालेय.

३ रा : आता मला सांगा– खालच्या मजल्यावरच्या म्हाताऱ्यानं त्या मुलाला ' जीव घेईन मी तुमचा ' असं ओरडताना ऐकलं. क्षणभरातच त्याला शरीर जमिनीवर आपटल्याचा आवाज ऐकू आला, आणि नंतर तो मुलगा जिन्यावरून धाडधाड धावत जाताना दिसला. यावर तुमचं काय म्हणणं आहे?

८ वा : त्या म्हाताऱ्यानं आधी वरच्या मजल्यावरच्या मुलाचा आवाज सिलिंगमधून कितपत स्पष्ट ऐकला असेल याबद्दल मला शंकाच आहे.

३ रा : त्यानं आवाज सिलिंगमधून ऐकला नाही, खिडकीतून ऐकला. त्याच्या खोलीची आणि वरची, अशा दोन्ही खिडक्या उघड्याच होत्या!

८ वा : तरीही वरच्या मजल्यावरून येणारा आवाज ओळखायला कठीणच. विशेषतः ओरडण्याचा आवाज!

फोरमन : पण त्या म्हाताऱ्यानं कोर्टात तो आवाज ओळखला. इतर पाच जणांच्या आवाजातून त्यानं तो ओळखला. डोळे बांधून.

८ वा : चुकताय तुम्ही, त्या म्हाताऱ्याने ओळखला तो त्या मुलाचा आवाज. त्या रात्री ऐकलेला आवाज नव्हे.

फोरमन : म्हणजे?

८ वा : म्हणजे असं बघा, तो म्हातारा त्या मुलाला उभा जन्मभर ओळखत आला. एकाच चाळीतले इतक्या वर्षांचे शेजारी ते, त्यामुळं त्याचा आवाज कोर्टात ओळखणं, म्हाताऱ्याला सोपंच होतं. पण तोच आवाज त्यानं त्या रात्री वरच्या मजल्यावरून ऐकला, याला पुरावा काय? त्याची ऐकण्यात

चूक झाली असली तर ?

फोरमन : चूक ? ती कशी काय ?

८ वा : म्हणजे त्यानं ते शब्द ऐकले असतील, आणि तो मुलगा वर आहे, हे माहित असल्यामुळे, ते तोच बोलला, असा गैरसमज आपोआप करून घेतला असेल तर ?

२ रा : मग मुलगा होताच घरात त्या म्हाताऱ्यानं माणूस कोसळल्याचा आवाज ऐकला, आणि मग अवघ्या पंधरा सेकंदाच्या आत त्या मुलाला बाहेर पळत जाताना पाहिलं. काय समजलात ? त्याच मुलाला ! ( बसतो. )

७ वा : हो, आणि ती दुसरी साक्ष ? ती पण विसरून चालायचं नाही ! ती समोरच्या चाळीतळी बाई, तिनं तर उघड्या खिडकीतून पाहिलं, त्या मुलाला, आपल्या बापाला भोसकताना. एवढंच पुरे नाही का ?

८ वा : नाही, हे पुरेसं नाही.

७ वा : आता काय सांगायचं, यांच्याशी बोलायचं, म्हणजे बंद पडलेल्या फोनमध्ये बोलण्यासारखं आहे.

४ था : त्या बाईला चालत्या ट्रॅमच्या खिडक्यांमधनं तो खून होताना दिसला. तिला तर सगळे बारीक सारीक तपशील आठवत होते. ते खोटं कसं म्हणता येईल ? मला तरी समजत नाही.

( क्षणभर शांतता, ३ रा ८ व्याकडे पाहतो. )

३ रा : ( ८ व्याला ) यावर काही म्हणायचंय तुम्हाला ?

८ वा : ( चिवटपणे ) कोण जाणे, पण मला काही ते बरोबर वाटत नाही.

३ रा : करा–विचार करा–अगदी डोकं फुटेस्तंवर विचार करीत बसा–

( पॅडवर पेन्सिलीने फुली–गोळयाचा खेळ काढून ७ व्या बरोबर खेळू लागतो. )

८ वा : ( एकदम काहीतरी सुचून ) तुम्हाला कुणाला कल्पना

आहे का चालत्या ट्रॅमला किती वेळात–

( एवढ्यात फुली–गोळयाचा खेळ चाललेला त्याच्या नज-रेस पडतो. तो पॅड खेचून घेतो. पॅड ७ व्याला परत देतो, आणि कागदाचा चोळामोळा करून, तो बास्केटमध्ये टाकतो. )

३ रा : ( चिडून ) काय चालवलंय तुम्ही ?

८ वा : इथं गंमत नाहीये चाललेली.

३ रा : ( ओरडून ) स्वतःला कोण समजता तुम्ही ? ( ८ व्याच्या अंगावर धाऊन जातो. ६ वा, ७ वा त्याला अडवतात, जागेवर आणून बसवतात. ८ वा हे शांतपणे पाहात राहातो. )

७ वा : ( ३ ऱ्याला ) जाऊ दे. काय एवढं मनावर घेता ?

फोरमन : खाली बसा पाहू सगळेजण.

३ रा : ( त्यांना झटकून टाकीत ) चांगल्या दोन ठेवून दिल्या की समजेल !

फोरमन : प्लीज, इथं मारामारीची भाषा नको.

३ रा : पण पाहिलीत का अरेरावी ? काही वाटतं का बघा त्यांना.

२ रा : ( उठून ) जाऊ दे, विसरून जा, ते काही महत्त्वाचं नाही, काय समजलात ?

३ रा : म्हणे इथं गंमत नाही चाललेली ! आम्हाला समजतात कोण हे ? शाळेतली पोरं ?

५ वा : पाऊस पडायला हवा. उकडतंय केवढं, त्यामुळे तापलेत एकेकजण, माथी गरम झाली आहेत, निखारे धगधगलेत जसे काही! पाऊस पडायला हवा! त्याशिवाय थंड नाही वाटणार!

फोरमन : ( ३ ऱ्याला ) पुरे आता ! जागेवर बसा म्हटलं ना ?

३ रा : पुरे काय–त्यांनी माझी माफी मागितली पाहिजे! (बसतो.)

६ वा : ( उठून ) बरं बरं, मागितली त्यांनी माफी. नसती कटकट. ते काय म्हणताहेत, ते ऐका आधी.

८ वा : थँक्यू. मी म्हणत होतो, की साधारण मध्यम वेगानं जाणाऱ्या

दुमजली ट्रॅमला एखाद्या विशिष्ट जागेवरून जायला किती वेळ लागेल याची कल्पना आहे का कुणाला ?

७ वा : त्याचा इथं काय संबंध ?

८ वा : ( ७ व्याला ) किती वेळ लागेल ? निदान अंदाजे ५ व्याला तुम्हाला काय वाटतं ?

५ वा : कोण जाणे, दहा नाही तर–बारा सेकंद, फार फार तर.

८ वा : साधारण बरोबर वाटतो तुमचा अंदाज. आणखी कुणाचा काही अंदाज ?

६ वा : मलादेखील दहा बारा सेकंदच बरोबर वाटतं.

७ वा : कमाल आहे! मघा मला वाटलं हे सेल्समन असतील ! पण हे तर शाळामास्तरसारखे तोंडी हिशेब घालायला लागलेत.

८ वा : ( २ ऱ्याला ) तुम्हाला काय वाटतं ?

२ रा : जर असं गृहित धरले, की ही ट्रॅम दुमजली असून तिची लांबी पंचवीस फूट आहे, आणि ती ताशी दहा मैल वेगाने जाते, तर दहा पूर्णांक बावन्नशतांश सेकंद लागतील, अजमासे.

४ था : बरं बरं, दहा सेकंद धरू ! पण म्हणायचंय काय तुम्हाला ?

८ वा : ज्या खोलीच्या खिडकीतून खून झालेला दिसला, त्या खोलीसमोरून दहा सेकंद ती ट्रॅमगाडी चाललेली होती. तुमच्यापैकी जे कोणी गिरगाव, ठाकुरद्वार, भायखळा वगैरे भागात राहिलेले असतील, त्यांना ट्रॅमचा खडखडाट केवढा असतो, हे वेगळं सांगायला नकोच. स्वतःचं बोलणंसुद्धा स्वतःला धड ऐकायला येत नाही त्या आवाजात.

३ रा : नसेल येत, पण मुद्दा काय ?

८ वा : आता दोन्ही साक्षींचा एकत्र विचार करू या. ज्या अर्थी त्या बाईनं ट्रॅमच्या खिडकीमधून तो खून होताना पाहिला, त्या अर्थी नेमक्या खुनाच्या वेळचे दहा सेकंद ती ट्रॅम त्या चाळी समोरून जात होती. त्याच वेळी त्या म्हाताऱ्यानं, ' मी तुमचा जीव घेईन' हे शब्द, आणि नंतर माणूस पडल्याचा

आवाज, हे दोन्ही ऐकले आता तुम्हीच सांगा, वरच्या मजल्यावरचे शब्द त्या म्हाताऱ्याच्या कानावर ट्रेनच्या खडखडाटामधून सहजासहजी जाणं शक्य आहे का?

(यातला मुद्दा सर्वांच्या ध्यानात येईपर्यंत काही काळ स्तब्धता)

३ रा : (रागानं उठून) हा शुद्ध मूर्खपणा आहे. त्यानं ऐकलं म्हणजे ऐकलं.

८ वा : तुम्हाला मनापासून वाटतं तसं ?

३ रा : तो म्हातारा म्हणाला, मुलगा मोठ्यानं ओरडला. मग काय हरकत आहे ऐकू न यायला ?

८ वा : ओरडण्याचा आवाज ऐकू आला असेल कदाचित्; पण ट्रेनच्या खडखडाटात तो त्या मुलाचाच आहे, हे ओळखणं कठीण. विशेषतः आधी कल्पना नसताना—नेमक्या दहा सेकंदात !

३ रा : (संतापून) सेकंदा सेकंदाच्या गोष्टी कसल्या बोलता ? इतकं अचूक कोणीच असणार नाही.

८ वा : ( शांतपणे ) असायला हवं. ज्या साक्षीनं एखाद्याच्या गळ्याभोवती फास अडकत असेल, ती तितकीच अचूक हवी.

५ वा : (उठून) मला नाही वाटत त्याला ऐकू आलं असेलच, असं.

८ वा : बहुधा नसेल. नाही म्हटलं तरी ट्रेनचा खडखडाट—

फोरमन : यांच्या म्हणण्यात तथ्य आहे !

३ रा : खूळ लागलंय तुम्हाला ! तो म्हातारा कशाला खोटी साक्ष देईल ? तसं करून मिळायचंय काय त्याला ?

९ वा : (हळूच) लोकांचं लक्ष वेधून घ्यायचं असेल !

३ रा : बाकी तुम्हाला एकएक कल्पना छान सुचतात हं. मासिकात पाठवा ! निदान एक रुपया नि एक अंक तरी मिळेल !

( ९ वा खचल्यासारखा खाली बसतो. ६ वा ३ ऱ्याकडे अत्यंत तिरस्काराने पाहात राहतो. हळुहळू तो संतापतो. हा माणूस सहसा रागावत नाही. पण एकदा रागावला की कोणाचीही भीडमुर्वत ठेवत नाही.)

६ वा : (३ ऱ्याला) काय हो, काही वाटतं का असं बोलायला ? आं ?

(३ रा त्याच्याकडे एकवार बघतो व बाजूला होतो. ६ वा (त्याचा दंड पकडून त्याला फिरवतो व त्याच्या नजरेला नजर भिडवतो.

तुमच्या वडिलांच्या वयाचे आहेत ते. समजलं ? त्यांची टिंगल करायला तुम्हाला शरम वाटली पाहिजे-

३ रा : अंगाला हात लावाल, तर खबरदार !

(५ वा ६ व्याच्या जवळ येतो व ६ व्याची नजर पाहूनच वरमून थबकतो.)

६ वा : पुन्हा असं काही बोला तर खरं, मग दाखवतो हिसका ! (३ रा असहायपणे उभा !) तुमचं हे असं वळण ! मग नवल नाही तुमच्या मुलानं...

३ रा : (दुखावलेला.) माझ्या मुलाचं नाव नका घेऊ !

६ वा : (९ व्याजवळ जाऊन) बोला. तुम्हाला काय म्हणायचंय, ते मोकळेपणानं बोला. तो म्हातारा खोटं बोलला असेल, असं का वाटतं तुम्हाला ?

(९ वा वर पाहातो. त्याला धीर आलेला आहे, दुसरा वैतागलेला. )

९ वा : कोर्टात मी त्याच्याकडे खूप वेळ पाहात होतो, बारकाईनं. लक्षपूर्वक. त्याच्या अंगात कोट तर नव्हताच. पण शर्टाची बाहीसुद्धा उसवलेली होती पाहिलंत तुम्ही. असल्या कपड्यांनी कोर्टात यायचं म्हणजे... (२ रा मुद्दामच जांभई देतो.) त्याचं बरंच वय झालेलं असावं. अगदी हळूहळू चालत तो साक्षीच्या पिंजऱ्यात जाऊन उभा राहिला, त्याचा डावा पाय अधू होता. आणि लाज वाटून तो ते व्यंग छपवण्याचा प्रयत्न करीत होता. असले पुष्कळ लोक पाहिलेत मी. ही फाटकी माणसं सदान्कदा अगदी गप्प असतात. सदैव भेदरलेली असतात. आयुष्यात कधी कुणी

त्यांना मान दिलेला नसतो. कधी त्यांचा सल्ला विचारलेला नसतो. त्यांना कोणी ओळखत नाही, की कोणी त्यांना मानीत नाही. आयुष्य हे असं बिनमहत्त्वाचं, पालापाचोळ्यासारखं जाणं, फार वाईट ! अशा माणसांना एकच एक आशा असते—कधी ना कधी तरी कुणी मला विचारील, माझं नाव घेईल, एकदा तरी माझ्या शब्दाला महत्त्व येईल.

(सगळे ऐकत आहेत. पण एकट्या ८ व्याच्या मुद्रेवर अनुकंपा दिसते. ६ व्याला अर्धवट समजते. तिसरा रागा-तच. ७ व्याला काही हे पटलेले नाही.)

मग अशा प्रसंगी– जेव्हा त्यांच्यामुळे एखाद्या गोष्टीला पार वेगळं वळण लागणार असतं, तेव्हा हे लोक असं काहीतरी सांगून खळबळ उडवून देतात. संधीचा फायदा घेतात.

७ वा : (शिष्टपणे) म्हणजे तुम्हाला असं म्हणायचं आहे, का, की, एकदा तरी आपल्या शब्दाला महत्त्व यावं, यासाठी तो सरळसरळ खोटं बोलला ?

९ वा : नाही, तो जाणुनबुजून खोटं बोलेल, असं नाही. पण कल्पना करा, त्यानं जर कोर्टात असं सांगितलं असतं, की मी नीटसं पाहिलं नाही, तर त्याच्या साक्षीला कोणी महत्त्व दिलं असतं का ? म्हणून त्यानं स्वत:चीच अशी समजूत करून घेतली असेल, की आपण खरोखरच ते शब्द ऐकले. खरोखरीच त्या मुलाला जिन्यावरून पळताना पाहिलं.

२ रा : श्रेष्ठ आहात गुरू ! अरबी भाषेतसुद्धा इतक्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी सापडणार नाहीत.

(२ रा ९ व्याकडे तुच्छतेने पाहातो. ९ वा ओशाळून मान खाली घालून बसतो. क्षणभर शांतता. ६ वा सिगरेट पेटवितो. कुणीच कुणाशी बोलत नाही. ९ वा अजूनही मान खाली घालून बसलेला. तो झुरळ असावा, अशा नज-रेनं २ रा त्याच्याकडे पाहात आहे. ५ वा दुसऱ्याकडे संता.

पाने बघत आहे. )

४ था : बस झाला हा बालीशपणानं. नुसत्या हळवेपणानं या गोष्टीचा विचार करून चालणार नाही. वाटेल त्या कल्पना लढवून काय उपयोग? प्रत्यक्ष काय घडलं, तेवढंच विचारात घ्यायला हवं.

६ वा : प्रत्यक्ष काय घडलं ते ठरवायचं कसं ? साक्षीदाराच्या सांगण्यावरूनच ना ?

(४ था ६ व्याकडे किंचित रागानें पाहातो; ७ वा फोरमनला पेपरमिंट देऊ लागतो. फोरमन त्रासिकपणं मान फिरवितो.)

७ वा : खोकल्याचं पेपरमिंट कुणाला हवंय का ?

८ वा : मला द्या !

(७ वा कृतज्ञतापूर्वक पेपरमिंट देतो.)

८ वा : (पेपरमिंट तोंडात टाकत) थँक्यू. मला आणखी एक गोष्ट सांगायची आहे. त्या मुलानं, मी तुमचा जीव घेईन, असं स्पष्ट म्हटलेलं काही त्या म्हाताऱ्यानं ऐकलं नाही, हे आता सिद्धच झालेलं आहे. पण जरी त्यानं–

२ रा : (मध्येच) असे मुळीच सिद्ध झालेले नाही. उगाच काय वाटेल ते–

८ वा : (त्याच्याकडे दुर्लक्ष करीत) पण समजा, जरी तो मुलगा तसं म्हणाला असला, तरी त्यावरून सिद्ध काय होतं ? तुम्ही आम्हीदेखील रोजच्या बोलण्यात हजार वेळा हे शब्द वापरतो ! 'जीव जाईपर्यंत बडवून काढीन', 'अमुक केलं तर जीव जाईल का ?' 'नाही दिलंस तर जीव घेईन' वगैरे वगैरे असं नेहमी बोलण्यात येतं. त्याचा अर्थ आपण लगेच खून करू, असा होत नाही !

३ रा : (रागानें) वाटेल ते काय बोलताय ? तो मुलगा चक्क, मी तुमचा जीव घेईन, म्हणाला– मोठ्यानं ओरडून म्हणाला– ते काय त्याच्या मनात तसं असल्याशिवाय ? सहज म्हटलं

असेल, असं म्हणण्यात काय अर्थ आहे ? एखादा माणूस जेव्हा इतक्या रागानं ओरडून, जीव घेईन, असं म्हणतो, तेव्हा त्याच्या मनातून खूनच करायचा असतो.

७ वा : असंच काही नाही. मला आठवतं माझा एकदा पार्टनरशी कशावरून तरी कडाक्याचा वाद झाला. तो मला ' मूर्ख ' म्हणाला,' मी त्याला 'गाढव' म्हणालो. तो म्हणाला, 'लाथ मारीन, मी ओरडलो, ' जीव घेईन. '

३ रा : पण हा मुलगा नुसता तसं म्हणून थांबला नाही, त्यानं खरंच जीव घेतला.

८ वा : अस्सं ! मग मला एक सांगा, त्याला जर खरोखरीच जीव घ्यायचा असता, तर त्यानं शेजारपाजारच्या सगळया लोकांना ऐकू जाईल, इतक्या मोठ्यानं गर्जना करून ते जाहीर केलं असतं का ? इतका बुद्दू आहे का तो ? मला नाही वाटत. कोर्टांत तरी तो चांगला हुशार वाटला मला !

३ रा : (मोठ्यानं) हुषार कसला ? त्याला शुद्ध मराठीसुद्धा बोलत नव्हतं.

९ वा : (हलकेच) त्याला बोलत नव्हता, नाही—तो बोलत नव्हता. (३ रा रागारागानं त्याच्याकडे .पाहातो, क्षणभर शांतता. ५ वा सावकाश उठून उभा राहातो, आजूबाजूला पाहातो, घसा खाकरतो.)

५ वा : माझं मत ' निर्दोषी ' असं आहे.

७ वा : काय वेड लागलंय की काय तुम्हाला ?

५ वा : माझं मत काय, ते मी सांगितलं. (३ रा मोठ्या मुष्किलीनं आपला राग आवरतो. ४ था ५ व्याकडे रोखून पहातो.)

फोरमन : म्हणजे आता, सहाला तीन, असं प्रमाण झालं.

७ वा : हद्द आहे एकेकापुढे.

(८ वा शांत आहे. ३ रा निखाऱ्यासारखा लालबुंद झाला आहे. पण संयम ठेवतो. क्षणार्धात ते एकमेकांकडे पाहातात. जसं काही ती खोली एक रणांगणच झालं आहे, आणि

एकमेकांची तोंडं आजवर कधीच न पाहिलेले ते दोघे युध्दासाठी समोरासमोर उभे आहेत. हा लढा दोन प्रवृत्तींचा आहे.)

३ रा : सारं काही उघड कळतं आहे. शेंबडं पोरसुद्धा सांगेल, की तो खून त्या पोरानंच केला आहे. त्याच्या वकिलानंसुद्धा हे पहिल्यापासून ओळखलंय. त्याच्या स्वतःच्या वकिलानं. सरळ दिसतंय.

८ वा : पुष्कळदा बऱ्याचशा गोष्टी एकत्र जमून येतात आणि एकदम असं वाटायला लागतं, की झालं, खरा खुनी साप-डला. त्याला शिक्षासुद्धा होते. आणि त्यानं दहा वर्षं तुरुंगात काढल्यावर, मग खरा गुन्हेगार उजेडात येतो.

७ वा : हे बघा, सरकारनं त्या मुलाची बाजू मांडायला वकील दिलेला होता. होय की नाही. त्याच्या बाजूनं जे काही सांगायचं होतं, ते एकदा कोर्टात सांगून झालं आहे ! मग आता तुम्ही कशाला त्याची फुकट वकिली करताय ?

५ वा : कोर्टातला वकील म्हणजे काही सर्वज्ञ नसतो.

(७ वा ५ व्याकडं असा काही पाहातो–!)

८ वा : शिवाय हा वकील तर कोर्टानं दिला होता.

७ वा : म्हणून काय फरक पडतो ?

८ वा : खूप पडू शकतो. ही केस त्या वकिलानं आपणहून चाल-वायला घेतलेली नाही. कदाचित् त्याला मुळात ही केस नकोच असेल. नाहीतरी ह्या असल्या खटल्यात वकि-लांना काय मिळायचंय ! ना नाव ना पैसा. जिंकण्याची शक्यता तर अगदी कमी. या अशा परिस्थितीत त्याला काय मोठासा उत्साह असणार, आणि तो केस तरी काय जिंकणार ?

७ वा : बाकी असली केस जिंकून दाखवायची म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वरच खाली उतरायला हवा.

( ८ वा ७ व्याकडे शांतपणे पाहातो. ७ वा त्याची

नजर टाळतो. हातावरच्या व भिंतीवरच्या घड्याळाकडे पाहातो. )

बंद करा ही चर्चा आता. किती वाजलेत ते पाहिलंत का?

( ७ व्याच्या घाईची ६ व्याला चीड येते. )

६ वा : माफ करा, पण मी काही टिपणं केली आहेत. यांचे काही काही मुद्दे फार चांगले आहेत. जे काही खटल्यात पुढं आलं, त्यावरून वरवर पाहिलं तर, मुलाचा गुन्हा शाबीत होतो. पण आपण जर अधिक खोलात जाऊन पाहिलं, तर.

२ रा : प्रस्तावना पुरे, मुद्द्यावर या.

६ वा : आपण असं धरून चालू, की त्या मुलानं खून केला. बापाच्या छातीत चाकू भोसकून, तो पळून गेला. हे झालं बारा वाजून दहा मिनिटांनी आणि पोलिसांनी त्याला कधी पकडलं तर ते एकच्या सुमाराला. तो आपल्या पायानं चालत घरी आला. तेव्हा, आता मी असं विचारतो, की बापाचा खून करून घरातून पळून गेलेला मुलगा तासाभरात घरी परत येईलच कसा? आपण पकडले जाऊ अशी, भीती नाही वाटणार त्याला?

३ रा : ( समजावून दिल्याच्या सुरात ) च-च-च, तो चाकू परत न्यायला आला होता...

( ७ वा हसतो. )

४ था : मला नाही वाटत ह्यात हसण्यासारखं काही आहे, असं. ( ६ व्याला ) त्या मुलानं तो चाकू नुकताच विकत घेत· ल्याचं त्याच्या मित्राना ठाऊक होतं. त्यांनी तो ओळखला असता. म्हणून तो पोलिसांना सापडण्याआधी तिथून नाहीसा करणं भाग होतं. त्याच्यासाठी परत आला असेल तो.

६ वा : असं असतं, तर त्यानं तो तिथं राहूच कसा दिला असता?

४ था : मला वाटतं, खून केल्याबरोबर तो भीतीनं पळून गेला. नंतर थोडंसं ताळ्यावर आल्यानंतर त्याला चाकू राहि-

त्याची आठवण झाली.

६ वा : असं कसं ? पळून जाताना चाकूवर बोटांचे ठसे राहू न देण्याइतका तो भानावर होता, मग चाकू काढून घ्यायचं तेवढं त्याला सुचू नये ?

३ रा : ( त्रासून ) हे एकएक किचकट हिशेब हवेत कशाला ? तो चाकू न्यायला आला, हे खरं.

६ वा : एका तासानं ?

३ रा : हो, एका तासानं.

६ वा : मी जर त्याच्या जागी असतो, तर एक दिवसानंसुद्धा फिरकलो नसतो. पोलिसाच्या भीतीनं घरी परतलोच नसतो. मग चाकू मिळो, अथवा न मिळो. अशा केसेसमध्ये आपण नेहमी खुनी फरारी झाल्याचं ऐकतो. तो एका तासानं रमतगमत खुनाच्या जागी परतल्याचं नव्हे.

३ रा : हे बघा– तुम्ही एकदा 'दोषी' म्हणून मत दिलयत ना ? मग आता दुसऱ्या बाजूनं कशाला बोलताय ?

६ वा : मत कुठल्या का बाजूनं असेना, विचार दोन्ही बाजूंचा व्हायला हवा.

७ वा : तो मुलगा नक्कीच परत गेला असणार. का ते सांगतो. त्याला हमखास वाटलं असणार, की खून करताना आपल्याला कुणीही पाहिलेलं नाही, आणि प्रेत काही सकाळपर्यंत कुणाला सापडत नाही.

६ वा : पाहिलं नाही, असं कसं वाटेल ? त्या समोरच्या बाईनं साक्षीत सांगितलं की खून झालेला पाहून, ती मोठ्यानं किंचाळली.

७ वा : ट्रॅम जात असताना.

६ वा : गेल्यानंतर ! कारण खून झालेला दिसला तो ट्रॅमच्या शवटच्या खिडकीमधून.

५ वा : मग तिची किंचाळी नक्कीच त्या मुलाच्या कानावर गेली असणार !

६ वा : त्यावरून आपल्याला कोणीतरी पाहिलं हे त्याच्या लक्षात आलंच असेल. ( थांबून ) मग तरीसुद्धा तो तासाभरात घरी जाईल ?

४ था : दोन मुद्दे : एक, त्या गोंधळलेल्या अवस्थेत कदाचित त्याला ती किंकाळी ऐकू आली नसेल. दोन : कदाचित ऐकूनसुद्धा, ती आपल्यासाठीच आहे, हे त्याच्या लक्षात आल नसेल. लक्षात घ्या, त्या तसल्या वस्तीत किंकाळीचं विशेष काय वाटणार ? किंकाळ्या तर नेहमीच ऐकू येत असतील तिथं !

३ रा : बरोबर ! मिळालं उत्तर.

८ वा : असेल. कदाचित त्यानं खून केला असेल. कदाचित त्याला किंकाळी ऐकू गेली नसेल. कदाचित तो घाबरून पळाला असेल. नंतर भानावर आला असेल, पोलिसांचा विचार न करता परत गेला असेल, कदाचित् हे सगळं खरं असेल, पण कदाचित् ! म्हणजे ते तसं नसण्याचीही शक्यता आहे. होय की नाही ? सारंच काही इतकं अनिश्चित आहे, की आरोपी खुनाच्या वेळी खुनाच्या जागी होता की नव्हता, हे देखील नक्की सांगता यायचं नाही.

३ रा : ( संतापून ) कशावरून नाही ? त्या म्हाताऱ्यानं काही नुस-ताच त्याचा आवाज ऐकला नाही. त्यानं त्याला खून करून जिन्यावरून धडाधडा पळताना पाहिलं. स्वतःच्या डोळ्यांनी ! काय, पाहिलं ना त्या म्हाताऱ्यानं ? पाहिलं की नाही ?

६ वा : असं तो म्हणतो.

२ रा : तो म्हणतो, म्हणजे काय ? ( इतरांना ) त्या बाईनं त्याला खून करताना पाहिलं की नाही ? ( ६ व्याची नक्कल करीत ) तर म्हणे, असं ती म्हणते ! म्हाताऱ्यानं पळताना पाहिलं की नाही ? तर म्हणे, तसं तो म्हणतो ! जसं काही लोक बोलतात, त्याला काही अर्थच नसतो.

( ६ वा उठून पाणी प्यायला जातो. त्याच्या मागोमाग

जात)तुमच्या सोयीचे तेवढेच तुम्ही घेता. काय समजलात ? बाकीचे सोडून देता वाऱ्यावर. असे कसे चालेल ? ही माणसे साक्षीच्या पिंजऱ्यात उभी होती, ती काय हवा खायला ! साक्ष म्हणजे साक्ष !

५ वा : असं कसं ? साक्षीदारांची काय चूक होतच नसेल ?

२ रा : होते ना ! तुम्हाला पाहिजे तिथे जरूर होते.

फोरमन : ( उठून ) पुरे ! आवाज नका चढवू !

२ रा : तुम्ही हेच म्हणत बसा, बस्स. म्हणे आवाज नका चढवू. खरे तर आवाज चढवण्याचीच गरज आहे इथे. हे लोक जाणून बुजून पुरावा वाटेल तसा फिरवून ठेवताहेत. काय समजलात ? किंकाळी ऐकली असेल, नाहीतर नसेल ! असा काय मोठासा फरक पडणार आहे ? खून केला म्हणजे केलाच ! बोलून चालून हे—

८ वा : पुन्हा मतं घेऊया !

२ रा : ( चिडून ) माझं बोलून संपलेलं नाही, समजलं ?

फोरमन : ( ओरडून ) मग बोला. आधी मतं घेतोय् आपण. सगळे जण जागेवर बसा.

३ रा : परत मतं घेऊन काय होणार आहे ?

फोरमन : मला माहीत नाही. त्यांना हवी आहेत मतं घ्यायला !

२ रा : उगाच वेळ फुकट जातोय् !

फोरमन : हो ना, मग बोलत बसू नका. पटकन हात वर करा, ' निर्दोषी ' असं मत असेल त्यांनी...

( ५ वा, ८ वा व ९ वा हात वर करतात.)

अजून तेच. तीन निर्दोषी विरुद्ध सहा दोषी.

७ वा : मी काय सांगत होतो ? काही फरक होणार नाही, आणखी एक आठवडा चर्चा केली तरी !

६ वा : ( सावकाश ) माफ करा. ( हात वर करतो. ) माझं मत ' निर्दोषी ' असं आहे !

७ वा : छे बुवा ! वैताग आहे.

२ रा : डोके फिरायची पाळी आली अगदी–एवढं साधं समजत नाही? अरे, तो पोर खुनी आहे, खुनी आहे ! (४ थ्याला) तुम्ही तरी सांगून पाहा त्यांना ! ( ४ था खांदे उडवतो. ) विनोदच होत चाललाय् !

फोरमन : मतं, पाच विरुद्ध चार अशी आहेत !

३ रा : गंमत आहे. इथं प्रत्येकाचं अंतःकरण अगदी त्या भिकारड्या पोरासाठी. दयेनं भरभरून वाहायला लागलंय्. म्हणजे सरकारी सौजन्य सप्ताह असतो ना, तसं. सौजन्य दाखवायचं, म्हणजे त्याला शंभर खून माफ ! ( ६ व्याला ) काय हो ? सांगा पाहू, तुम्ही का बदललंत मत ?

६ वा : गरज काय तुम्हाला सांगायची ?

३ रा : अशी उडवाउडवी करून चालणार नाही. कारण सांगा. सांगायलाच हवं !

६ वा : मला खात्री नाही वाटत ! दिला मी त्याला संशयाच फायदा !

३ रा : संशयाचा फायदा म्हणे ! संशयाचा फायदा कसला ? नुसते पोकळ शब्द आहेत, पोकळ शब्द ! सत्य हे आहे, की त्या पोरानं, (टेबलावरचा चाकू उचलून) या–या चाकूनं बापाचा खून केला. निःसंशय !

९ वा : ( शांतपणे ) हा चाकू नाही तो. एवढं विसरलात ! ( ३ रा एकदम वळून ९ व्याकडे, खाऊ का गिळू, अशा नजरेनं पाहातो. ८ वा हसतो. गालातल्या गालात. )

३ रा : ( अंगाचा भडका उडत असतानाही संयम कायम ठेवून ) वा ! काय पण हुषारी ! ( चाकू पुन्हा टेबलात खुपसून ठेवतो, आणि खिडकीशी जाऊन उभा राहातो. स्तब्धता. )

७ वा : कहर आहे बुवा ! एकेक गोष्टी हवेतल्या हवेत रचत बसलेत ( ८ व्याचा निर्देश करून ) आणि हा माणूस बुवा ग्रेट आहे. इंडिया आणि वेस्ट इंडीजची मॅच बघायला गेलं, की हा म्हणणार नक्की इंडियाच जिंकणार ( ८ व्याला ) काय

हो, त्या म्हाताऱ्याचं काय ? असंच समजायचं का, की, तो जागचा उठलाच नाही, दाराशी धावत गेलाच नाही, आणि खुनानंतर पंधरा सेकंदांच्या आत, त्यानं त्या मुलाला पळताना पाहिलंच नाही ? हे म्हणतात, त्यानं म्हणे नुसता भाव खाण्यासाठी तसं सांगितलं.

१ ला : तुमची खात्री आहे ? तो मुलगा पंधरा सेकंदांतच खाली आला ?

७ वा : अर्थात्. खून झाल्याबरोबर दुसऱ्याच क्षणी दिवे गेल्याचं त्या बाईनं साक्षीत सांगितलं आहे. चाकूवरचे ठसे रुमालानं पुसून टाकून तो मुलगा लगेच पळत सुटला.

२ रा : म्हणजे त्याला जिन्यावर यायला पंधरा सेकंद चिक्कार झाले– ( ६ वा गप्प बसतो. ) त्याच वेळी तो म्हातारा धावत धावत दाराशी गेला...

५ वा : थांबा, एक मिनिट.

७ वा : काय म्हणायचय् तुम्हाला ?

५ वा : तो म्हातारा, आपण दाराशी धावत गलो, असं म्हणाला का ?

७ वा : धावत गेला, नाही तर चालत गेला ! त्यात काय मोठंसं ? तो दाराशी पोचला ना ? मग झालं तर !

६ वा : ( उठून ) मला वाटतं, तो म्हणाला, की आपण दाराशी धावत गेलो. निदान मला तरी असं वाटतं !

५ वा : मला नाही आठवत तो काय म्हणाला ते ! पण त्याला धावता येत असेल असं काही वाटत नाही, कारण त्याचा एक पाय चांगलाच अधू होता.

४ था : तो म्हणाला, आपण झोपायच्या खोलीतून बाहेरच्या दाराशी गेलो. एवढंच पुरे आहे, नाही का ?

८ वा : जरा थांबा. त्याची झोपायची खोली कुठं होती ?

२ रा : ( खवचटपणे ) वा, तुम्हांला नाही आठवत ? आम्हांला वाटले, तुम्हाला एकूण एक गोष्ट अगदी लख्ख आठवतेय् !

८ वा : नाही. ( फोरमनला ) हे पाहा, खून झाला त्या खोलीचा नकाशा कोर्टात आणला होता, तो मला पाहायचाय् जरा.

७ वा : सगळा खटलाच का नाही घेत पुन्हा चालवायला ? म्हणजे बरं पडेल तुम्हाला.
( सिगारेट पेटवतो )

८ वा फोरमन-

फोरमन : ऐकलंय मी. ( जाऊन दरवाजा ठोठावतो. ३ रा त्वेषाने ८ व्याकडे पहातो. कारकून येतो. फोरमन हलकेच त्याला काही सांगतो, दरवाजा लावून घेऊन कारकून लगेच जातो. )

३ रा : आता नकाशा कशाला हवाय् ? एकसारख्या तुम्हालाच काय म्हणून सगळ्या गोष्टी बघायला लागतात ?

५ वा : मलासुद्धा पाहायचाय नकाशा.

४ था : आता तो मुडदा कुठं पडला, इथपासून जर तुम्हाला सगळं उकरून काढायचं असेल-

८ वा : नाही काढायचं ! म्हणजे तुम्हाला कुणाला पाहिजे असल्या-शिवाय! मला फक्त एवढंच बघायचंय की इतकं वय झालेला, आणि पायातून वारं गेल्यामुळे अधू झालेला लंगड-णारा माणूस, आपल्या बिछान्यातून उठून पंधरा सेकंदात दरवाजापर्यंत जाऊ शकेल का ?

३ रा : तो ' वीस ' सेकंदात म्हणाला.

८ वा : ' पंधरा ' म्हणाला.

३ रा : मी सांगतो ' वीसच ' म्हणाला. तुम्ही आता बदलताय्.

८ वा : नाही, पंधराच म्हणाला.

३ रा : बरं पंधरा, पण त्याला काय माहीत, पंधरा सेकंद म्हणजे नक्की किती वेळ होतो ते, त्यावरून आपल्याला काही ठरवता यायचं नाही.

९ वा : तो परत परत पंधराच म्हणाला. त्याची तशी पक्की खात्री होती.

३ रा : ( रागारागाने ) किती वय झालं होतं त्याचं ! सगळा वेळ बिचारा तो गोंधळलेला होता, तुम्ही पाहिलंत ना ? त्याच्या शब्दावर कसं विसंबून राहणार ? तो चुकीचं पण सांगत असेल. ( आपण बोलण्यात चूक केली हे त्याच्या ध्यानात येते. पण आता ती सुधारणे शक्य नाही. तो सर्वांकडे बघतो, आणि तावातावाने लांब जाऊन उभा राहातो. कारकून एक शाईने काढलेला मोठा नकाशा घेऊन येतो. )

कारकून : हाच हवा होता ना ?

फोरमन : ( नकाशा घेऊन ) हो, हो, थँक्स. (कारकून जातो.)

४ था : यावरून काय सिद्ध व्हायचंय तेच कळत नाही मला. तो म्हातारा म्हणाला, की त्याला चक्क तो मुलगा बाहेर पडताना दिसला.

८ वा : पाहूया यातला तपशील त्याच्या म्हणण्याशी जुळतोय का ते. माणूस जमिनीवर पडल्याचा आवाज त्यानं ऐकला. त्यानंतर पुढल्या दरवाजाशी पळत जाणाऱ्या पावलांचा आवाज ऐकू आला. मग दरवाजा उघडला, आणि ती पावलं जिन्यावरून उतरताना त्याला ऐकू आली. त्यानं शपथेवर सांगितलं, की आपल्याला या सगळ्या प्रकाराला अवघे पंधरा सेकंद लागले.

७ वा : डोकेफोडच करायची असेल, तर बसा अंकगणित सोडवत.

६ वा : हे बघा नाटकवाले, तुम्ही मधेमधे एकसारखं तोंड घातलंच पाहिजे का ?

२ रा : ( ८ व्याला ) बरे, आता हे आणलेय–त्याचे काय करायचेय ?

८ वा : ( फोरमनला ) घेऊ का ? ( त्याकडून नकाशा घेऊन, तो सर्वांना दिसेल अशा तऱ्हेने टेबलावर मांडतो. ) ही जागा, जिथं खून झाला, ती. त्या म्हाताऱ्याचं बिऱ्हाड बरोबर खालच्या मजल्यावर होतं–त्यामुळं खोल्यांची मांडणी हुबेहूब तशीच–जागा चाळीतली असली, तरी

पूर्वी बांधलेली. त्यामुळे पाच खोल्या–आणि त्या चांगल्या मोठ्या. ही म्हाताऱ्याची झोपायची खोली–यामध्ये तीन खोल्या–चाळीच्या नेहमीच्या बांधणीप्रमाणे एकापुढे एक अशा, आणि ही बाहेरची खोली. तिथे दरवाजा, आणि बाहेर इथं या अशा पायऱ्या. आत इथं या खोलीत हा म्हातारा झोपलेला. तो म्हणतो–आवाज ऐकताच तो उठला. सगळ्या खोल्या ओलांडून बाहेरच्या खोलीत आला. दार उघडलं, आणि पाहातो तर, तो मुलगा पायऱ्या उतरत असलेला, त्याला दिसला–इतकं बरोबर आहे माझं.

३ रा : शभराव्या वेळी एकलंय् हे तुमच्याकडून.

८ वा : ( त्याच्याकडे दुर्लक्ष करून ) आणि हे सगळं, माणूस जमिनीवर पडल्याचा आवाज ऐकल्यापासून पंधरा सेकंदांत झालं.

६ वा : बरोबर आहे.

८ वा : त्याची खाट भिंतीपाशी होती. झोपायच्या खोलीचं दार खाटेपासून बारा फुटांवर होतं, आणि उरलेल्या चार खोल्यांचं मिळून अंतर साडेत्रेचाळीस फूट होतं. आता तो बिछान्यातून उठला. बारा फूट अधिक साडेत्रेचाळीस फूट चालला, आणि पुढच्या दाराशी येऊन त्यानं ते उघडलं. हे सगळं पंधरा सेकंदांत झालं असेल ?

२ रा : झाले असेल म्हणजे ? झालेच.

६ वा : कसं शक्य आहे ? तो म्हातारा किती सावकाश चालत होता ! साक्षीच्या पिंजऱ्यात त्याला धरून आणावं लागलं.

३ रा : तुम्ही असं भासवताय् की जसं काही केवढं अंतर त्याला चालायचं होतं ! तेवढं काही ते जास्त नव्हतं.

९ वा : पायातून वारं गेलेल्या म्हाताऱ्या माणसाला ते जास्तच आहे. ( ८ वा खुर्ची हलवून, ती, खाट म्हणून मांडतो. )

२ रा : हे काय करताय ?

८ वा : आपण हे प्रत्यक्ष करून पाहू. बघू या तरी खरोखरच किती वेळ लागला असेल ते.

फोरमन : असं कसं जमेल ?

३ रा : आणि तुम्ही कोण करून पाहणारे ? इतकं जर ते महत्त्वाचं होतं, तर त्या मुलाच्या वकिलानं का नाही करून पाहिलं ?

५ वा : त्याला सुचलं नसेल.

२ रा : सुचलं नसेल म्हणजे काय ? तो वकील खुळाबिळा आहे की काय ? ही अगदी ढोबळ गोष्ट आहे. कुणाच्याही ध्यानात येण्यासारखी.

५ वा : तुम्हाला सुचली होती का ?

२ रा : हे बघा, अतिशहाणे नका होऊ. मला सुचण्याचा संबंध कुठे येतो ?

फोरमन : जाऊ दे, जाऊ दे.

२ रा : वकिलानं कोर्टात ही गोष्ट काढली नाही, कारण केसलाच धक्का बसला असता. काय समजलात ?

फोरमन : पुरे म्हणतोय् ना !

८ वा : आणखी एक कारण आहे. ( पाचव्याला ) वकिलानं जर हे कोर्टात करून पाहिलं असतं, तर त्या म्हाताऱ्याला उगीच त्रास द्यावा लागला असता, आणि मग त्या मुलानं ज्युरीची सहानुभूती गमावली असती. यासाठी बरेच सरकारी वकील टाळतात या गोष्टी.

७ वा : पण ही इतकी महत्त्वाची गोष्ट टाळायची, म्हणजे तो वकील अगदी कुचकामीच म्हटला पाहिजे.

८ वा : ते तर म्हटलंच मी सुरुवातीला.
( ७ व्याला आपण कुठून तोंड उघडले असे होते.)
अच्छा, असं समजू की, या खुर्च्या म्हणजे ती खाट. हं–हे बारा फूट सोडले, ( अंदाजे बारा फूट लांब जातो. ) ही इतकी झोपायची खोली !

३ रा : काय वेडं का खूळ ? असं काय करून पाहाता येणार आहे ?

६ वा : करू दे त्यांना.

९ वा : करू दे, करू दे .

८ वा : कुणीतरी एक खुर्ची द्या. ( ७ वा त्याला खुर्ची देतो. ) ( खुर्ची खाली ठेवीत ) हे झोपायच्या खोलीचं दार. बाकीचं अंतर साडेत्रेचाळीस फूट आहे. म्हणजे तिथपर्यंत मला तीन फेऱ्या कराव्या लागतील. (अंतर मोजून घेतो.)

२ रा : कळस आहे मूर्खपणाचा. सगळ्यांचा कितीतरी वेळ फुकट जाणार आहे यात.

८ वा : फार नाही.तुमच्या म्हणण्याप्रमाणे फक्त पंधरा सेकंद. एक खुर्ची द्या. ( सहावा देतो. ती ठेवत ) हे बाहेरचं दार असं समजू. साक्षीत सांगितल्याप्रमाणं ते लावलेलं होतं. आता सेकंद काटा असलेलं घड्याळ आहे कुणाजवळ ?

६ वा : माझ्याजवळ आहे.

८ वा : सुरू करायच्या वेळेला पाय वाजवा—तो आवाज आपण माणूस कोसळल्याचा समजू. तिथपासून वेळ मोजा.

७ वा : आणि एक आकडा मनात धरा. त्याला तेरानं गुणा—

३ रा : आपण तरी असला खुळचटपणा जन्मात पाहिला नव्हता.

८ वा : हं. मी तयार आहे ! (सगळे लक्षपूर्वक पाहातात. ६ वा घड्याळाकडे पहात राहतो. जाचक स्तब्धता.)

२ रा : हं. करा सुरू—

६ वा : सेकंद काटा बारावर यायला पाहिजे त्यासाठी थांबलोय् मी. ( सगळे स्तब्ध राहून पाहातात. एकदम ६ वा पाय आपटतो. ८ वा उठून बसतो. पाय खाली सोडतो. उभा राहतो. ६ वा घड्याळाकडे लक्ष ठेवतो, ८ वा अधू पायाच्या वृद्धाने चालावे, तसे, खुरडत खुरडत पाय ओढत सगळे अंतर चालतो.)

२ रा : जरा भरभर—तो नक्कीच इतक्या हळू चालला नसेल.

९ वा : कोर्टात याहीपेक्षा अधिक सावकाश चालला तो.

८ वा : तुम्हाला हवं असेल तर मी आणखी भरभर चालतो. ( वेग

थोडासा वाढवतो.)

३ रा : ( असह्य होऊन ) लवकर आटपा एकदाचा हा पोरखेळ. ( ८ वा शेवटच्या खुर्चीपर्यंत येतो व काल्पनिक दरवाजा उघडतो. )

८ वा : थांबा.

६ वा : बरोबर.

८ वा : किती वेळ झाला ?

६ वा : दहा पंधरा–वीस तीस–चाळीस, बरोबर बेचाळीस सेकंद.

९ वा : बेचाळीस सेकंद ? (सगळे आश्चर्यचकित होऊन एकमेकांशी बोलू लागतात.)

५ वा : असं कसं झालं ?

८ वा : मी सांगतो, कसं झालं ते. ( थांबून ) त्या म्हाताऱ्यानं आधीच केव्हातरी बापलेकाची बोलाचाली ऐकली. नंतर बिछान्यावर पडल्या पडल्या काहीतरी पडल्याचा आवाज ऐकला,आणि समोरच्या बाईची किंकाळी ऐकली. तो उठला. दाराशी गेला. जाताजाता त्यानं कुणीतरी धडधडत जिन्यावरून गेल्याचं ऐकलं, आणि तो मुलगा गेला, असा समज करून घेतला.

६ वा : शक्य आहे असं होणं.

३ रा : (ओरडून ) शक्य आहे म्हणे–शक्य आहे ! मी म्हणतो, ही शुद्ध लबाडी आहे. लुच्चेगिरी, बनवाबनवी आहे ! ( ८ व्यासमोर हात नाचवीत ) तुमची हातचलाखी या बाकीच्या भोळसटांपुढे चालली असेल, पण बच्चंजी, माझ्यापुढे तुमचं काही चालणार नाही, समजलं ? ( इतरांना ) अरे, तुम्ही असे मढ्यासारखे गप्प का राहिलाय ? काय झालंय काय तुम्हाला. एवढं कसं कळत नाही तुम्हाला की त्या पोरानं बापाचा खून केलाय ? त्याला जिवंत राहू देऊ नका. तो खुनी कार्टा हातातून निसटतोय. त्याला असं सोडू नका !

८ वा : (शांतपणे) सोडू नका, म्हणजे—तुम्हांला त्याला फासावर लटकवायचं आहे.

३ रा : अर्थात् ! असला बापाला मारणारा पोर फासावर चढला तर मी आनंदानं पेढे वाटीन.

८ वा : मला दया यते तुमची !

३ रा : माझी दया ? ती काय म्हणून ?

८ वा : ईश्वरानं तुम्हांला फत्ताराचं काळीज दिलंय म्हणून ! ते कोवळं पोर फाशी गेल्यावर पेढे वाटणार तुम्ही. कसला राक्षसी आनंद हा ?

३ रा : गप्प बसा ! एक शब्द अधिक बोललात तर बघा !

८ वा : ( त्याला अधिक चिडवीत ) राक्षस ! माणसाच्या रक्ताला चटावलेले राक्षस आहात तुम्ही !

३ रा : ( ओरडून ) मी सांगून ठेवतोय गप्प बसा तुम्ही

८ वा : ओरडा ! खुशाल मोठ्यानं ओरडा, आणि जगाला जाहीर करा तुमची पापी–विकृत इच्छा !

३ रा : ( मोठ्यानं ओरडून ) तोंड बंद करा !

८ वा : माणूस दिसला, की हल्ला करणाऱ्या पशूंची जात तुमची. पशू ! राक्षस !

३ रा : तोंड बंद कर हरामखोरा ! (८ व्यावर धावून जातो. ८ वा जागच्या जागी उभा. ५ वा आणि ६ वा ३ ऱ्याला जागच्या जागी धरून ठेवतात. तो सुटायचा प्रयत्न करीत ८ व्याच्या दिशनं झेप घेण्याचा प्रयत्न करीत, राहातो. त्याचा चेहरा लालबुंद झाला आहे. ) सोडा मला. आधी सोडा मला. चांडाळा, मी तुझा जीव घेईन, सोडणार नाही. जीव घेईन.

८ वा : ( शांतपणे ) म्हणजे काही खरोखरीच तुम्ही माझा खून करणार नाही. होय ना ?

( पडदा )

ग्रा. क्र. 20020
वि. नाटक 28/10/83

# अंक तिसरा

( तिथेच–दुसऱ्या अंकानंतर लगेच.

पडदा उघडतो, तेव्हा दुसऱ्या अंकाच्या शेवटी जसे सगळे ३ ऱ्याकडे बघत उभे आहेत, तसेच उभे. काही क्षण शांतता. तिसरा खिडकीशी जातो. एवढ्यात कोर्टाचा कारकून येतो आणि विचारतो–)

कारकून : काय झालं ? मी काहीतरी गडबड झालेली ऐकली.

फोरमन : काही नाही. उगाच थोडी वादावादी ! (नकाशा गोळा करून त्याच्याकडे देतो. ) याचं काम झालं.

( कारकून नकाशा घेतो. खोलीभर काळजीपूर्वक पाहातो, आणि नंतर जातो. स्तब्धता. आतापर्यंत न आलेला एक प्रकारचा ताठरपणा त्या खोलीत पसरतो. १ ला घसा खाकरतो. दुसरे कोणी बोलेल याची वाट पाहात, सगळे स्तब्ध बसून राहतात. )

९ वा : मला वाटतं–कुणीतरी सुरुवात करावी हे बरं.

२ रा : ( लक्षात येईल अशा पद्धतीनं मान लांबवून घड्याळ पाहात ) उशीर होतोय. इथेच रात्र पडली, तर ते आपल्याला जेवण देणार आहेत का ?

फोरमन : मला काय माहीत ?

२ रा : आणि आज रात्रीपर्यंतसुद्धा चर्चा संपलीच नाही, तर आपल्याला घरी जाऊ देतील ना ? आपल्याला तरी बुवा घरी जायलाच पाहिजे. एक तर मला अतिशय सर्दी

झालीय. दुसरे म्हणजे माझ्या नातवाला गालगुंड आली आहेत. गाल सुजून हे ऽ भप्प झालेयत. मारुती झालाय नुसता ! ( कुणीच हसत नाही. तेव्हां ओशाळून गप्प बसतो. )

( सगळे गप्पच आहेत. प्रत्येकजण ओशाळवाणा झाला आहे, आणि कसे बोलावे नि काय बोलावे, या विचारांत पडला आहे. हळू हळू खोलीत अंधारु लागते. कुणाच्याच ते ध्यानात येत नाही. अखेरीस ६ वा घसा साफ करून बोलू लागतो. )

६ वा : माफ करा, आताचा हा प्रकार व्हायला नको होता. आपण असे हातघाईवर येण्यासाठी ,काही इथं जमलो नाही. आपल्यावर जबाबदारी आहे. मला नेहमी वाटतं, की लोकशाहीचा हा मोठाच फायदा आहे. आपण–तुम्ही –आम्ही–चार सामान्य माणसं–पण आपल्याला कायद्यानं अधिकार दिलेला आहे–निर्णय घेण्याचा. एखाद्याला दोषी-निर्दोषी ठरवण्याचा. आपण तो अधिकार नीट वापरायला हवा. निर्णय दिल्यानं आपण काही कमावणार नाही. पण म्हणून तर त्या निर्णयाचं मोल अधिक आहे. म्हणून तर त्यांत तुम्ही–आम्ही, अशी भावना येता कामा नये. स्वतःचा विचार शिवता कामा नये.

४ था : खरं आहे.

( आता ६ व्याला वाटते, की, असे सांगण्यात आपण आपली मर्यादा ओलांडली. अतिरेक केला. त्यासरशी तो गोंधळतो. )

५ वा : पाहिलंत किती अंधारून आलंय. आज नक्की वादळ होणार ! ( थांबून ) उकडतंही आहे दिवसभर.

( वर्तमानपत्राने वारा घेऊ लागतो. )

( ४ थ्याच्या अंगातला कोट पाहून ) काय हो, तुम्हांला घाम नाही येत ?

४ था : नाही.

( ४ थ्याच्या थंडपणाने ५ वा चकित होतो. )

७ वा : आपण हा पंखा तरी चालू करू या का ?

( फोरमन बाकावर उभा राहून, पंखा चालू करण्याच प्रयत्न करतो. तो सावकाश फिरू लागतो. फोरमन क्षणभर पाहतो. मग खाली उतरतो, व हसत हसत, बाकीच्यांना काय वाटले, हे पाहतो. कुणाला काही वाटलेले नसते. त्याचे हसू मावळते, आणि पंखादेखील फिरायचा थांबतो. तो जागेवर जाऊन बसतो. )

जाऊ दे. बिघडलाच असेल तो.

५ वा : पाऊस पडू दे. थंड तरी वाटेल.

२ रा : कसलं थंड? इथे सगळ्यांची माथी भडकली आहेत. फिरली आहेत. चौघेजण फिरले त्या मवाली पोरासाठी.

९ वा : ( शांतपणे ) तो मुलगा कसा आहे, याच्याशी काय करायचंय आपल्याला ? खरं काय घडलंय यावरूनच खटल्याचा निकाल लागायचाय.

२ रा : खरे–खरे–खरे–मघापासून एकएक खऱ्या गोष्टी ऐकून विटून गेलोय मी. स्वतःच्या सोयीची एक एक गोष्ट उकरून काढताय तुम्ही. काय समजलात ? असल्या खऱ्याची पर्वा नाही आपल्याला.

९ वा : तेच तर सांगताहेत ते.

( ८ वा त्याच्या खांद्यावर हात ठेवतो. ९ वा त्याच्याकडे पाहातो व खाली बसतो. ८ व्याला जणू म्हणायचे आहे, जाऊ दे ना–त्याच्या नादी काय लागता तुम्ही ! ९ वा रागाने, खिशातून हातरुमाल काढून कपाळ टिपतो.)

काय भयंकर उकडतंय !

६ वा : पाणी हवं का !

५ वा : मी आणतो हवं तर.

९ वा : नको. ( कपाळ टिपत राहतो. )

५ वा : नक्की पाऊस पडणार आता.

२ रा : काय हो, तुम्ही का बदललेत तुमचे मत ?

५ वा : मला वाटलं की तो मुलगा—

७ वा : तुम्हाला लाख वाटले पण त्याला काही पाया – काही कारण–

५ वा : नसायला काय झालं ? किती तरी तपशील अजून बाहेर आलेला नाही.

२ रा : तपशील ? फसताय तुम्ही. स्वतःला मोठे बुद्धिमान समजताय ! पण हे दोघेतिघे तुमच्या डोळ्यात धूळ फेकताहेत, धूळ !

५ वा : तसं काही नाही.

२ रा : तुम्हीसुद्धा तसलेच आहात. अतिविचार करून डोके चक्करतय तुमचे. काय समजलात ? ( बाजूला होतो.)

५ वा : ( हळूच ) वायफळ बडबड !

( अधिकच अंधारून येते. खोलीतली हालचाल बंदच होते. सगळे जसे काही वादळाची वाट पाहतात. आणि एकाएकी वादळ सुरू होते. सगळ्या शांततेत, बाहेर कोसळणाऱ्या मुसळधार पावसाचा आवाज तेवढा ऐकू येतो. गडगडत नाही. नुसता पाऊस. सगळे खिडकीतून बाहेर पाहतात. कोणी बोलत नाही. पाऊस पडतच राहतो. पहिला उठून दिवा लावतो. एकदम फ्लोरेसंट टयूबचा पांढरा भगभगीत प्रकाश पडतो. त्याचवेळी बाहेर ढगांचा गडगडाट होतो. नाटकाच्या उरलेल्या भागात, विजा, पाऊस आणि मधूनमधून गडगडाट ही चालू राहतात. १ ला ८ व्याजवळ येतो. २ रा खिडकी बंद करतो. )

फोरमन : ( खालच्या आवाजात ) एकदम केवढं वादळ–नाही ? यानं तरी उकाडा कमी झाला म्हणजे मिळवलं.

८ वा : होईल बहुतेक.

५ वा : मला आवडतं वादळ ! असा मुसळधार पाऊस–बस रे बस!

सगळी घाण, केरकचरा, पालापाचोळा वाहून जावीत आणि सगळं कसं धुतल्यासारखं स्वच्छ स्वच्छ व्हावं ! जोराचं आहे नाही वादळ ? मला कसली आठवण झाली माहितेय ? मागे गावाला आमच्या एका नातेवाईकाचं लग्न होतं. ऑक्टोबर महिन्यातली गोष्ट आहे ही. अंगणात उघड्यावर मांडव घातला होता. अंतरपाट धरले. मंगलाष्टकं सुरू झाली, आणि आता लग्न लागणार—एवढ्यात असलं जोराचं वादळ सुरू झालं ! मांडव उडून जायची पाळी ! वाजता रे वाजवा म्हणावंच लागलं नाही, असा गडगडाट. सगळ्यांनी घरात धूम ठोकली. कसलं लग्न नि कसलं काय ? नवरा—नवरी जाजमं उचलायला लागली. आता बोला.

३ रा : (चौथ्याला) एकाएकी आला नाही पाऊस ?

४ था : हो.

३ रा : मघाशी झालं ना, ते तुम्ही लक्षात नका ठेवू. त्या माणसानं मला जाणून बुजून भडकवलं. चिडवत नलं. म्हणजे त्या पलीकडे त्याला काही अर्थ नाही. तसा मी थोडा गरम माथ्याचा आहे ! त्यातून त्यानं मला राक्षस, पशू, विकृत, म्हटलं आणि हे न ते, काय काय म्हटलं. कुणाचंही माथं भडकलं असतं नाही का ? एकसारखा तो मला डिवचत होता !

४ था : हो, ते मात्र छानच साधलं त्याला.

३ रा : असेल. पण आपल्याला नाही बुवा अशा वेळी राग आवरत. मग आपण काय तोंडाला येईल, ते बोलून जातो. पण एरवी आपण मनानं सच्चे.

४ था : तसे इथं सगळेच मनानं सच्चे आहेत.

२ रा : पण कसे एकेकजण बदलताहेत पाहिलेत ना ? तिघे बदलले!

३ रा : काहीतरी करून त्यांचं मत बदलायला पाहिजे.

२ रा : मुळीच बदलणार नाही. पक्के शिष्ट आहेत ते. आडमुठे.

४ था : एकदा बदललंच ना त्यांनी मत ? मग पुन्हा बदलणं काय कठीण आहे ?

२ रा : पण कसं लावायचं त्यांना बदलायला ?

४ था : तर्काच्या आधारानं.

२ रा : तर्काच्या म्हणे ! डोंबल !

३ रा : तुम्ही यांचं ऐका. मी सांगतो, आपल्या सगळयांच्यात यांनाच खरं काय ते कळतंय.

२ रा : माझे मत सांगू ?

४ था : सांगा.

२ रा : मला वाटते सगळे गुंडाळून ठेवून सरळ घरी जावे.

३ रा : काय बोलताय समजतं का ?

२ रा : तुम्हाला माझे ऐकून घ्यायचेय की उगाच चिडायचेय? त्या चौघांना वाटतेय, की, त्या मुलाला सोडवण्यासाठी देवाने त्यांना पाठवलेय. ते काही मत बदलणार नाहीत, आणि आपल्याला रात्रभर इथेच बसावे लागेल. तेव्हा बेस्ट म्हणजे आपण सरळ जज्जांना जाऊन सांगू या, की आम्हाला काही मत देता येत नाही, निर्णय ठरवता येत नाही, बस्. उगाच काय त्या मवाल्याजवळ डोकेफोड करीत बसायचं.

३ रा : ( रागावून ) काहीतरी काय वेडयासारखं–आपण कोर्टांत शप्पथ घेतली आहे. असं मधेच पळून नाही जाता यायचं.

२ रा : का नाही ?

३ रा : ती लबाडी होईल. त्यापेक्षा तुम्ही ' निर्दोषी ' असं मत द्या सरळ.

२ रा : का म्हणून देईन ? मला तो दोषीच वाटतो.

फोरमन : तुमची कोणाची हरकत नसेल, तर आपण चर्चेला सुरुवात करू.

२ रा : मला काय वाटते सांगू ? आता बस्स झाली ही चर्चा. आपण सरळ जज्जसाहेबांना सांगू या, की नाही आम्हाला काही ठरवता येत. घ्या दुसरी ज्युरी, नि करा सुनावणी परत.

८ वा : असं चालत नाही कोर्टात.

७ वा : आपण विचारू तर खरं.

६ वा : मला नाही हे पटत.

७ वा : का ? दुसऱ्या ज्युरीसमोर या मुलाचा टिकाव लागणार नाही, म्हणून वाटतं ?

५ वा : अजून नाही का तुम्हांला वाटत,की, त्या मुलाला संशयाचा फायदा देता येईल ?

७ वा : नाही वाटत.

६ वा : कदाचित् तुम्हांला, संशयाचा फायदा, या शब्दांचा अर्थच कळत नसेल.

७ वा : म्हणजे ? तुम्हांला म्हणायचंय् काय ? मला अर्थच कळत नाही. स्वतःला समजता कोण तुम्ही ? ( इतरांना ) किती उद्धट आहेत पाहा हे. स्वतः मॅट्रिक तरी पास आहेत की नाही, कोण जाणें,आणि दुसऱ्याला शहाणपणा शिकवताहेत.

५ वा : पुरे. तुम्ही मॅट्रिक आहात की नाही; ते कोणी विचारलंय् का ?

७ वा : मी इंटरपर्यंत शिकलोय्.

५ वा : किंवा तुमचे वडील मॅट्रिक होते का, हे तरी कोणी विचारतंय का ?

( ७ वा, उत्तर न देता ५ व्याच्या धिटाईचे आश्चर्य वाटून त्याच्याकडे पाहात राहतो. )

६ वा : जाऊ दे हो – तुम्ही तरी काय–

७ वा : ( ५ व्याला ) हे बघा, आमच्या बापाचं शिक्षण काढायची गरज नाही. आणि काय समजतं, नि काय नाही, हे विचारायचं काम नाही. ( ६ व्याचा निर्देश करून ) यांची तर कमालच आहे. ठाऊक आहे, स्वतः किती हुषार आहेत ते.

( पुढच्या संभाषणात इतरांकडे विजयाने पाहातो. शेवटी ८ व्याकडे पाहातो. तो सरळ रोखून पाहात आहे, हे

लक्षात येताच, शरमून दुसरीकडे पाहातो.)

१ ला : फोरमन, जरा दोन मिनिटं थांबता का ? आपण मूळ विषयाकडे वळू.

( शांतता. )

८ वा : इथल्या साऱ्या सभ्य गृहस्थांची–('सभ्य गृहस्थांची'वर जोर देऊन,.( ७ व्याकडे पाहात ) हरकत नसेल, तर मला एक विचारायचंय. सरकारी वकिलाचा एक मुद्दा असा, की, खून झाला, त्या वेळेस, आपण सिनेमा पाहात होतो, असं त्या मुलानं सांगितलं. पण त्याला त्या सिनेमाचं, अगर त्यातल्या नटनटींची नावं आठवत नव्हती.( ४ थ्याचा निर्देश करून ) यांनी मघा बऱ्याच वेळा या गोष्टीचा उल्लेख केला.

४ था : बरोबर. ज्याला ॲलिबी म्हणता येईल, असं तेवढं एकच त्या मुलानं सांगितलं. आणि त्याचेही तपशील त्याला नीट सांगता आले नाहीत.

३ रा : जरा थांबा. ॲलिबी म्हणजे काय ?

४ था : ॲलिबी म्हणजे, खून झाला त्यावेळी आपण खुनाच्या जागी नव्हतोच, असं सिद्ध करणं. म्हणजे हा मुलगा आपण सिनेमाला गेल्याचं सांगतोय ना, तसं.

८ वा : कल्पना करा, की तुम्ही त्या मुलाच्या जागी आहात. बापाशी भांडून, त्याच्या थपडा खाऊन, तुम्ही बाहेर पडलात, आणि सिनेमाला जाऊन बसलात. अशा मनःस्थितीत सिनेमातला तपशील तुमच्या लक्षात राहील का ?

४ था : पण हा तपशील अगदी ढोबळ आहे. त्याच्या तो लक्षात राहिला नाही, कारण त्या रात्री तो मुळी सिनेमाला गेलाच नव्हता.

८ वा : पोलिसांनी त्याला हे केव्हा विचारलं–तर बापाचा मुडदा समोर पडला असताना. अशा परिस्थितीत तुम्हाला तरी पाहिलेल्या सिनेमातल्या नटनटींची नावं धडाधड म्हणून दाखवता आली असती का ?

४ था : न यायला काय झालं ?

८ वा : इतका मानसिक ताण पडला असताना ?

४ था : होय. इतका मानसिक ताण पडला असतानाही.

८ वा : शिवाय त्याला कोर्टात सिनेमाचं नाव आठवलं. त्यातल्या नटनटींची नावं सुद्धा त्यानं कोर्टात अचूक सांगितली.

४ था : हो, त्याच्या वकिलानं त्याला ती मिळवून दिली,आणि त्या दिवसापासून, कोर्टात खटला उभा राहीपर्यंतच्या एक महिन्यात त्यानं ती पाठ केली. ते सोडायला हवं. पण जेव्हा पकडलं, तेव्हा काही त्याला नांवं नीट सांगता आली नाहीत.

८ वा : मला आपल्याला एक पर्सनल प्रश्न विचारायचा आहे.

४ था : विचारा.

८ वा : काल रात्री तुम्ही कुठं होता ?

४ था : ( बुचकळ्यात पडून ) मी–घरीच होतो.

८ वा : परवा रात्री ?

२ रा : हे काय चालवलेय ?

४ था : ( २ ऱ्याला ) असू दे. ( ८ व्याला ) परवा रात्री मी कोर्टातून सरळ ऑफिसात गेलो, आणि साडेआठपर्यंत काम करीत बसलो. नंतर घरी जाऊन झोपलो.

८ वा : त्याच्या आदल्या रात्री ?

४ था : आठवतो हां. त्याच्या आदल्या रात्री म्हणजे सोमवारी. सोमवारी मी एका मित्राकडे ब्रिज खेळायला गेलो होतो.

८ वा : आणि रविवारी रात्री ?

७ वा : असं करत करत, एक जानेवारीपर्यंत आलं की मला सांगा हं. ( २ रा मोठ्याने हसतो. हसता हसता त्याला खोकला येतो. )

४ था : ( आठवण्याचा प्रयत्न करीत )रविवार–( थांबून ) रविवार रात्र,बरोबर रविवारी रात्री मी आणि ... माझी बायको, आम्ही सिनेमाला गेलो होतो.

८ वा : ( चटकन ) कुठल्या ?

४ था : हिंदी होता. नाव सांगतो हां ... दिल अपना आणि दुसऱ्याचं प्रेम, असं काहीतरी होतं. हां...दिल अपना और प्रीत तुम्हारी ! ( स्तब्धता. )

६ वा : माफ करा. त्याचं नाव 'दिल अपना और प्रीत परायी ' असं आहे !

८ वा : कामं कुणी केली आहेत त्यात ?

४ था : मीनाकुमारी आहे. फार चांगलं काम केलंय् तिनं. आणि एक मुलगी आहे. कोण बरं–?

८ वा : हिरो कोण आहे ?

४ था : राजकपूर, नाही, राजकपूर नाही. पण असंच काहीतरी नाव आहे त्याचं. ( रुमाल काढून घामानं डबडबलेलं कपाळ पुसतो ! ) मी जास्त पाहात नाही हिन्दी पिक्चर्स, आणि एवढं कोण लक्षात ठेवतो ?

८ वा : ( मध्येच ) आणि तुमच्या मनावर त्यावेळी कसलं दडपण नव्हतं ना ?

४ था : ( क्षणभर थांबून, सावकाश ) नव्हतं.

९ वा : मला वाटतं, यांना जे सिद्ध करायचं होतं ते सिद्ध झालंय्. (शांतता ८ वा खिडकीशी जातो. २ रा नाक शिंकरतो )

२ रा : यात काय मोठे सिद्ध केलेय् ?

९ वा : नक्कीच केलंय्.

३ रा : कशावरून ? यांना त्या दीडदमडीच्या नटाचं नाव आठवत नाही म्हणून ? त्यावरून काय, तो मुलगा त्या रात्री सिनेमाला गेला होता, असं सिद्ध होतं ?

९ वा : ( शांतपणें ) तसं नाही. पण एवढं कळतं, की त्याला नावं सांगता आली नाहीत, यावरून, तो सिनेमाला गेला नव्हता असंही सिद्ध होत नाही. तो सिनेमाला गेला असेल, आणि नाव विसरून गेला असेल. शिवाय तो यांच्यासारखं, अमुक एका पिक्चरला जायचं, असं ठरवूनही गेला नव्हता. तो

आपला रागारागातच, जे थिएटर पहिल्यांदा लागलं, त्यात जाऊन बसला. साडेनऊच्या सिनेमाला जवळजवळ साडे-दहावाजता गेला. म्हणजे मुख्य पिक्चर सुरू झाल्यावर. जवळ जवळ अर्ध्या तासानं.म्हणजे टायटल्स पाहिलीच नाहीत आणि यांच्यासारख्या सुशिक्षित माणसाला थोडाफार विसर पडणं शक्य आहे,तर त्याला का नाही ? त्याच्यावर खुनाचा आरोप आहे, याचा अर्थ काय त्याची स्मरणशक्ती अगदी पक्की असलीच पाहिजे, असा होत नाही.

२ रा : तुम्ही घसा कोरडा होईपर्यंत बडबडत बसा. काय समजलात? पण तो मुलगा खुनी आहे म्हणजे आहेच. खोकल्याच्या गोळ्या कोणाकडे होत्या मघा ?

७ वा : ( त्याच्याकडे रोखून पाहात ) संपल्या आता. ( रिकामे खोके त्याच्यासमोर टाकतो. )

फोरमन : मघापासून आपण एक गोष्ट ध्यानात घेतली नाही. स्मरण-शक्तीवरून आठवलं. मानसशास्त्रज्ञानं त्या मुलाची परीक्षा घेतली.

२ रा : आता ते आणखी काढू नका बुवा. या मानसशास्त्रातबिस्त्रात काही अर्थ नसतो. काहीतरी परदेशातली फॅडे आहेत झाले, ही.आमच्या बिल्डिंगमध्ये तीन मानसशास्त्रज्ञ आहेत. एक म्हणे, डोक्याची पुढची बाजू तपासतो, दुसरा मागची आणि तिसरा मधली. तिघेही ठार वेडे आहेत.

फोरमन : ( उठून ) हे बघा, माझा मुद्दा ऐकून घ्या.

२ रा : कसला मुद्दा ? मानसशास्त्रज्ञाने दिलेल्या साक्षीला, कवडीची किंमत नाही !

८ वा : तुम्ही त्यांना बोलू का देत नाही. पण त्याचं बोलून झालं, की तुम्ही, मानसशास्त्र कसं खोटं आहे, यावर पाच मिनिटं व्याख्यान द्या, हवं तर ! (दुसरा ८ व्याकडे रागाने पाहातो व बाजूला वळून नाक शिंकरतो )

फोरमन : (८ व्याकडे पाहून) थँक्स. मानसशास्त्रज्ञानं असं निश्चित-

पणं सांगितलं, की त्या मुलामध्ये अतिशय जोरदार खुनी प्रवृत्ती आहे. म्हणजे त्याला दुसऱ्याचा खून करण्याची इच्छा होते, म्हणे.

६ वा : इच्छा होते, असं नाही.

फोरमन : बरं.इच्छा होते असं नाही. पण त्याची तशी प्रवृत्ती आहे. त्यांनी त्या निरनिराळया टॅस्ट्स सांगितल्या – शाईच्या डागाच्या आणि कसल्या कसल्या.

७ वा : एक कसली पॅरॅनॉइड टेस्ट सांगितली.

फोरमन : म्हणजे काय कुणास ठाऊक ! पण सांगितली खरी ! आणि त्यावरून तो मुलगा निश्चित खुनी प्रवृत्तीचा आहे, असं त्यांनी सिद्ध केलं. होय की नाही ? नेहमी त्या मुलाच्या डोक्यात खुनाचे विचार...

७ वा : डोक्यात नाही. सुप्त मनात.

६ वा : माफ करा, पण...

२ रा : म्हणे माफ करा. इतके अगदी नम्रपणे कशाला बोलायला हव ?

६ वा : त्याला काय करणार ? काही लोक नम्र असतात. काही उर्मट असतात. हा ज्याच्या त्याच्या स्वभावाचा प्रश्न आहे. ( ६ वा व २ रा क्षणभर एकमेकांकडे रोखून पाहात राहातात )मला म्हणायचं होतं की आपल्यापैकी बऱ्याच लोकांची प्रवृत्ती खून करण्याची असते. त्यान खून करता येण्यासारखा असतो. पण आपल्यातले फारच थोडे लोक प्रत्यक्ष खून करतात. आपण संयम ठेवतो. म्हणून म्हणतो, की, या मानसशास्त्राच्या कसोटयांनी आणि डॉक्टरी तपासण्यांनी, फारफार तर एवढंच सांगता येईल,की एखादी व्यक्ती पुढे मागे खून करू शकेल. एवढंच.त्यावरून त्यानं खून केलाच असेल, असं सिद्ध होत नाही.

४ था : मग कोर्टात पुराव्यासाठी म्हणून का धरतात त्या कसोटया?

६ वा : तसा त्यांचा उपयोग होतोच, नाही असं नाही. याच

खटल्यात पाहिलं, तर वकिलांच्या म्हणण्याला पुष्टी देण्यासाठी त्यांचा उपयोग झालाच ना. तसं म्हटलं तर, या कसोट्या आपल्या नऊ जणांना लावल्या, तर आपल्या-पैकी दोघाचौघात तरी खुनाची प्रवृत्ती असल्याचं—खून करण्याची सुप्त इच्छा असल्याचं, नक्की दिसून येईल. पण आपल्यापैकी कुणीही खुनी नाही. आपण कुणीही खून केलेला नाही. एखादा माणूस खून करू शकेल. याचा अर्थ, तो खून करीलच, असा होत नाही.

२ रा : (रागानें) मग घेतली तरी कशाला टेस्ट? मानसशास्त्रज्ञ म्हणाला, की त्या पोराचे रक्त खुन्याचे आहे. म्हणजे हा खून त्यानेच केला, असे नाही का होत?

६ वा : तुम्हीच तर मघा म्हणालात, की मानसशास्त्रज्ञांच्या साक्षीला कवडीची किंमत नाही. (२ ऱ्याच्या लक्षात येते की आपण शब्दांत सापडलो. तो चिडतो.)

२ रा : (दातओठ खाऊन) मी सांगून ठेवतो, अशानें मी... ... (टेबलावर मूठ आपटून, स्वतःला आवरण्याचा प्रयत्न करतो. ( ८ वा शांतपणें चाकू उघडतो. बंद करतो. पुन्हा उघडतो.)

६ वा : तुमच्या घड्याळात किती वाजले?

७ वा : सहा वाजून पाच मिनिटं. (थांबून) पाऊस काही थांबायचं चिन्ह नाही. (८ वा त्याच्याकडं चाकू देतो. ७ वा तो उघडतो, मिटतो, आणि एकदम अस्वस्थ होतो.)

फोरमन : कुणाला काही सूचना करायची आहे का?

३ रा : मला करायची आहे.

१ ला : काय?

३ रा : काहीतरी खायला मिळालं, तर बरं.

५ वा : आणखी तासभर दम धरा. सात तरी वाजू देत.

७ वा : (अस्वस्थ. मला एक शंका येते. कोर्टातदेखील हे माझ्या मनात आलं होतं... केव्हा माहितेय? मयताच्या छाती-

तल्या जखमेबद्दल ती चर्चा चालली होती ना, तेव्हा ! म्हणजे तो वार असा वरून केल्यासारखा होता. म्हणून,

३ रा : आता तुम्ही लागलात का शंका काढायला ?

२ रा : आणि कोर्टात कितीदा तरी त्याच्यावर चर्चा झालीय्.

७ वा : झाली असेल. पण माझं समाधान नाही झालं. त्या मुलाची उंची आहे फक्त पाच फूट सात इंच. आणि त्याचा बाप होता चांगला सहा फूट उंच. म्हणजे थोडाथोडका नाही, चक्क पाच इंचांचा फरक. आता आपल्याहून पाच इंच उंच असलेल्या माणसावर, वरून वार करणं, जरा विचित्रच नाही का ?

३ रा : पाहू तो चाकू.

(७ वा ३ ऱ्याकडे चाकू देतो.)

३ रा : प्रत्यक्षच पाहिल्याशिवाय तुमचं समाधान नाही व्हायचं. मी दाखवतो तुम्हाला. कोण तयार आहे ?

(स्तब्धता. कुणीच पुढे येत नाही, मग ८ वा उठतो, आणि ३ ऱ्याच्या समोर जातो. क्षणभर ते दोघे एकमेकांच्या नजरेला नजर देऊन उभे राहतात. खोलीत क्षणभर शांतता पसरते.) ठीक. (७ व्याला) आता नीट लक्ष द्या. पुन्हा करायला लावू नका.

(८ व्याकडे निरखून पाहात अंदाज घेतो.) माझी उंची तुमच्यापेक्षा पाच इंचानी तरी कमी आहे, बरोबर !

८ वा : हो—कदाचित अधिकसुद्धा असेल.

३ रा : असू दे, आता पाहा हं. (चाकू उघडतो. हातात उगारून धरतो. खाली वार करण्याच्या तयारीत. क्षणभर ८ वा व ३ रा एकमेकांकडे रोखून पहातात. मग ३ रा एकाएकी जोरात चाकूचा वार करतो.)

७ वा : (ओरडून) बाजूला व्हा—

(सगळे उठून उभे राहतात. चाकूचे पाते ८ व्याच्या छातीपासून एका इंचावर येऊन थांबते. ८ वा हलत नाही.

३ रा हसतो. सगळ ८ व्याच्या दोन्ही बाजूला येऊन उभे राहतात, आणि एकदम बोलू लागतात.)

६ वा : (३ ऱ्याला रागाने) ही काय गंमत वाटली का ?

५ वा : तुम्हाला झालंय् तरी काय ?

३ रा : शांत व्हा, शांत व्हा. त्यांना कांही इजा झालेली नाही. नाही ना ?

८ वा : (शांतपणे) नाही, काही इजा झालेली नाही.
(३ रा आव्हानपूर्वक सर्वांकडे पाहतो. कुणीही काही बोलत नाही. मग अजूनही ८ व्याच्या छातीशी चाकू तसाच धरून वरखाली करीत, तो ७ व्याशी बोलू लागतो.)

३ रा : हा असा चाकू येईल. नीट बघा. माझ्यापेक्षा उंच असलेल्या माणसाच्या छातीत तो असा घुसेल. तो खूनही असाच झाला. आता सांगा, यात काय चूक आहे ती.

७ वा : त्याच्याकडे पाहातो आणि जागेवर जाऊन बसतो. त्याचे अजून पुरते समाधान झालेले नाही. पण घडलेल्या प्रसंगाने त्याचेही मन खाऊ लागलेले आहे. ३ रा ८ व्याला चाक परत देतो.)

५ वा : एक मिनिट—(त्याच्या मनात, गाडून टाकलेले काहीतरी उफाळून आले आहे. ८ व्याला) इकडे द्या तो चाकू. (८ वा त्याला चाकू देतो. चाकू मिटून तो सावधपणे धरीत) या हत्यारांची आणि ती वापरणाऱ्या माणसांची चीड आहे मला. कारण जन्मभर पाहात आलोय् मी ती.

८ वा : (संथपणे) मारामारीत हा चाकू कसा वापरतात, हे पाहिलंय तुम्ही ?

५ वा : हज्जारदा, आमच्या छपरावर, गच्चीत, पाठीमागच्या बाजूला, रस्त्यावर-हा चाकू हे मुळी दैवतच आहे तिथल्या लोकांचं. पण इतका वेळ मला सांगायचं सुचलं नाही. मला वाटतं, माझं मन मुद्दामच तो विषय टाळायला पाहात होतं. जाऊ दे. मी सांगत होतो,की— (३ ऱ्याकडे बोट दाखवून)

यांनी धरला, तसा हा चाकू कधीच धरत नाहीत. तो असा धरतात, आणि चटकन पातं उघडतात. वरच्या बाजूनं मारायचं, म्हणजे धरलेली मूठच बदलायला हवी.

८ वा : मग कसा वापरतात?

५ वा : असा. (चाकू उघडतो आणि मुठीखाली धरून गोल फिरवतो व ७ व्याच्या दिशेने वरच्या बाजूला मारल्यासारखे करतो, ७ वा दचकतो.) असा. असले चाकू वापरणारा माणूस दुसऱ्या कुठल्याही पद्धतीनं तो वापरणार नाही.

८ वा : नक्की ?

५ वा : शंभर टक्के खात्री आहे, माझी! (चाकू बंद करून पुन्हा उघडून दाखवतो,)–म्हणून तर ते असे केलेले असतात.

८ वा : (७ व्याकडे पाहून) तो मुलगा चाकू वापरण्यात पटाईत आहे, असंच सगळयांचं म्हणणं होतं, नाही ?

५ वा : हो ना.

८ वा : मग त्यानं ही जखम केली असेल असं वाटतं तुम्हाला ?

५ वा : जन्मभराचा त्याचा अनुभव लक्षात घेतला तर– नाही, मला नाही वाटत तो तसा वार करील म्हणून ! तो नक्की अंडर हँडच—

३ रा : (मधेच) तुम्हाला काय माहीत ? तुम्ही काय तो खून होताना बघितलाय् ?

५ वा : तसा आपल्यापैकी कोणीच बघितलेला नाही.
(चाकू पुन्हा टेबलात खोचून ठेवतो.)

४ था : (संथपण) नुसता त्याला चाकू कसा वापरायचा हे माहीत आहे, एवढयावरून, त्या मुलानं तो वार केला की नाही, हे सिद्ध नाही होत.

३ रा : बरोबर आहे. मीदेखील तेच म्हणतो.

८ वा : (२ ऱ्याला) तुम्हाला काय वाटतं ?
(२ रा गोंधळतो, बोलावे की नाही, अशा विचारात.)

२ रा : कोण जाणे– मला नाही सांगता येणार.

३ रा : सांगता नाही येणार, म्हणजे ?

२ रा : येणार नाही– म्हणजे मला नाही समजत.

८ वा : (७ व्याला) तुम्हाला काय वाटतं ?

७ वा : मला– मला या साऱ्याचा वीट आलाय्. मी माझं मत बदलतोय. मला वाटतं, तो ' निर्दोषी ' आहे.

३ रा : काय म्हणालात ?

७ वा : ऐकलंत तेच. मी आता विटलोय् या सगळ्या प्रकाराला.

३ रा : (चिडून उठतो) विटलोय् म्हणजे काय ? असं नाही चालायचं.

७ वा : तुम्ही तुमच्या पुरतं बघा! ज्याला त्याला शिकवत जाऊ नका, कळलं ?

६ वा : पण तुमचीसुद्धा कमाल आहे. तुम्हाला नाटकाला जायची घाई होती म्हणून तुम्ही पहिल्यांदा सगळ्यांसारखं ' दोषी ' असं मत दिलंत, आता कंटाळा आला, म्हणून ' निर्दोषी ' म्हणता, ही काय पद्धत झाली ?

७ वा : हे बघा, तुम्ही --

६ वा : (त्याला बोलू न देता) तुम्ही एका माणसाच्या आयुष्याशी खेळताय्. समजलं ? तसं करण्याचा काय अधिकार आहे तुम्हाला ? जीवनमरणाचा प्रश्न आहे हा. त्याच्या बाबतीत तुम्हाला अशी उडवाउडवी करून चालायची नाही. काही वाटत कसं नाही तुम्हाला ?

७ वा : तुम्ही कोण मला विचारणार ?

६ वा : एकदा सोडून हजार वेळा विचारीन. तुम्हाला जर 'निर्दोषी' म्हणायचं असेल, तर तुम्हाला तसं वाटतं म्हणून सांगा. तुमची तशी खात्री पटलीय् म्हणून सांगा. नुसतं तुम्हाला कंटाळा आलाय् म्हणून नको. आणि जर तो दोषी आहे असं वाटत असेल तर तसं सांगा. मनात आलेले सांगायला घाबरताय कशासाठी ?

७ वा : बघा हां, सांगतोय्–

६ वा : (ताठरपणे) ' दोषी ' की ' निर्दोषी ?'

७ वा : सांगितलं ना एकदा, ' निर्दोषी ' म्हणून ?

६ वा : का पण ?

७ वा : मी का म्हणून तुम्हाला सांगायचं ?

६ वा : नाही कसं, सांगायलाच पाहिजे. बोला.
(क्षणभर दोघे एकमेकांच्या नजरेला नजर देतात. मग ७ वा मान खाली घालतो.)

७ वा : (खालच्या आवाजात) मला--मला, तो दोषी आहे असं वाटत नाही.
(६ वा ७ व्याकडे तिरस्कारानं पाहातो. ७ वा अपराध्यासारखा उभा राहातो.)

८ वा : (पहिल्याला) पुन्हा एकदा मतं घेऊ या.

फोरमन : (थोडा वेळ थांबून, मग हलकेच) बरं, पुन्हा एकदा मत घेऊया. (उठून) कोणाचीही हरकत नाही ना ? (कोणी बोलत नाही.) ज्यांचं मत 'निर्दोषी' असं आहे, त्यांनी हात वर करावेत.
(५ वा, ६ वा, ७ वा, ८ वा व ९ वा लगेच हात वर करतात.)
एक, दोन, तीन, चार, पाच–(मोजायचा थांबून आजूबाजूला पाहातो. मग सावकाश, ओशाळल्यागत, स्वतःचा हात वर करतो.) सहा. (हात खाली करतो. बाकीचेही आपापले हात खाली करतात. सहा विरुद्ध तीन.

२ रा : (रागाने उठून) तुम्हा लोकांचे काय चाललेय तेच कळत नाही मला. उगाच कीस काढत बसलाय्. जरा लक्षात घ्या. तो पोर काय लायकीचा आहे? (बोलता बोलता त्याचा तोल सुटत जातो. खालच्या वर्गाविषयीचा त्याचा सगळा तिटकारा उफाळून येतो.) अहो, ही असली पोरे नेहमी खोटच बोलायची. मारामाऱ्या करायची. दारूबिरू कुठनं काही घाणेरडे पिऊन येतात, काय समजलात, आणि घालतात

कुणाच्याही डोक्यात काही तरी. तुमच्याआमच्यासारखी त्यांना दुसऱ्याच्या प्राणांची किंमत कळतेय का ? अहो, बापाला बाप म्हणणार नाहीत हे. म्हणा त्यांचेही बरोबर आहे. त्यांचे आईबाप तसलेच. कुत्र्यासारखी पोरे होतात. मग पोरांना तरी काय वाटणार आहे आईबापांबद्दल ?

९ वा : (उठून) खाली बसा. तुमचं डोकं ताळ्यावर नाहीये.

२ रा : माझे ?

९ वा : खाली बसा म्हणतो ना ?

२ रा : (ओरडून) थेरड्या- तू कोण मला सांगणार ? (इतरांना) हे कोण मला सांगणार ? म्हणे डोके ताळ्यावर नाही. पहा तरी यांचे ध्यान. स्वतःला नाही धड उभे राहाता येत आणि मला आले शिकवायला.

६ वा : तुम्ही जरा गप्प बसाल का ?

२ रा : काय म्हणून गप्प बसेन ? कुणाची चोरी आहे की काय ? इथे एकाही माणसात दानत राहिलेली नाही, एकादेखील. (६ वा सिगारेट पेटवतो. बाकीचे शरमिंदे होऊन बसून राहतात. याला कसे आवरावे, हेच त्यांना समजत नाही.) अडाणी आहात तुम्ही सगळे. मूर्ख ! मी काय सांगतो, ते ऐकून घ्या. आपण सगळे संकटात आहोत. या लोकांची संख्या चाललीय वाढत.काय समजलात ? या खटल्यातल्या त्या पोरासारखी माणसे—आपल्या पाच पटीने वाढतेय त्यांची संख्या. प्लेगच्या उंदरांसारखी लागण लागलीय. आणि जनावरे आहेत ती जनावरे. रानटी, क्रूर- ती आपल्या विरुद्ध आहेत. आपला द्वेष करतात, ती. आपल्याला नष्ट करून टाकायचेय त्यांना. (६ व्याला) असे काय पाहाताय माझ्याकडे ? यातला धोका तुम्हाला नाही का दिसत ? काय समजलात ? काळ असा कठीण आलाय. आपण जर लक्ष ठेवले नाही, त्यांना वेळच्यावेळी हाणून गाडून टाकले नाही, तर आज ना उद्या ते आपल्याला जिंकतील. आपल्यावर

मालकी गाजवतील, आपल्याला होते की नव्हते करून टाकतील.

६ वा : चूप !

२ रा : तुम्ही सगळे मोठे शहाणे दिसता आहात, पण अक्कल असेल तर—माझे ऐका. हे हलके लोक आता खवळले आहेत; पेटले आहेत. ते आपल्याला, पांढरपेशांना खाऊन टाकणार आहेत, तुकडे तुकडे करणार आहेत आपले. तोच तर त्यांचा हेतू आहे. आपल्याला खाऊन टाकायचा. (७ व्याला) मी सूचना देऊन ठेवतोय. खटल्यातला हा मुलगा बरा सापडलाय तावडीत. एक तर एक, पण त्याला चिरडून टाका. शिल्लक नका ठेवू. काय समजलात ? त्यांनी आपल्याला खायच्या आत, आपणच त्यांना चिरडले पाहिजे. एक एक करता करता, सगळी जात खच्ची केली पाहिजे. कायदाबियदा मला काही कळत नाही. मला एवढेच कळते, की या खालच्या लोकांना माजू देता कामा नये. मग कायदा गेला झक् मारीत. दया कशाला दाखवायची आपण त्या लोकांना ? ते दाखवणारेत का आपल्या दया ? आँ ?

५ वा : गप्प बसता की नाही आता ?

२ रा : तूदेखील चोरा त्यांच्यातलाच आहेस— थांब, दाखवतो तुला.

४ था : (शांतपणे) पुष्कळ झालं आता. खाली बसा, आणि तोंड उघडू नका जरा वेळ. (५ व्याला) तुम्ही नका मनावर घेऊ. (२ रा एकदम वारे गेल्यासारखा कोसळतो. सगळ्यांकडे पाठ करून बसतो)

८ वा : असल्या बाबतीत पूर्वग्रह बाजूला ठेवणं कठीण जातं आणि पूर्वग्रह असले की सत्य समजणं कठीण होऊन बसतं.

९ वा : खरं आहे.

८ वा : म्हणा, इथं अजून तरी मोठंसं नुकसान झालेलं नाही. कारण इथं मुळात सत्य काय नि असत्य काय हे सांगणंच

कठीण आहे. आपल्यापैकी सहा जणांना वाटतंय, की तो मुलगा ' निर्दोषी ' आहे. कदाचित् आपण चुकत असू. कदाचित् तो मुलगा दोषी असेल,आणि एक खुनी माणूस आपण समाजात परत नेऊन सोडत असू, पण त्याला इलाज नाही. तो मुलगा गुन्हेगार आहे, याची आपल्याला खात्री नाही आणि आरोपीला संशयाचा फायदा देणं, हे आपले कर्तव्य आहे. तसं केलं नाही तर आपण गुन्हेगार ठरू. कुठल्याही ज्युरीची आरोपीच्या गुन्ह्याविषयी खात्री झाल्याशिवाय ती त्याला दोषी ठरवू शकत नाही. (थांबून) तुम्हा तिघांना अजून इतकी खात्री कशी तेच मला कळत नाही. तुम्हीच सांगा पाहू.

४ था : ( थांबून ) मी सांगतो. ( ८ व्याला) तुमचे काही काही मुद्दे खरोखरच उत्तम होते. विशेषतः शेवटचा मुद्दा–म्हणजे त्या मुलाला तो वार तसा करता आला नसता, हा फार परिणामकारक होता. पण तरीही मला वाटतं, की त्या मुलानं खून केला. याला दोन कारणं आहेत.एक : समोरच्या बाईची साक्ष. तिनं प्रत्यक्ष खून होताना पाहिले.

३ रा : हो ना – ती सगळयात महत्त्वाची साक्ष.

४ था : (३ ऱ्याकडे थंडपणे पाहून) आणि दुसरं : त्या बाईनं सांगितलं, की त्या मुलानं हात डोक्यावर उचलून चाकू खाली आणून भोसकला. तिनं त्याला प्रत्यक्ष बघितलं. चुकीचं का होईना, पण त्यानं तसं केलं हे खरं.

३ रा : बरोबर, हे अगदी बरोबर !

४ था : आता एक मिनिट असा विचार करू. ही बाई म्हणते, की ती रात्री अकराच्या सुमाराला झोपायला गेली. तिचा पलंग खिडकीशीच आहे, आणि तिला पडल्या पडल्या, त्या मुलाच्या घरात काय चाललंय हे पाहाणं शक्य आहे. ती तासभर या कुशीवरून त्या कुशीवर होत होती. पण तिला झोप काही लागली नाही. शेवटी ती बारा वाजून दहा

मिनिटांच्या सुमारास खिडकीकडे तोंड करून झोपली, आणि तिनं बाहेर पाहिलं, तेव्हा तिला ट्रेनच्या खिडक्यांमधून येणाऱ्या उजेडात तो खून होताना दिसला. ती म्हणते, की खून झाल्यानंतर तावडतोब दिवे मालवले गेले. पण त्याआधी तिला तो मुलगा बापाला ठार मारताना दिसला. या साक्षी-मध्ये मला तरी संशयाला जागा दिसत नाही.

३ रा : हेच तर मी म्हणतो.

४ था : (८ व्याला) तुम्हाला काय वाटतं ?

(८ वा घुटमळतो. गप्प राहतो.)

फोरमन, तुमचं काय म्हणणं आहे ?

(फोरमनला आता आपले मत पुन्हा बदलावेसे वाटू लागले आहे. पण बाकीचे काय म्हणतील, या विचारान त्याला तसे करण्याचा धीर होत नाही.)

फोरमन : मला– कोण जाणे, मला काही समजत नाही. सगळा पुरावा लक्षात घ्यायचा म्हणजे–– (नखे चावीत) फार गुंतागुंतीचा आहे हा मामला.

४ था : मला तरी मुळीच वाटत नाही, की त्याला निर्दोषी ठरवता येईल.

फोरमन : पुरावा क्रमानं जुळवून घ्यायचा, म्हणजे मोठं कठीण काम आहे.

३ रा : बाकीचा पुरावा घाला चुलीत. त्या बाईनं प्रत्यक्ष बघितलं ना त्याला ! आणखी काय पाहिजे.

फोरमन : नाही, पण––

२ रा : आपण परत मतं घेऊया.

फोरमन : (एकाएकी) मी माझं मत बदलतो. मला वाटतं तो 'दोषी' आहे. (शरमिंदा होऊन खाली पाहातो.)

(८ वा चिडतो. अस्वस्थ, पण असहाय, ३ रा स्मित करतो.)

३ रा : आणखी कुणाला मत बदलायचंय (आव्हान दिल्यासारखं

सगळीकडे पाहातो. पाच विरुद्ध चार.

६ वा : तुम्हाला अगदी स्वतःचाच विजय झाल्यासारखा वाटतंय्.

३ रा : (हसून) आहेच आमचा विजय.

(९ वा ४ थ्याकडे बारकाईने पाहात आहे.एकाएकी त्याला एक काहीतरी अतिशय खास गोष्ट सुचते.) ४ थ्याला नाकावरून बोटे फिरवताना पाहिल्यामुळे तो सावकाश खुर्चीतून उठतो व ४ थ्याकड जातो. ४ थ्याला तुम्हाला बरं वाटत नाही का ?

४ था : (विचारणं चमत्कारिक वाटून) बरं वाटतंय की. का ?

९ वा : तुम्ही आपल्या नाकावर बोटं दाबताय्, म्हणून म्हटलं मी !

४ था : (किंचित करडेपणाने) म्हणजे ?

९ वा : माफ करा, पण तुमच्या तसं करण्यानं मला एकदम एक आठवण झाली.

४ था : या खटल्याशी संबंध असेल तर सांगा.

९ वा : (उठून) आहे, या खटल्याशीच संबंध आहे.

४ था : मग बोला.

९ वा : मी एकदम विचार करायला लागलो, की, तुम्ही असं का करीत असाल ?

३ रा : लौकर काय ते बोलून टाका पाहू.

९ वा : (तिखटपणं) मी यांच्याशी बोलतो आहे. (४ थ्याला) हं, सांगा, तुम्ही आपल्या नाकावरून बोटं का फिरवीत होता ?

४ था : या खटल्याचा आणि माझ्या नाकाचा काय संबंध ?

९ वा : सांगा तर खरं.

४ था : बरं. सांगतो. तसं केल्यानं या इथं नाकाच्या कडांकडे बरं वाटतं.

९ वा : तिथं चष्म्यामुळं त्रास होतो का ?

४ था : आता दुसरं काही बोलाल, तर बरं होईल.

९ वा : तुमच्या चष्म्याच्या काडयांचा छाप उठलेला दिसतोय, नाकाच्या बाजूला. माझ्या लक्षात नव्हतं आलं ते आधी. तुम्हाला त्याचा त्रास होतो का ?

४ था : (रागावून) त्रास तर होतोच आहे.

९ वा : मला माहीत नव्हतं. (स्वतःच्या जागेजवळ यायला निघतो) इतकं वय झालं, तरी आम्हाला अजून चष्मा लागलेला नाही.

७ वा : तुमची ही डोळयांची भाषा संपणार तरी कधी ?

९ वा : जरा दम धरा. (४ थ्याला) त्या साक्ष देणाऱ्या बाईच्या नाकाच्या बाजूला अशाच खोल खुणा होत्या.
(क्षणभर, हे ध्यानात येईपर्यंत, सगळे गप्प. मग प्रत्येकजण हलक्या आवाजात बोलू लागतो.)
जरा थांबा--
(सगळे गप्प बसतात.)
एका मिनिटात मी संपवतोच. बाकी कुणाच्या लक्षात आलं की नाही, ते मला ठाऊक नाही. पण मला तिचा चेहरा नीट आठवतोय्. तिच्या नाकाभोवती अशाच चष्म्याच्या खुणा होत्या, आणि कोर्टात ती अशीच त्या खुणांवरून बोटं फिरवत होती.

५ वा : बरोबर आहे यांचं. तिची ती सवय मलाही चांगली आठवते.

९ वा : ती बाई अंदाजे पंचेचाळिशीची असेल. पण चारचौघांमध्ये येताना आपण तिशी-पस्तिशीचं दिसावं, यासाठी तिनं आटोकाट प्रयत्न केला होता. तोंडाला रंगरंगोटी जरा जास्तच केली होती. केसाला कलप लावला होता. कपडे देखील एखाद्या कॉलेजातल्या पोरीसारखे केले होते. आणि चष्मा लावायचं टाळलं होतं.

३ रा : (९ व्याच्या अंगावर जवळजवळ धावून जात, मोठ्याने व आवेशाने) चष्मा लावायचं टाळलं होतं, म्हणजे काय ? तिला

चष्मा लागतो की नाही, हे तुम्हाला काय माहीत ? नुसती नाकावरून बोटं फिरवली, म्हणून काय झालं ?

५ वा : पण तिच्या नाकावर चष्म्याची खूण होती. मी पाहिली.

३ रा : म्हणून काय झालं ? त्याचा अर्थ काय होतो ?

फोरमन : मीदेखील त्या खुणा पाहिल्या. मी तिच्या बराच जवळ होतो. तिच्या नाकावर चष्म्याची खूण होती. ती नक्कीच चष्मा लावत असणार.

२ रा : तसा तिनं केसाला कलप लावला होता. तोंडाला पावडर लावली होती. त्यावरून सिद्ध काय होतं ?

९ वा : त्या खुणा चष्म्याशिवाय दुसऱ्या कशाच्या असण्याची शक्यता आहे का ?

४ था : (थांबून) नाही.

३ रा : मी नाही कसल्या खुणा पाहिल्या.

४ था : मी पाहिल्या. मला आठवतंय आता.

(९ वा खुर्चीत टेकून बसत, खिशातून एक लहानशी गोळी काढून तोंडात टाकतो. तो एकदम फार वृद्ध, फार थकल्यासारखा दिसू लागतो. ८ वा त्याच्याकडे जिव्हाळ्याने बघतो.)

३ रा : (थांबून) मग त्या पोराच्या वकिलाच्या कसं नाही लक्षात आलं ? तो का नाही बोलला ?

८ वा : आपण नऊजण या केसवर विचार करतोय. नवांपैकी आठ जणांच्या लक्षात ते नाहीच ना आलं.

३ रा : पण ती बाई असं कशाला करील ?

८ वा : का ? चष्म्यामुळं आपण पोक्त दिसतो, अशा समजुतीनं चष्मा न वापरणाऱ्या बायका, तुम्ही पाहिलेल्या नाहीत ?

७ वा : नसतील, तर आमच्या कुटुंबाशी ओळख करून देतो तुमची.

३ रा : बरं, तिच्या नाकावर खुणा होत्या, कबूल, चष्म्याच्या खुणा ! लोकांत वावरताना वाईट दिसू नये, म्हणून ती चष्मा;

लावत नसेलही कदाचित ! पण हा खून होताना तिनं पाहिला, तेव्हा ती स्वतःच्या घरात होती– एकटीच होती. म्हणजे तिच्या डोळ्यांवर—

८ वा : (४ थ्याला) तुम्ही झोपताना चष्मा लावता ?

४ था : नाही, कुणीच झोपताना चष्मा लावत नाही.
(शांतता. फक्त पावसाची रिपरिप ऐकू येते.)

८ वा : मग हे तर्काला धरून आहे ना, की झोप यावी असा प्रयत्न करताना, या कुशीवरून त्या कुशीवर वळत असताना, तिनं चष्मा लावलेला असण्याची शक्यता नाही ?

३ रा : तरी पण –

८ वा : आणि पडल्यापडल्या तिनं सहज खिडकीबाहेर नजर टाकली तेव्हाही तिच्या डोळ्यावर चष्मा असण्याची शक्यता नाही. तिनं बाहेर पाहिलं, त्याच क्षणी खून झाला, आणि त्या पाठोपाठ दिवे मालवले गेले. म्हणजे तिला चष्मा लावायला वेळ मिळाला असण्याची ही शक्यता नाही.

३ रा : जरा थांबा—

८ वा : शक्यता फक्त एवढीच आहे, की समोर कोण राहतं हे ठाऊक असल्यामुळे त्या मुलानंच खून केला, असं तिला मनापासून वाटतंय्. प्रत्यक्षात तिला दिसलं असेल ती फक्त अंधुकशी हालचाल.

३ रा : (विलक्षण संतापून) तिला काय दिसलं, हे तुम्हाला काय माहीत ? (मोठ्यानं) तिचा चष्मा कसला होता, हे तुम्हाला काय माहित? कदाचित् तो वाचताना लावायचा असेल, कदाचित गॉगल्स असतील ! तुम्हाला काय माहीत ?

८ वा : असेल, तसंही असेल. पण म्हणजे तिच्या दृष्टीबद्दल शंकेला जागा आहे.

६ वा : त्यातून तिला दिसणारा देखावा रस्त्यापलिकडचा होता. आणि ट्रॅमच्या खिडक्यांमधून दिसलेला होता.

२ रा : (उठून) इतक्या अनिश्चित पुराव्यावर एखाद्याला फाशी

देणे हे बरोबर नाही.

३ रा : हे तुम्ही म्हणताय ?

८ वा : त्या बाईची पाहण्यात चूक झाली असेल, असं नाही वाटत तुम्हाला ?

३ रा : नाही– नाही–नाही !

८ वा : (फोरमनला) तुम्हाला काय वाटतं ?

१ ला : (सावकाश) मला वाटतं, त्या मुलाला दोषी नाही ठरवता येणार.

८ वा : (२ ऱ्याला) तुम्हाला वाटतं का, की तो दोषी आहे ?

२ रा : मला काही समजेनासं झालेय्..तुम्ही काय हवे ते करा.

८ वा : मला तुमचं मत हवंय्.

२ रा : ' निर्दोषी '. करा काय वाटेल ते.

३ रा : बेशरम कुठले !

८ वा : आणखी कुणाला वाटतं की तो दोषी आहे ?

४ था : (सावकाश) नाही. माझी खात्री पटली.

(३ रा तेवढा बसून आहे. बाकी सगळे उठून उभे.)

३ रा : (संतापलेला.) झालंय् काय तुम्हा सर्वांना ? बाकीचा एवढा सगळा पुरावा असताना – तो चाकू – तो म्हातारा – हे सारं–

२ रा : चुलीत गेला बाकीचा पुरावा. (थांबून)—असं तुम्हीच म्हणाला मघा.

(३ रा २ ऱ्याकडे, खाऊ का गिळू) अशा नजरेने बघतो.
(३रा बसूनच राहतो. बाकीचे त्याच्याकडे पाहात राहातात. नुसती वाट बघतात.)

८ वा : (३ ऱ्याला ) तुम्ही एकटेच उरला आहात आता.

३ रा : एकटा असलो म्हणून काय झालं, माझा हक्क मी बजावणारच.

८ वा : हो, तुमचा हक्क तर आहेच.

(सगळे थांबतात. शिकारी कुत्र्यांनी वेढलेल्या सावजाने पाहावे, तशा नजरेने ३ रा सर्वांकडे बघतो. ते त्याच्याकडे रोखून पाहात राहतात, आणि वाट बघतात. टक लावून राहतात.)

३ रा : (अखेरीस) काय हवंय् तुम्हाला ? का माझ्याकडे बघताय असं ? मी म्हणतो,की तो मुलगा खुनी आहे-खुनी आहे!

८ वा : कशाच्या आधारावर म्हणता असं ?

३ रा : ते मी सांगितलंय् मघाशीच.

८ वा : आम्हाला पटलं नाही ते. परत ऐकायचंय् आम्हाला. मग त्यासाठी कितीही वेळ लागला, तरी तो घालवायची तयारी आहे आमची.

३ रा : सगळंच-चौकशीत बाहेर आलेली प्रत्येक लहानमोठी गोष्ट-सगळंच त्याच्याविरुद्ध जातं. नाहीतर मला काय मर्ख समजलात तुम्ही ? तुमची अंतःकरणं कितीही पाझरू देत. मला त्या पोराबद्दल काडीइतकं वाटणार नाही. मी माझं मत बदलणार नाही. मग महिनाभर इथंच बसावं लागलं, तरी चालेल. (थांबून) कुणीच काही बोलत का नाही ? (सगळे शांतपणे नुसते पाहात राहतात.)

त्या म्हाताऱ्याची साक्ष-त्यानं सगळं ऐकलं. तो चाकू-त्या चाकूसारखा दुसरा चाकू यांनीं आणला, म्हणून काय झालं? म्हणे खिशातून पडला.म्हणे तो म्हातारा दारापर्यंत पोहचला नसेल. तुम्ही कितीही खुरडत चाललात, म्हणून काय झालं नाहीच ते सिद्ध होत.मी सागतो-प्रत्येक गोष्ट तुम्ही उलटी सुलटी फिरवलीत. ती चष्म्याची गोष्ट-तुम्हाला काय माहीत, तिनं चष्मा लावला नव्हता. तिनं साक्ष तर दिली होती ?

(थांबून) सांगितलं ना मी सगळं, आणखी काय हवंय तुम्हाला ? असे का बघताय् तुम्ही माझ्याकडे ? का ?(सगळे गप्प) बस, एवढंच सांगायचं होतं मला.

(कुणीच बोलत नाही.)

तो मुलगा काय ओरडला ठाऊक आहे ? त्या म्हाताऱ्यानं ऐकलं ते ! तो म्हणाला, मी तुमचा जीव घेईन. प्रत्यक्ष बापाला असं म्हणाला तो. कसाही का असेना तो माणूस, अडाणी असेल, जुगारी असेल, तरीसुद्धा तो बाप होता त्या पोराचा. त्यानं त्याला जन्म दिला होता. (तो अधिकाधिक रडवेला होत जातो. त्याचे दुःख उफाळून वर यते आणि त्याचा तोल सुटतो. मघापासून मोठ्या प्रयत्नानें दडवून ठेवलेली त्याची व्यथा जणू आता त्याला आवरेनाशी होते.) कृतघ्न कारटा ! प्रत्यक्ष बापाला ठार मारणारा. मला चांगली माहीत आहे ही जात. ज्यानं जन्म दिला त्याच्यावर उलटणारी. छळ–छळ करतात ही पोरं बापाचा दररोज. दर दिवशी त्याचा जीव घेत राहातात. त्याचं काळीज किती पिळवटलं, डोळ्यातलं पाणी आटलं, तरी त्यांना दया येत नाही. त्यांना जन्म दिला त्याच वेळी त्यांच्या गळ्याला नख लावलं नाही, त्याचा सूड म्हणून, जन्मभर आपल्या उरावर नाचत राहणारी ही जात मला ठाऊक आहे. मला चांगली ठाऊक आहे. परमेश्वरा ! तुमच्या कुणाच्याच लक्षात येत नाही का? त्या पोराला दया दाखवताय् ? त्याच्या बापाला दाखवायची सोडून ? मलाच– मलाच फक्त कसं समजतंय हें दुःख ? माझ्या–माझ्याच काळजात खोल खोल खुपसला जातोय तो चाकू !

(त्याला हुंदके अनावर होतात. ८ वा पुढे होतो. त्याला जवळ घेतो. हलकेच त्याच्या पाठीवरून हात फिरवतो. डोके थोपटतो. सारे स्तब्धपणे पाहात राहतात.)

८ वा : (अत्यंत आपुलकीन, मऊ आवाजात) हे बघा, ऐका जरा, हा मुलगा आहे ना, हा तुमचा नाही. हा वेगळा आहे, दुसराच कुणीतरी.

४ था : त्याला जगू द्या. अजून लहान आहे तो.

(स्तब्धता. ३ रा हळुहळू डोके वर उचलतो. त्याला अजूनही हुंदके येत आहेत. पण तो ते आवरतो. रुमालाने चेहरा टिपतो.)

३ रा : (कसाबसा) वरं, ' निर्दोषी. '

(स्तब्धता मग फोरमन दरवाजाशी जातो व टिचक्या मारतो. )

फोरमन : आमचा निर्णय तयार आहे.

(कारकून आत येतो.)

कारकून : ठीक आहे, चला तर मग–

(कारकून पुढे होतो, सगळे ज्युरर्स आपापल्या वस्तू–कोट–पेपर्स गोळा करतात आणि त्याच्या मागून जातात. ८ वा सर्वात शेवटी जातो, व दरवाजा लावून घेतो. बाहेर वादळ शांत होत आहे.)

• • •

20020
वि. नाटक 28/10/03

IRBK-0120020